जानेवारी २०१६ / पाने ६० / किंमत ₹१०

# लोकराज्य

सप्तपदी स्वच्छतेची

आपले सरकार

मेक इन महाराष्ट्र

माझी कन्या भाग्यश्री

जलयुक्त शिवार

कौशल्य विकास



# महामानवाला अभिवादन



भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. त्यावेळी त्यांनी 'त्रिशरण पंचशील' प्रार्थनाही केली. राज्य शासनातर्फे चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरमधून या वेळी पुष्पवृष्टी करण्यात आली.

वर्ष ६७ वे | अंक ७ | जानेवारी २०१६

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

## संपादन

- अतिथी संपादक — मनीषा पाटणकर-म्हैसकर
- मुख्य संपादक — चंद्रशेखर ओक
- प्रबंध संपादक — देवेंद्र भुजबळ
- संपादक — सुरेश वांदिले
- कार्यकारी संपादक — प्रवीण टाके
- उपसंपादक — प्रवीण कुलकर्णी, राजाराम देवकर

## प्रशासन

- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण — अश्विनी पुजारी
- साहाय्य — संतोष सुतार

## मांडणी

- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

## पत्ता

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya2011@gmail.com

## वितरण आणि वर्गणीदार

वर्गणीदार व तक्रार निवारण - ०२२-२२०२१५३०
Email : lokrajyavitaran@gmail.com
lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

**नव्या वर्षात महाराष्ट्राला अधिक गतिमानतेने प्रगती आणि विकासाच्या मार्गावर नेण्यासाठी मुख्यमंत्री व त्यांच्या सहकार्यांनी विविध संकल्प केले आहेत. या संकल्पामधून स्मार्ट, स्वच्छ, समृद्ध आणि सुंदर महाराष्ट्राची घडण होणार आहे.**


### शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी १० हजार ५१२ कोटी रुपयांचा विशेष कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत जाहीर केला. शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा स्पष्ट निर्वाळा यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिला.



६



२४

### सुरक्षेचा तिसरा डोळा

मुंबईची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी संपूर्ण शहरात जागतिक दर्जाचे व उच्च क्षमता असलेले ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दक्षिण मुंबईतील कुलाबा ते वरळी दरम्यानच्या संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी १२५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.



### शुद्ध जल, स्वच्छ महाराष्ट्र

राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छतेची सवय लागावी, उघड्यावर शौचास बसणे बंद व्हावे यासाठी जनजागृती करण्यात येत आहे. त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत. राज्यातील ४ हजार गावे हागणदारीमुक्त झाली आहेत.

२२

### पहिली स्मार्ट सिटी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाशी येथील प्रदर्शन केंद्रामध्ये सिडकोच्या 'नवी मुंबई (दक्षिण) स्मार्ट सिटी प्रकल्पा'चा शुभारंभ केला. या प्रकल्पास सर्वप्रथम प्रतिसाद देऊन आघाडीवरचे राज्य ही आपली प्रतिमा आणखी ठळक करण्यात महाराष्ट्र यशस्वी झाला आहे.

Smart City

२८

### स्वच्छ भारत पॉईंट, स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट

स्वच्छ महाराष्ट्र अभियान सप्तपदी स्वच्छतेची

नागरी स्वच्छता अभियानांतर्गत पाचगणी, माथेरान आणि वेंगुर्ला या शहरांच्या यशकथा.

३०



४६

किल्ल्यांवरील देवदेवता : श्रद्धा आणि प्रेरणा



स्निग्ध प्रेमाचा सण : संक्रांत

४४


### याशिवाय


प्रेरणा
भ्रमंती
दिल्लीतील महाराष्ट्र

## सुंदर आणि संग्राह्य

लोकराज्यच्या डिसेंबरच्या अंकात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयीचे लेख खूप सुंदर झाले आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित पाच तीर्थांचा विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याची सविस्तर माहिती मिळाली. त्याबद्दल आभार.

**– प्रवीण कांबळे, सांगली**




## लोकमान्य


शासनाच्या विविध योजनांची आणि उपक्रमांची माहिती मिळण्यासाठी लोकराज्य हे प्रभावी माध्यम आणि ज्ञानाचा खजिना आहे. अंकातील मान्यवरांच्या मुलाखतीतून खूप माहिती मिळते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील २३ गावे ज्याप्रमाणे लोकराज्य ग्राम झाले, तसेच आवटी हे गाव लोकराज्य ग्राम करण्याचा माझा प्रयत्न आहे.

**– प्रेमराव हाके सरपंच, आवटी, ता. पुसद, जि. यवतमाळ**

## ज्ञानात भर

मंत्रिमंडळाचे निर्णय, उपक्रम व कामकाजाची माहिती लोकराज्यच्या अंकातून मिळते. लोकराज्यचा अंक आनंद देणारा व ज्ञानात भर घालणारा असतो. हे उपयुक्त मासिक घरोघरी असावे, सर्व वाचनालयांत असावे. ऑक्टोबर २०१५ चा अंक अधिक आवडला. यातील स्वच्छता अभियानाविषयीची सखोल माहिती आवडली. स्मार्ट शहराविषयीची माहिती, संस्कृती या सदरातील माहेरचा गोडवा 'भोंडला' मला भावले. कोकणातील लोकनृत्य नमन, जाखडी, भजन, कोळीनृत्य, भारूड याविषयी माहिती द्यावी.

**– वाय. पी. गुरव, खोरनिनको, ता. लांजा, जि. रत्नागिरी**




## उपयुक्त

लोकराज्यचा सप्टेंबरचा अंक खूप आवडला लोकराज्यचे प्रत्येक महिन्याचे अंक हे वैशिष्ट्यपूर्ण असतात. सप्टेंबरच्या अंकातून महाराष्ट्र शासनाने व्याघ्र संवर्धनासाठी केलेल्या उपाययोजनांची चांगली माहिती देण्यात आली आहे. शासनाच्या विविध विकास कामांची आणि निर्णयांची माहिती लोकराज्यमधून मिळते. त्यामुळे हे मासिक सर्वसामान्यांसाठी अतिशय उपयुक्त ठरले आहे.

**– योगेश चव्हाण, कापूसवाडी, जामनेर, जळगांव**

## लाभदायी

लोकराज्यच्या सप्टेंबर अंकातील उद्योगाविषयीचा लेख आवडला. हे मासिक स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी खूप लाभदायी आहे.

या अंकामधून शासनाच्या विविध संज्ञांची माहिती मिळाली तर विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल.

**– सारिका रामदास खिल्लारी, घाटकोपर,मुंबई.**




## उत्कृष्ट

राज्य शासनाच्या वर्षपूर्तीनिमित्त लोकराज्यने प्रकाशित केलेला नोव्हेंबरचा अंक वाचनीय ठरला आहे. विविध मंत्र्यांनी व्यक्त केलेल्या मनोगतातून राज्यातील सुरू असलेल्या कामांची माहिती मिळाली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरील लेख सुंदर झाला आहे.

**– ज्ञानेश्वर पाटील, कोल्हापूर**

## प्रतिक्रियांचे स्वागत

लोकराज्य अंकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य वाढवण्यासाठी आपल्या प्रतिक्रिया आम्हाला हव्या आहेत.

**पत्ता : संपादक, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई–४०० ०३२**

## वार्षिक वर्गणी

**वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई–४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वठणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००)**

**लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी** http://dgipr.maharashtra.gov.in

* या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.



# स्वच्छ, सुंदर, समृद्ध, स्मार्ट, सुरक्षित महाराष्ट्र

नव्या वर्षाचा प्रारंभ हा अतिशय आनंददायी आणि सकारात्मक असतो कारण नवे वर्ष सर्वांसाठी नव्या आशा आणि प्रगतीच्या संधी घेऊन येते. गेल्या वर्षात महाराष्ट्राने अनेक क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावून, नव्या महाराष्ट्राची पायाभरणी केली. २०१६ या वर्षात या पायाभरणीवर स्वच्छ, सुंदर, समृद्ध, स्मार्ट आणि सुरक्षित महाराष्ट्राची उभारणी करण्याचा संकल्प मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील त्यांच्या सहकाऱ्यांनी केला आहे. या सर्व संकल्पाचा विस्तृत आढावा हे या अंकाचे वैशिष्ट्य आहे.

अल्प पाऊस, दुष्काळ यामुळे संकटात सापडलेल्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत नुकताच १०५१२ कोटी रुपयांचा विशेष कार्यक्रम घोषित केला. यामध्ये दुष्काळग्रस्त भागात १ लाख विहिरी, जलयुक्त शिवार कार्यक्रमास आणखी गती, संत्रा व कापूस प्रक्रिया उद्योगांना चालना आदी बाबींचा समावेश आहे. या व इतर तरतुदींमुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासावर राज्य शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. ग्राम स्वच्छता, स्वच्छ जल, अधिकाधिक ग्रामीण रस्ते बांधण्याचे नियोजन, स्मार्ट ग्रामपंचायती, आदी बाबींचा यात समावेश आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांना गती देण्यात आली असून यामुळे शहरे अधिक आधुनिक, सुसह्य होणार आहेत. गेल्या महिन्यात संपूर्ण दक्षिण मुंबई सीसीटीव्हीच्या देखरेखीखाली आणण्यात आली. कालबद्धरीतीने या सीसीटीव्हीची व्याप्ती महाराष्ट्रभर वाढवण्यात येणार आहे. सुरक्षित महाराष्ट्राच्या दृष्टीने टाकलेले हे महत्त्वाचे पाऊल ठरेल.

नागरी स्वच्छता अभियानाने आता चांगलीच गती घेतली असून अनेक नगरपालिका क्षेत्रात अभिनव पद्धतीने हे स्वच्छता अभियान राबवले जात आहे. या अंकात आम्ही पाचगणी, माथेरान आणि वेंगुर्ला नगरपालिकांनी राबवलेल्या उपक्रमांच्या यशोगाथा समाविष्ट केल्या आहेत. पाचगणी हे राज्यातील पहिले स्वच्छ शहर झाले आहे.

नव्या वर्षात अधिकाधिक शहरे आणि ग्रामीण भाग स्वच्छ करण्याचा शासनाचा संकल्प आहे. या संकल्पपूर्तीच्या यशासाठी आपणा सर्वांचे मन:पूर्वक सहकार्य आवश्यक आहे.

या अंकातील संस्कृती, दिल्लीतील महाराष्ट्र, गडकिल्ले, प्रेरणा, विशेष मुलाखती ही वाचकप्रिय सदरे आपणास आणखी समृद्ध करतील. या नव्या वर्षात लोकराज्य (मराठी,उर्दू), महाराष्ट्र अहेड ही नियतकालिके, दिलखुलास (आकाशवाणी), जय महाराष्ट्र (सह्याद्री वाहिनी), महान्यूज वेब पोर्टल ही आमची माध्यमे अधिक आकर्षकरीत्या विविधांगी नवीन उपक्रम राबवणार आहेत.

हे नवे वर्ष आमचे सर्व वाचक, लेखक, वर्गणीदार यांना आनंदाचे आणि यशस्वी जावो ही मन:पूर्वक सदिच्छा.

**मनीषा पाटणकर-म्हैसकर**
**सचिव**
**(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)**

# शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य



**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी १० हजार ५१२ कोटी रुपयांचा विशेष कार्यक्रम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दि. १६ डिसेंबर २०१५ रोजी जाहीर केला. गेल्या वर्षभरात सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना १०,५८२ कोटी रुपयांची मदत देण्यात आली. राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत आजवरच्या इतिहासात मिळाली नसेल इतकी मोठी मदत या वर्षी शेतकऱ्यांना मिळाली आहे. शेतकरी बांधवांच्या पाठीशी सर्वांनी एकत्रितपणे उभे राहून त्याला नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करूया, असे आवाहन करून शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा स्पष्ट निर्वाळा मुख्यमंत्र्यांनी दिला.**

राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर विधानसभेत झालेल्या चर्चेवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थिती व संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी व त्याला दिलासा देण्यासाठी शासन करत असलेल्या विविध उपाययोजनांबाबत विस्तृत ऊहापोह केला. मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, दुष्काळामुळे राज्यासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. गेली चार वर्षे सातत्याने दुष्काळाचा सामना करावा लागल्याने त्याचे दुष्परिणाम राज्याला भोगावे लागत आहे.

शेतकऱ्यांच्या साहाय्यासाठी शासनाने १० हजार ५१२ कोटी रुपये मदतीचा विशेष कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये कापूस आणि सोयाबीनच्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एक हजार कोटी रुपये, मागेल त्याला शेततळे या योजनेसाठी २५०० कोटी रुपये, ३३ हजार विहिरींचे काम पूर्ण करण्यासाठी ७५० कोटी रुपये, वीज जोडणी देण्यासाठी एक हजार कोटी रुपये देण्यात येतील. शेतकरी आत्महत्या हा गंभीर प्रश्न आहे त्यावर उपाययोजना म्हणून शेतीमधील गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढली पाहिजे.

### नरेगा अंतर्गत दुष्काळग्रस्त भागात एक लाख विहिरी

शेतकऱ्यांना पाणी आणि वीज देण्यासाठी धडक कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत ५२ हजार वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. मार्च २०१५ पर्यंतचे पेड पेंडिंग जून २०१६ पर्यंत पूर्ण केले जातील. ६५ हजार नवीन वीज जोडण्या देण्यात येतील. या जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत ४९ हजार विहिरींचे काम पूर्ण करण्यात आले आहे. शेतकऱ्याला वीज आणि विहीर तसेच विहिरीतील पाणी मिळाल्यास शेती उत्पादनाला फायदा होतो हे लक्षात घेऊन आगामी काळात विहीर बांधण्याचा धडक कार्यक्रम हाती घे-तला जाईल. अजून २५ हजार विहिरी बांधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दुष्काळग्रस्त भागात एक लाख विहिरी नरेगांतर्गत नव्याने बांधण्यात येणार आहेत. दुष्काळी भागात मोठ्या प्रमाणावर नरेगा अंतर्गत कामे सुरू केली आहे. आतापर्यंत नरेगाच्या माध्यमातून ४१७ लाख मनुष्य दिवसाच्या कामाची निर्मिती झाली आहे.

### संस्थात्मक कर्जाचे नेटवर्क

शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी शासनाने १९,७१९ सावकारग्रस्त शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. या शेतकऱ्यांच्या जमिनी आणि कागदपत्रे त्यांना परत मिळतील, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पीक कर्जाच्या रूपांतरणासाठी शासनाने ३,५०४ कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. राज्यातील खातेदार शेतकऱ्यांचे प्रमाण ४० ते

## असा आहे १० हजार ५१२ कोटी रुपयांचा विशेष कार्यक्रम

- दुष्काळामुळे बाधित १५ हजार ७४७ गावांमधील शेतकऱ्यांना मदत. बाधित ५३ लाख १९ हजार शेतकऱ्यांना निविष्ठा स्वरूपात मदत : ७४१२ कोटी रुपये (८२ लाख शेतकऱ्यांना पीकविमा २८०० कोटी+ विमा नसलेल्या कापूस/सोयाबीन उत्पादकांसाठी १०३४ कोटींसह)
- जलयुक्त शिवार : १००० कोटी रुपये
- मागेल त्याला शेततळ्यांसाठी : २५० कोटी रुपये (याशिवाय मार्च नंतरच्या कालावधीसाठी एकूण २५०० कोटी रुपये)
- धान खरेदीसाठी प्रोत्साहनपर अनुदान २०० रुपये प्रतीक्विंटल: १०० कोटी रुपये
- ३३ हजार विहिरींसाठी: ७५० कोटी रुपये
- विहिरींच्या वीज जोडणीसाठी इन्फ्रा : १००० कोटी रुपये

एकूण : १० हजार ५१२ कोटी रुपये

(टीप : या रकमेत शेततळ्यांसाठी या वर्षातील रक्कम आहे.)



४२ टक्के असून ते वेगवेगळ्या बँकांतून कर्ज घेतात. मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणावर शेतकरी संस्थात्मक कर्जापासून वंचित राहतात. अशा सुमारे साडेसहा लाख शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्जाच्या नेटवर्कमध्ये आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमधील ९ टक्के शेतकऱ्यांना नव्याने संस्थात्मक कर्जाच्या कार्यक्षेत्रात आणण्यात आले आहे.

### जलयुक्त शिवार : आमदारांच्या अध्यक्षतेखाली समिती

जलयुक्त शिवार योजना विकेंद्रित जलसाठे निर्माण करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. आतापर्यंत ६,२०० गावांमध्ये जलयुक्त शिवाराच्या विविध कामांच्या माध्यमातून २४ दशलक्ष घनफूट पाणीसाठा निर्माण झाला आहे. जलयुक्त शिवाराच्या कामांचे संनियंत्रण करण्यासाठी आमदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका समिती स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी आमदार निधीतून जितका निधी दिला जाईल तेवढाच निधी राज्य शासन देखील देईल. या वर्षी देखील ५ हजार गावे



## अशी मदत, असा दिलासा..




- दुष्काळग्रस्त कृषी पंपाच्या चालू वीज देयकात ३३.५ टक्केसूट दिल्याने १९,४५,१८३ शेतकरी लाभार्थी, सुमारे ३५३ कोटी रुपये लाभ
- परीक्षा शुल्क माफी. यातून शेतकरी कुटुंबातील सुमारे ९.५ लाख विद्यार्थ्यांना ४० कोटींचा दिलासा
- गेल्या वर्षभरात सुमारे एक कोटीपेक्षा अधिक शेतकऱ्यांना १०,५८२ कोटी रुपयांची मदत देण्यात आली. राष्ट्रीय कृषी विमा योजनेंतर्गत आजवरच्या इतिहासात मिळाली नाही, इतकी मोठी मदत शेतकऱ्यांना मिळाली.
- सुमारे ४२ लाख शेतकऱ्यांना १८०६ कोटी रुपये नुकसानभरपाई विम्याच्या माध्यमातून देण्यात आली.
- नव्या आर्थिक वर्षात ८२.५७ लाख शेतकरी विम्याच्या कक्षेत आले.
- ६१,२३,२५९ शेतकरी अन्नसुरक्षा योजनेचा लाभ घेत असून, आतापर्यंत एक लाख मेट्रिक टनाहून अधिक धान्याचे वाटप
- राजीव गांधी जीवनदायी योजना जाहीर केल्यापासून आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमध्ये २४,११८ शेतकऱ्यांना योजनेचा लाभ
- गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेमुळे राज्यातील सर्व शेतकऱ्यांना अपघात विम्याचा लाभ. यापूर्वी केवळ १ लाख रूपये नुकसानभरपाई पोटी मिळायचे आता २ लाख रूपये मिळतील.
- राज्यातील ६२०० गावांमध्ये जलयुक्त शिवारच्या विविध कामांच्या माध्यमातून २४ टीएमसी इतक्या पाणीसाठ्याची निर्मिती
- जलयुक्त शिवारबाबत आमदारांच्या अध्यक्षतेखाली तालुका पातळीवर समित्या
- जलयुक्त शिवार योजनेसाठी आणखी पाच हजार गावांची निवड. जनसहभाग देणाऱ्या गावांचा आणखी समावेश करणार.
- गेल्या वर्षीपेक्षा कर्ज मिळणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत ६.५ लाखांची वाढ, कर्जाच्या रकमेत ४१२९ कोटी रुपयांची वाढ.
- गेल्या वर्षात ४९ हजार विहिरी बांधण्यात आल्या. यापूर्वी एका वर्षात केवळ १६ हजार विहिरी बांधल्या जायच्या.
- रोजगार हमी योजना : २०१५-१६ मध्ये आतापर्यंत ४१७.६८ लाख मनुष्यदिन निर्मिती. यावर खर्च ११८१.३९ कोटी.
- २०१५-१६ या वर्षात २६८२९ वीज जोडण्या अवघ्या आठ महिन्यात दिल्या. जून २०१६ पर्यंत पेड पेंडिंग पूर्ण करणार.
- रेमंडचा अमरावतीत नवा उद्योग. १५०० कोटींची गुंतवणूक, १० हजार रोजगार निर्मिती होणार.
- मोर्शीत १०० एकर जागेवर संत्रा प्रक्रिया प्रकल्प, नोगा ब्रँड कायम ठेवणार.

## मागेल त्याला शेततळे...



**अवर्षणप्रवण तालुक्यात 'मागेल त्याला शेततळे' ही योजना नव्याने सुरू करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्याला थेट अनुदान देण्यात येणार आहे.**

निवडण्यात आली आहेत. जलयुक्त शिवारच्या माध्यमातून या वर्षीपासून नद्यांच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. या पाच हजार गावांव्यतिरिक्त स्वयंस्फूर्तीने लोकसहभाग दाखवणारी गावेदेखील जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडण्यात येतील.

### अमरावती येथे १५०० कोटी रुपये गुंतवणुकीचा प्रकल्प

शेतकऱ्यांची पत वाढली पाहिजे. शेती प्रक्रिया उद्योग वाढला पाहिजे. या सर्व उपाययोजनांतून शेतकऱ्यांना दुष्काळाच्या छायेतून बाहेर काढणे शक्य होईल. अमरावती येथे एकात्मिक टेक्स्टाइल पार्कमध्ये रेमंड उद्योग



समूहाच्या सहकार्यातून १५०० कोटी रुपये गुंतवणुकीचा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. २१ डिसेंबरला या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात येणार असून यामुळे १० हजार लोकांसाठी रोजगार निर्माण होईल. यासोबतच ११ जिल्ह्यांमध्ये कापसावर प्रक्रिया करणारे युनिट्सदेखील सुरू करण्यात येणार आहेत.

### अन्नसुरक्षा योजना

आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यातील ६२ लाख शेतकऱ्यांना अन्नसुरक्षा योजनेंतर्गत तीन रुपये प्रती किलो दराने तांदूळ आणि दोन रुपये प्रती किलो दराने गहू देण्यात येत आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर वैद्यकीय उपचार आणि शस्त्रक्रिया करण्यात आली. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेच्या माध्यमातून नुकसानभरपाई दुप्पट करण्यात आली असून, ती आता दोन लाख रुपये करण्यात आली आहे. या अपघात विमा योजनेसाठी कुठलाही अर्ज करण्याची गरज नाही, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## मोर्शी येथे संत्रा प्रक्रिया उद्योग प्रकल्प

**सार्वजनिक खाजगी भागीदारी माध्यमातून मोर्शी येथे राज्य शासन, जैन इरिगेशन आणि कोकोकोला कंपनीच्या सहकार्यातून संत्रा प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात येणार आहे. एक हजार एकरवर नवीन संत्र्यांची लागवड करण्यात येत आहे. या प्रक्रिया उद्योगात शासनाचा नोगा हा ब्रँड कायम राहील. शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजारव्यवस्था बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. भंडारा, गोंदिया येथे नेस्ले कंपनीच्या माध्यमातून दूध प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात येईल. दुग्ध उत्पादनाची गुणवत्ता वाढवण्यासाठी या प्रकल्पाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येतील.**



### अतिनैराश्य आलेल्या शेतकऱ्यांसाठी समुपदेशन

सातत्याच्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी घोर निराशेत गेल्यामुळे त्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी समुपदेशन सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या बुद्धिमत्तेवर आमचा पूर्ण विश्वास आहे. मात्र जेव्हा अतिनैराश्य येते त्यावेळी समुपदेशनाची गरज भासते, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. शेतकऱ्यांना पीक विम्याचे कवच लाभावे यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत असून यावर्षी ८२ लाख शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेत सहभाग नोंदवला आहे. जालना, उस्मानाबाद, बीड आणि परभणी या जिल्ह्यांमधील ९० टक्के शेतकऱ्यांनी पीक विमा काढला आहे. सोयाबीनचे ७० टक्के क्षेत्र पीकविम्याखाली आणले आहे. दुष्काळग्रस्त भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी कृषिपंपांच्या चालू वीज देयकात ३३.५ टक्के सूट दिल्याने त्याचा लाभ १९ लाख ४५ हजार १८३ शेतकऱ्यांना झाला. शेतकरी कुटुंबातील सुमारे साडेनऊ लाख विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्यात आले.

**टीम लोकराज्य**

# नव्या महाराष्ट्राची उभारणी

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

सरत्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना गेल्या वर्षाच्या वाटचालीचे अवलोकन-आत्मपरीक्षण करण्यासह आम्ही नव्या वर्षासाठी एक रोडमॅप निश्चित केला आहे.

मावळत्या वर्षातील आमचे सर्वात महत्त्वाचे यश म्हणजे जलयुक्त शिवार अभियान. महाराष्ट्रासाठी आमुलाग्र बदल घडवणारे हे महत्त्वाकांक्षी अभियान आम्ही प्रभावीपणे राबवत आहोत. त्याची सुरुवात निश्चितच आश्वासक असून टंचाईमुक्त महाराष्ट्रासाठीच्या पुढील नियोजनास हुरूप देणारी आहे. राज्याची सूत्रे हाती घेताना शेतीचा शाश्वत विकास करून, शेतकरी आत्मनिर्भर करणे हा सर्वाधिक प्राधान्याचा विषय होता. त्या दृष्टीने राज्यातील शिवारे जलयुक्त करण्यासाठी आम्ही या अभियानाच्या माध्यमातून ऐतिहासिक पाऊल टाकले. या अभियानाच्या पहिल्या वर्षाचे पहिले पाऊल व्यापक लोकजागृती करण्यात यशस्वी ठरले आहे. पुढील चार वर्षांत महाराष्ट्र दुष्काळमुक्त, टँकरमुक्त, सिंचनयुक्त आणि समृद्ध करण्याचा निर्धार आहे. नव्या वर्षात सहा हजाराहून अधिक गावात हे अभियान नव्या उमेदीने आम्ही राबवत आहोत. यासोबत शेतकऱ्यांसाठी साडेदहा हजार कोटी रुपयांच्या विशेष कार्यक्रमासह 'मागेल त्याला शेततळे' या घोषणेचीही पुरेपूर अंमलबजावणी करणार आहोत.



## फार्म टू फॅशन

शेतकरी आत्महत्यांनी आम्ही अस्वस्थ आहोत. एका शेतकऱ्याची आत्महत्या आमच्यासाठी क्लेशदायी आहे. शेती प्रश्नाचे व्यापक आकलन करून, या क्षेत्रातील प्रश्नांची कायमस्वरूपी सोडवणूक करण्याचे आमचे नियोजन आहे. त्यासाठी वरवरच्या लोकानुनयी उपाययोजना टाळून, दीर्घकालीन विकासाचा कार्यक्रम आम्ही राबवत आहोत. कृषी पिकांचे 'व्हॅल्यू ॲडीशन' अधिकाधिक प्रमाणात करण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यासोबत राज्यात एकात्मिक वस्त्रोद्योग प्रकल्पांच्या माध्यमातून, 'फार्म टू फॅशन' हे मा. प्रधानमंत्र्यांचे स्वप्न साकारत आहोत. याशिवाय राज्यातील ऊसाचे पीक संपूर्णतः ठिबक सिंचनावर यावे, या दृष्टीने आम्ही तीन वर्षांचे नियोजन केले आहे. त्या दृष्टीनेही या वर्षभरात ठोस कार्यवाही करणार आहोत.

## लोकाभिमुख आणि जबाबदार प्रशासन

लोकाभिमुख आणि जबाबदार प्रशासन हा आमचा नेहमीच जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. गेल्या वर्षभरात याबाबत आम्ही आशादायी सुरुवात केली. सेवा हक्क कायदा अमलात आणण्यासह अनेक महत्त्वाच्या सेवा ऑनलाइन देण्यास प्रारंभ झाला आहे. त्यांची संख्या वाढवण्यासह सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सेवांची गुणवत्ता आणि गतिमानता वाढवणार आहोत. राज्यात कायदा आणि सुव्यवस्था उत्तम राखण्यासाठी पोलीस दलाचे सक्षमीकरण आणि सुसज्जीकरण वेगाने करीत आहोत. गुन्हेसिद्धतेचा दर लक्षणीय वाढवण्यात शासनास यश आले असले तरी, तो अजूनही वाढण्यास वाव आहे. त्या दृष्टीने सर्व संबंधित यंत्रणेत मोठ्या प्रमाणात सुधारणा घडवून आणणार आहोत.

सर्व पोलीस ठाणी ऑनलाइन जोडली जाणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. तसेच सीसीटीव्ही निगराणीखाली असलेले पुणे हे देशातील पहिले शहर ठरण्याचा मान आम्ही मिळवला आहे. दक्षिण मुंबईतील सीसीटीव्ही निगराणी पूर्णपणे कार्यान्वित झाली असून, नव्या वर्षात संपूर्ण मुंबईचे सीसीटीव्ही नेटवर्क पूर्णपणे कार्यान्वित होईल आणि जगातील कोणत्याही शहरातील ते सर्वात मोठे नेटवर्क असेल.

## सर्वांसाठी घरे

इ.स. २०२२ पर्यंत 'सर्वांसाठी घरे' असा संकल्प मा. प्रधानमंत्री यांनी केला आहे. त्यासाठी महाराष्ट्र कटिबद्ध असून, राज्यातील शहरांमधील बेघरांना हक्काची घरे देण्यासाठी गृहनिर्माण धोरणाची आखणी करण्यात येत आहे. या नवीन वर्षात त्या दृष्टीने ठोस अशा कार्यवाहीस प्रारंभ झाला असेल. राज्यातील विविध पायाभूत सुविधा जागतिक दर्जाच्या असाव्यात, असा आमचा निर्धार आहे. त्या दृष्टीने अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे नियोजन आम्ही गेल्या वर्षभरात केले. नव्या वर्षात या प्रकल्पांच्या प्रत्यक्ष उभारणीस सुरुवात व्हावी, हा प्रयत्न आहे. महाराष्ट्राचा चेहरामोहरा बदलणारा मुंबई-औरंगाबाद-नागपूर सुपर कम्युनिकेशन हायवे, मुंबईतील कोस्टल रोड, मुंबई ट्रान्सहार्बर लिंक, मुंबईतील विस्तारासह नागपूर आणि पुण्यातील मेट्रो प्रकल्प, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ या प्रकल्पांच्या कामांना याच वर्षात सुरुवात अपेक्षित आहे.

## उद्योग सुलभता

राज्यात उद्योग सुलभता वाढवण्यासाठी गेल्या वर्षभरात झालेले प्रयत्न समाधानकारक असले तरी ते पुरेसे नाहीत. उद्योगाच्या उभारणीत असलेल्या लालफितीचे अडथळे दूर करण्यासह, सर्व परवानग्या ऑनलाइन करण्यात येत आहेत. निम्म्यावर आलेल्या परवानग्यांची संख्या अजून निम्म्यावर आणण्याचे, आवाहन या वर्षात आम्हास पेलावयाचे आहे. विविध परदेश दौऱ्यांच्या माध्यमातून जागतिक पातळीवर महाराष्ट्राचे जोरदार मार्केटिंग करण्यात आम्हास यश लाभले आहे. राज्यात प्रस्तावित गुंतवणूक करून घेण्यासह कौशल्य विकासाच्या माध्यमातून तरुणाई रोजगारक्षम करण्यासाठी याच वर्षात प्रत्यक्ष प्रारंभ होत आहे. त्या दृष्टीने गेल्याच महिन्यात बॉशसारख्या संस्थेशी महत्त्वपूर्ण करार झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्र हे महाउद्योगराष्ट्र करण्याच्या दृष्टीने या वर्षात निर्णायक कार्यवाही होईल.

राज्याची तिजोरी सुदृढ करण्यासाठी विविध उपाययोजनांच्या माध्यमातून बचतीचे मार्ग शोधत आहोत. त्यासोबत अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करण्यासह विविध स्रोतांच्या माध्यमातून उत्पन्नवाढीचा आमचा प्रयत्न आहे.

**शब्दांकन : हेमराज बागूल**

# गतिमानतेला कृतिशीलतेची जोड

**गेल्या** वर्षी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर राज्यातील सामान्य कष्टकरी शेतकऱ्यांना, सर्वसामान्य नागरिकांना, अल्पसंख्याक बांधवांना अधिक गतिमान आणि पारदर्शक कारभाराचा अनुभव मिळावा यासाठी आम्ही अनेक अभिनव योजनांचे संकल्प केले होते. वर्षभराचा आढावा घेतला असता, आम्ही केलेल्या संकल्पांची पूर्ती करण्यामध्ये नक्की यशस्वी झालो आहोत. मात्र, सर्वच संकल्प पूर्ण झाले असे नाही, तर सामान्यांना दिलासा देणारे, त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारे असे निर्णय आम्ही घेतले आहेत. गतवर्षी केलेल्या संकल्पांच्या पूर्तीसाठी नियोजनबद्धरीतीने कार्यवाही करून भविष्यातही राज्यातील शेतकरी बांधव आणि सर्वसामान्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्याचा संकल्प केला आहे. त्याच्या पूर्ततेसाठी आम्ही सज्ज आहोत. भविष्यात अधिक जलद, गतिमान प्रशासनाचा अनुभव नागरिकांना मिळेल. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांबरोबरच शेती आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी नवीन वर्षी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. विविध दाखले तसेच अन्य काही प्रमाणपत्र ऑनलाइन देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महसूल आणि अल्पसंख्याक विभाग आणखी लोकाभिमुख करण्याचा संकल्प आहे.



**एकनाथराव खडसे**
(महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री)

**शब्दांकन : अजय जाधव**

## संकल्पाची दिशा

- कृषी क्षेत्राचा विकास करताना विविध योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवणार
- शेतीपूरक आणि प्रक्रिया व्यवसायावर भर देणार
- महसूल कार्यालयात नागरिकांना हेलपाटे मारावे लागू नये, यासाठी विविध प्रमाणपत्र ऑनलाइन देणार
- जुन्या दस्तवेजाचे जतन आणि डिजिटलायझेशनला प्राधान्य देणार
- शिक्षणाबरोरच अल्पसंख्याक समाजातील मुला-मुलींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार
- सामान्यांच्या विकासाबरोबरच शेतकरी बांधवांना सशक्त करणार

# अर्थव्यवस्थेला स्थैर्य

**राजकारण** हे सेवेचे साधन आहे, व्रत आहे, असे माननारा मी आहे. केवळ मोर्चे काढण्यासाठी किंवा धरणे आंदोलने करण्यासाठी हे क्षेत्र नाही.

लोकांनी प्रचंड विश्वासाने आणि बहुमताने आम्हाला निवडून दिले ते आम्ही मागील सरकारपेक्षा अधिक चांगले काम करावे, महाराष्ट्राला प्रगतीच्या मार्गावर न्यावे यासाठी. एका शब्दात सांगायचे झाले तर गरिबांच्या सन्मानासाठी महाराष्ट्र सरकार मैदानात हा एक ओळीचा संकल्प आमच्या सर्वांच्या डोळ्यासमोर होता.

घटनाकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या एका कलमात खूप चांगले म्हटले आहे. ते म्हणजे, कोणतीही चूक नसताना एखाद्या व्यक्तीस हलाखीचे जीवन जगण्याची वेळ येत असेल तर त्याला या अवस्थेतून बाहेर काढण्याची जबाबदारी ही कल्याणकारी राज्य म्हणून सरकारवर आहे. एकीकडे घटनेतील हा विचार आमच्या मनात होता. दुसरीकडे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा चिंता आणि चिंतनाचा विषय झाला आहे.

पायाभूत सुविधांचा विकास करणेही गरजेचे ठरत आहे. राज्यातील वनाच्छादित भूभाग वाढवणे, शेतकऱ्यांना वेळेत निधी उपलब्ध करून देणे आणि राज्याची आर्थिक घडी नीट बसवणे हे नव्या वर्षाचे संकल्प आहेत.



**सुधीर मुनगंटीवार**
(वित्त आणि नियोजन, वने मंत्री)

**शब्दांकन : डॉ. सुरेखा म. मुळे**

## संकल्पाची दिशा

- राज्य उत्पन्न वाढवणे आणि अनुत्पादक खर्चात कपात करणे या दोन्ही गोष्टींची सांगड घालून अर्थव्यवस्थेला स्थैर्य प्राप्त करून देणार
- आर्थिक घडीसाठी काटकसरीवर भर देणार
- पायाभूत सुविधांच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य
- लोकसहभागातून वनक्षेत्र वाढवणार
- वन वरदान ठरावे, यासाठी वनांमधून रोजगार संधीची निर्मिती
- राज्य शासनाच्या तिजोरीवर ताण पडला तरी शेतकऱ्यांना मदत करणार

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

# गुणवत्तेला प्राधान्य, दर्जात सुधारणा



**विनोद तावडे**
(शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण,मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य मंत्री)

**नव्या** वर्षात शिक्षण क्षेत्रात दुरगामी परिणाम करणारे निर्णय आम्ही घेणार आहोत.


मुलांच्या पाठीवरचे दप्तराचे ओझे कमी करण्याचे वचन दिले होते. जून २०१६ पासून दप्तराचे ओझे कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. दहावीप्रमाणे आता बारावीमध्ये अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचीही फेरपरीक्षा लगेचच घेण्यात येतील. चांगले डॉक्टर, चांगले खेळाडू तयार करण्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येतील. चित्रपट व्यावसायिकांच्या परवानग्या तातडीने देण्यावर भर दिला जाईल. राज्यातील प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयांची गुणवत्ता वाढवण्यात येईल. कौशल्य आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करण्यावर भर देण्यासाठी लक्ष देणार आहे. महाराष्ट्रातील अनेक खेळाडूंना विविध खेळांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळत आहे. हे लक्षात घेता २०२० सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी या खेळाडूंना उत्कृष्टरीत्या तयारी करता यावी यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. महाराष्ट्रात चित्रपट किंवा लघुचित्रपट निर्मिती करू इच्छिणाऱ्यांना एका दिवसात परवानगी मिळावी म्हणून संपूर्ण प्रक्रिया लवकरच ऑनलाईन करण्यात येईल. चित्रपट नगरीला चित्रपट निर्मिती केंद्रासोबतच पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्यात येईल.

**शब्दांकन : वर्षा फडके**

## संकल्पाची दिशा

- **वैद्यकीय महाविद्यालयांची गुणवत्ता वाढवण्यावर भर**
- **कौशल्य आधारित अभ्यासक्रम उपलब्ध करण्यावर भर**
- **२०२० सालच्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी या खेळाडूंना तयारी करता यावी यासाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देणार**
- **चित्रपट किंवा लघुचित्रपट निर्मिती करू इच्छिणाऱ्यांना एका दिवसात परवानगी मिळणार**
- **गोरेगाव चित्रनगरी आणि बॉलीवूड म्युझियम विकसित करणार**

# परवडणारी घरे, कामगारांना न्याय



**प्रकाश महेता**
(गृहनिर्माण, खनिकर्म आणि कामगार मंत्री)

**नव्या** वर्षात गृहनिर्माण विभागांतर्गत सर्वसामान्यांना परवडतील अशा अधिकाधिक घरांची उपलब्धता आणि झोपडपट्टी पुनर्वसन व संरक्षण तसेच कामगारांचे परिपूर्ण कल्याण विकास आणि खनीज संपत्तीचे संवर्धन व जतन यावर लक्ष केंद्रित करणार आहे. राज्यातील इतर ठिकाणी शासनाच्या घरकुल योजनांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करून परवडणारी घरे उपलब्ध करण्याचा मानस आहे. असंघटित कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत झोपड्यांचे सर्वेक्षण करून झोपडपट्टी धारकांना स्मार्ट कार्ड देण्यात येतील. याच अंतर्गत गावठाण जागेवरील आदिवासी व कोळी बांधवांनाही हक्काचा निवारा मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल. कुशल कामगार वर्ग निर्माण करण्यासाठी कामगारांना कौशल्यावर आधारित प्रशिक्षण देण्यात येईल.

कामगारांना आधुनिक कौशल्याधिष्ठित बनवण्यासाठी कामगार कायद्यात बदलाचा मसुदा तयार केला जाईल. माथाडी कामगार कायद्याच्या तरतुदींचा गैरवापर थांबवण्यासाठी कामगार कायद्यात सुधारणा करण्याचा मानस आहे.

कामगारांचे न्याय हक्क अबाधित राहून त्यांना संरक्षण मिळेल याची यासाठी विशेष काळजी घेण्यात येईल.

**शब्दांकन : जयश्री कोल्हे**

## संकल्पाची दिशा

- **कामगारांना आधुनिकरीत्या कौशल्याधिष्ठित बनवण्यासाठी कामगार कायद्यात बदलाचा मसुदा तयार करणार.**
- **अल्प उत्पन्न गट व मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींना परवडणारी घरे उपलब्ध करून देणार**
- **झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत (एसआरए) झोपड्यांचे सर्व्हेक्षण करून झोपडपट्टी धारकांना स्मार्ट कार्ड देणार**
- **राज्यातील सुमारे तीन कोटी असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापणार**
- **झोपडपट्टीमुक्तीसाठी विविध कामे करणार**

# गतिमान रस्ते, पारदर्शक कारभार

**सहकार**, पणन, वस्त्रोद्योग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा मंत्री म्हणून गेल्या वर्षभरात अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले असून या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबरोबरच नागरिकांच्या हिताला प्राधान्य आणि पारदर्शक कारभार हा नवीन वर्षाचा संकल्प आहे.

राज्याच्या विकासात रस्त्यांचे जाळे महत्त्वाची भूमिका बजावत असतात, म्हणूनच रस्ते विकासाला सर्वप्रथम प्राधान्य देण्याचे निश्चित केले आहे. या धोरणाची सुरुवात म्हणून सरकारच्या वर्षपूर्तीनिमित्त राज्यभरात एकाच दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे १००० नवीन कामे सुरू केली.



**चंद्रकांत (दादा) पाटील**
(सहकार, पणन, वस्त्रोद्योग आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री)

निवडणुकीतील वचनपूर्तीचे पहिले पाऊल म्हणजे राज्यातील ९१ पैकी १२ टोल नाके पूर्णत: बंद तर विभागाच्या ७९ पैकी ५३ टोलनाक्यांवर कार, जीप, एस.टी. व स्कूलबसेसना टोलमुक्ती देण्यात आली. निविदा प्रक्रिया पारदर्शक होण्यासाठी ३ लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या कामांना ई-निविदा प्रक्रिया लागू करण्यात आली आहे.

राज्यात सहकाराचे जाळे सर्वदूर वाढण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. सहकारात आर्थिक शिस्त, रस्ते विकास आणि वस्त्रोद्योगाचा विकास हेच पुढील वर्षाचे संकल्प आहेत.

**शब्दांकन : विलास बोडके**

### संकल्पाची दिशा

- रस्ते विकासाला सर्वप्रथम प्राधान्य
- राज्यात एकूण ३,३६,००० कि.मी लांबीच्या रस्त्यांचे जाळे विकसित करणार
- सहकाराचे जाळे राज्यात सर्वदूर वाढण्यासाठी प्रयत्न करणार
- थेट ग्राहकांपर्यंत शेतीमाल पोहोचवता यावा, यासाठी शेतकऱ्यांना परवाना शुल्कात सूट देण्याबरोबरच अडत पद्धतीत कालबद्ध सुधारणा करणार
- राज्यातील साखर कारखान्यांचे व्यवस्थापकीय संचालक आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेमताना तज्ज्ञांची नियुक्ती करणार

# सक्षम महिला आणि ग्रामसमृद्धी

**नव्या** वर्षात महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी व महिला बचतगटाच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन केल्या जातील. महिलांना व्यावसायिक वाहन चालकाचे प्रशिक्षण दिले जाईल.

शासनाने येत्या तीन वर्षात मुलींच्या वसतिगृहांना संरक्षक भिंती बांधण्याचा संकल्प केला आहे. राज्यातील सर्व ग्रामपंचायती स्मार्ट ग्रामपंचायती बनवण्याचा मानस आहे. पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेंतर्गत २ हजार ६२० कि.मी.लांबीचे नवीन ग्रामीण रस्ते बांधणीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पुढील



**पंकजा मुंडे**
(ग्रामविकास, जलसंधारण, महिला व बालकल्याण, रोजगार हमी योजना मंत्री)

२ वर्षात राज्यातील ३५ वर्षे वयोगटाच्या साधारण ५८ हजार बेरोजगार तरुणांना खात्रीचा रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यासाठी दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना प्रभावीपणे राबवण्यात येईल. या प्रशिक्षणासाठी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, कर्जबाजारी, दुष्काळग्रस्त, नापिकी झालेले शेतकरी, घरातील कर्त्या व्यक्तींचा मृत्यू झालेल्या कुटुंबातील तरुण यांची निवड करण्यात येणार आहे. दुष्काळमुक्तीच्या कामांना प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीत वाढ करण्यावर भर देण्यात येईल.

**शब्दांकन : संगीता बिसांद्रे**

### संकल्पाची दिशा

- जलयुक्त शिवार राज्यात आणखी प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रयत्न करणार
- महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यासाठी व महिला बचतगटाच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ स्थापन करणार
- पंतप्रधान ग्रामीण सडक योजनेंतर्गत २ हजार ६२० कि.मी.लांबीचे नवीन ग्रामीण रस्ते बांधणीचे उद्दिष्ट
- दिनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून ५८ हजार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणार

# वंचितांना मुख्य प्रवाहात आणणार

स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

**गेल्या** वर्षी आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना सकस आहार मिळावा यासाठी आम्ही मध्यवर्ती स्वयंपाकगृह ही संकल्पना यशस्वी केली आहे. नव्या वर्षात ही संकल्पना आणखी सक्षम व बळकट करण्याकडे प्राधान्याने लक्ष देणार आहे. आदिवासी संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी व ती सर्वसामान्यापर्यंत पोहोचवण्यासाठी नागपूर येथे गोंडवाना म्युझियम या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी करणार आहोत. आदिवासींच्या जीवनाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाच्या उपक्रमांना आणखी गतिमान केला जाईल. अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रभावीपणे प्रयत्न केले जातील. अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया-स्तनदा मातांच्या आहारासाठी डॉ. अब्दुल कलाम अमृत योजनेचा शुभारंभ पालघर जिल्ह्यात करण्यात आला. यासारख्या अनेक अभिनव योजना सुरू करून त्या यशस्वीपणे राबवण्यावर भर दिला जाईल. आदिवासी बांधवांच्या सर्वांगीण कल्याणासाठी संकल्प केले आहेत. आदिवासी बालकांना सकस आहार, परिपूर्ण शिक्षण, रोजगार, आरोग्याच्या सुविधा, शाळा-वसतिगृह बांधकामाला चालना, रूग्णालय निर्मितीला प्राधान्य दिले जाईल. कुपोषण नियंत्रणावर भर देण्यात येईल.



**विष्णू सवरा**
(आदिवासी विकास मंत्री)

**शब्दांकन : काशीबाई थोरात**

## संकल्पाची दिशा

- टप्प्याटप्प्याने राज्यात मध्यवर्ती स्वयंपाकगृहाची संकल्पना राबवून आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना सकस आहार देण्यावर लक्ष केंद्रित करणार
- नागपूर येथे गोंडवाना म्युझियम या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अंमलबजावणी करणार
- आदिवासी विकास महामंडळाच्या उपक्रमांना आणखी गतिमान करणार
- अनुसूचित क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न

# अत्याधुनिकतेवर भर

**नव्या** वर्षात अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण आणि अन्न व औषध प्रशासन हे विभाग अधिकाधिक सक्षम व लोकाभिमुख करण्याचा माझा संकल्प आहे. रास्त भाव धान्य दुकानात वितरण व्यवस्था स्वयंपूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यात उत्पादित होणारे अन्नधान्य शेतकऱ्यांकडून खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून ती सार्वजनिक वितरण व्यवस्थे (रेशनिंग) मार्फत वितरित करण्यात येणार आहे. यंदाचा महत्त्वाचा संकल्प म्हणजे राज्यात फूड कार्पोरेशनची स्थापना हा आहे. त्याचे काम या वर्षी पूर्ण करण्याचा मानस आहे. दुसरा संकल्प म्हणजे केरोसिनमुक्त प्रभाग योजना प्रभावीपणे राबवण्यात येईल. रेशनच्या दुकानात बायोमेट्रिक ओळख प्रणाली संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहे. संगणकीकृत शिधापत्रिकांना आधार सिडिंगचे काम यंदा पूर्ण करण्यात येणार आहे. शिधा वाटप यंत्रणा आणखी मजबूत करण्यासाठी संगणकीकृत वितरण साखळी व्यवस्था संपूर्ण राज्यात राबवण्यात येणार आहे. औषध प्रशासन विभाग संपूर्ण संगणकीकृत करून या विभागाचे सर्व परवाने, अर्ज हे ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या विभागाच्या प्रयोगशाळांचे बळकटीकरणाचा मानस आहे.



**गिरीश बापट**
(अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री)

**शब्दांकन - नंदकुमार वाघमारे**

## संकल्पाची दिशा

■ रास्त धान्य पुरवठ्यामध्ये काळ्याबाजाराला आळा घालण्यासाठी सर्वोच्च प्राधान्य ■ स्वस्त दरात औषध मिळण्यासाठी राज्यात ४०० दुकाने सुरू करण्याचा प्रयत्न ■ राज्यात फूड कार्पोरेशनची स्थापना करणार ■ केरोसिनमुक्त प्रभाग योजना प्रभावीपणे राबवणार ■ ग्राहकांची फसवणूक टाळण्यासाठी दूधपट्टी (मिल्क स्ट्रिप) तयार करणार ■ पाकीटबंद खाद्यपदार्थांची तपासणी यंत्रणा बळकट केली जाईल. ■ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये वैधमापन शास्त्राचा विशेष अभ्यासक्रम सुरू करणार ■ वैधमापन शास्त्र विभागाचे संपूर्ण संगणकीकरण व यंत्रणेचे अद्ययावतीकरण करणार.

# सिंचन क्षमता व वापराचे समन्वयन

**राज्यातील** दुष्काळसदृश स्थिती आणि रखडलेले प्रकल्प पाहता या वर्षी जलसंपदा विभागाच्या सक्षमीकरणावर भर देण्याचे माझे उद्दिष्ट आहे. मोठे पाटबंधारे प्रकल्प, मध्यम प्रकल्प व लघु पाटबंधारे प्रकल्पांना गती देण्यासाठी व प्रकल्पाच्या लाभार्थी शेतकऱ्यांना तातडीने लाभ मिळण्यासाठी मी लक्ष केंद्रित करणार आहे. दुष्काळग्रस्त मराठवाडा आणि विदर्भातील प्रकल्पांना गती देण्यासाठी प्रलंबित सुधारित प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे संबंधित महामंडळांना प्रत्यार्पित केले आहेत. निविदा प्रक्रियेबाबतच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण केल्यामुळे प्रकल्पांच्या कामांना गती मिळाली असून ही कामे आणखी वेगाने होण्यासाठी प्रयत्न राहणार आहे. राज्यातील निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष वापर यांतील तफावत दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे. नव्या वर्षात अधिकाधिक प्रकल्पांच्या पूर्णत्वासाठी प्रयत्न केले जातील. लोकसेवा हमी कायद्यांतर्गत विभागाच्या दहा सेवा अधिसूचित करण्यात आल्या. या सेवांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी व लोकांना त्याचा लाभ व्हावा, यासाठी विशेष प्रयत्न करणार. काही सेवा ऑनलाइन केल्याने विभागाची ई–जलहमीकडे वाटचाल सुरू झाली आहे. ती अधिक सक्षम करण्याचा संकल्प आहे.



**गिरीष महाजन**
(जलसंपदा मंत्री)

**शब्दांकन : संजय डी.ओरके**

### संकल्पाची दिशा

- विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ आत्महत्याप्रवण जिल्ह्यातील १३२ प्रकल्प/प्रकल्प घटकांची कामे करून येत्या ३ वर्षात २.१९ लक्ष सिंचन क्षमता व ९५८ दलघमी पाणीसाठा निर्मितीच्या कार्यक्रमाची आखणी
- जलसंपदा विभागाच्या सक्षमीकरणावर भर देणार
- राज्यातील निर्मित सिंचन क्षमता व प्रत्यक्ष वापर यांच्यातील तफावत दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार
- विभागाची ई–जलहमीकडे वाटचाल सुरू झाली आहे. ही वाटचाल अधिक सक्षम करणार

# सक्षम एसटी, उत्कृष्ट सेवा

**एसटीसमोर** खाजगी वाहतुकीचे मोठे आव्हान आहे. हे आव्हान नव्या वर्षात स्वीकारायचे ठरवले असून त्यासाठी नवीन ५०० वातानुकूलित बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी आगारातील स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल. एस.टीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा महत्त्वाचा विषय प्राधान्यक्रमात आहे. महामंडळाने राज्यात १३ ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे बसपोर्ट उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला नवीन वर्षात मूर्त रुप मिळेल. महाराष्ट्रात ३५०० मार्ग निवारे उभारण्यात येत आहेत. यामुळे महिला प्रवाशांची गैरसोय दूर होईल. राज्यात १ लाख ४० हजार ऑटोरिक्षांच्या रद्द किंवा व्यपगत झालेल्या परवान्यांचे नूतनीकरण, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात नवीन (एमएमआर) एक लाख ऑटो रिक्षा परवान्यांना मान्यता आणि इतर महत्त्वाच्या पाच शहरात सध्या अस्तित्वात असलेल्या परवान्यांच्या २५ टक्के नवीन ऑटो रिक्षा परवान्यांचे वितरण करण्यात येईल. यातून नवीन वर्षात कायदेशीर आणि हक्काच्या ४.५ लाख रोजगार संधी निर्माण होतील. येत्या वर्षात एमएमआर क्षेत्रात नवीन २५ हजार टॅक्सींना परवाने देण्यात येतील. यामुळे ५० हजार रोजगार संधी निर्माण होतील. गेल्यावर्षी पाच हजार कोटी रुपये खर्चाच्या ५ रेल्वेमार्ग विकासाला मान्यता दिली होती. त्याला नवीन वर्षात वेग देण्यात येईल.



**दिवाकर रावते**
(परिवहन मंत्री)

**शब्दांकन : डॉ. सुरेखा म. मुळे**

### संकल्पाची दिशा

■ एस.टीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध उपाय ■ एसटी आगाराची स्वच्छता हा प्रमुख संकल्प ■ एमएमआर क्षेत्रात १ लाख नवीन रिक्षा परवाने आणि इतर पाच महत्त्वाच्या शहरांमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या रिक्षांच्या २५ टक्के नवीन परवाने ■ एस.टी महामंडळाच्या जागा सुरक्षित करताना आगारांच्या आधुनिकीकरणाच्या कामांना प्राधान्य ■ नवीन ५०० वातानुकूलित सुसज्ज बसेस व ३५०० मार्ग निवारे (पिकअप शेडस) उभारणार ■ एमएमआर क्षेत्रात नवीन २५ हजार टॅक्सींना परवाने देऊन ५० हजार रोजगाराच्या संधी उपलब्ध करणार

# समतोल विकासासाठी समन्वय

**राज्याचा** गतीने समतोल विकास व्हावा, यासाठी नव्या वर्षात अधिकाधिक लक्ष केंद्रित करणार आहे. औद्योगिक विकासासाठी पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन व नव्या उद्योगांची निर्मिती यांची योग्य सांगड घालण्यावर भर देणार आहे. अतिजलद विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेमध्ये राज्याने सतत अग्रेसर राहावे, यासाठी प्रयत्न राहतील.

राज्याला औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने पहिल्या क्रमांकावर कायम ठेवण्यासाठी व प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी निर्माण झालेले पोषक वातावरण अधिक बळकट केले जाईल. आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने देशाच्या लघु तसेच छोट्या व मध्यम उद्योग क्षेत्राला प्राधान्य देण्यात येईल. देशाला आर्थिकदृष्ट्या बलशाली बनवताना या क्षेत्राला जागतिकदृष्ट्या स्पर्धात्मक बनवण्यासाठी, विशेष प्रयत्न करण्यात येतील. उद्योगस्नेही कायदे करण्यासाठी पुढाकार घेतला जाईल. महाराष्ट्रात मोठ्या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहांची गुंतवणूक अधिकाधिक वाढावी, यासाठी प्रयत्न केले जातील. स्मार्ट सिटी, बुलेट ट्रेन, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर, कौशल्य विकास या योजना प्रभावीपणे राज्यात राबवल्या जातील. महाराष्ट्रात सर्वत्र उद्योगांचा विकास व्हावा, यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देण्यात येईल.



**सुभाष देसाई**
(उद्योग मंत्री)

**शब्दांकन: काशीबाई थोरात**

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

### संकल्पाची दिशा

- **महाराष्ट्रात अधिकाधिक गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न करणार**
- **गतीने समतोल विकास साध्य करण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देणार**
- **पारंपरिक उद्योगांना प्रोत्साहन व नव्या उद्योगांची निर्मिती यांची योग्य सांगड घालणार**
- **आर्थिक सर्वसमावेशकतेच्या दृष्टीने लघु छोट्या व मध्यम उद्योग क्षेत्रात समन्वय साधणार**

# पर्यावरणपूरक विकास

**नव्या** वर्षात पर्यावरण विभागांतर्गत असलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिक सक्षम करण्याचा माझा प्रयत्न राहील. मागच्या वर्षी प्लास्टिक पिशव्यांच्या वापरावर नियंत्रण आणण्यासाठी ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांच्या उत्पादनावर व वितरणावर बंदी घातली. याच पद्धतीने नव्या वर्षात विविध उपाय योजून सक्षमरीत्या पर्यावरण संवर्धन केले जाईल. त्यासाठी लोकसहभाग घेतला जाईल.

प्लास्टिकला पर्याय म्हणून कागदाच्या व कापडाच्या पिशव्या वापरण्यासाठी पर्यावरण विभागामार्फत लोकांना प्रोत्साहित केले जात आहे. हा प्रयत्न यावर्षी आणखी जोमाने करणार आहोत. पर्यावरण अनुमतीसाठी आता ऑनलाइन अर्ज करता येतात. जल प्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरणीय अनुमतीस पात्र सर्व इमारत व वसाहतींना सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बांधणे व वापरणे बंधनकारक केल्याने शहराच्या सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेवरील ताण कमी करण्याबरोबरच नवीन प्रकल्पांमुळे जलप्रदूषण होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. नदीकिनारी नदीतील प्रदूषणाची माहिती देणारे फलक लावण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल. पर्यावरणपूरक विकास हेच उद्दिष्ट ठेवले आहे.



**रामदास कदम**
(पर्यावरण मंत्री)

**शब्दांकन : वर्षा फडके**

### संकल्पाची दिशा

- **महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ अधिक सक्षम करणार**
- **सण-उत्सव पर्यावरणस्नेही पद्धतीने साजरे करण्यात यावे यावर भर देणार**
- **प्लास्टिकला पर्याय म्हणून कागद व कापडाच्या पिशव्या वापरण्यासाठी लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपाय योजले जाणार**
- **नदीतील प्रदूषणाची माहिती देणारे फलक नदीकिनारी लावणार**
- **पर्यावरण संतुलनासाठी आवश्यक ते उपाय प्रभावीरीत्या करणार**

# पायाभूत सुविधांमध्ये वाढ

**राज्यातील** जनतेचा दैनंदिन प्रवास सुखकर करण्यासाठी अंतर्गत दळणवळण व्यवस्था मजबूत करण्याचा नव्या वर्षासाठी केला आहे.

राज्याचा चेहरामोहरा बदलण्यासाठी महत्त्वपूर्ण अशा ५२ हजार कोटी रुपयांच्या ८ पायाभूत सुविधा प्रकल्पांना पायाभूत सुविधा समितीने तत्त्वत: मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तातडीने सादर करून ही कामे २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नागपूर-मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस-वे बरोबरच ठाणे-घोडबंदर रस्त्यावर उन्नत मार्ग तयार करणे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमतावाढ करणे, विदर्भातील २७ रेल्वे उड्डाणपुलांची कामे, वाकण-पाली-खोपोली रस्त्याचे चौपदरीकरण करणे या प्रकल्पांचा यात समावेश आहे. या प्रकल्पांमुळे राज्यातील रस्ते विकासाला गती मिळेल. मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर दरड कोसळल्याने होणारे अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. या मार्गावर बसवण्यात आलेली जाळी कमकुवत असल्याने त्यापेक्षा दुप्पट क्षमतेच्या संमिश्र धातूंची जाळी बसवण्याचे काम सुरू आहे. या कामावर लक्ष केंद्रित करणार आहे. त्यामुळे प्रवास चांगला व अधिक गतीने होईल.



**एकनाथ शिंदे**
(सार्वजनिक बांधकाम
(सार्वजनिक उपक्रम) मंत्री)

**शब्दांकन : डॉ. संभाजी खराट**

## संकल्पाची दिशा

- **नागपूर- मुंबई सुपर कम्युनिकेशन एक्सप्रेस वेच्या कामास गती देणार**
- **मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढीसाठी प्रयत्न**
- **विदर्भातील २७ रेल्वे उड्डाणपुलांच्या कामांना गती देणार**
- **मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर दरड कोसळून होणारे अपघात रोखण्यासाठी विशेष उपाययोजनांवर लक्ष केंद्रित करणार**
- **राज्यातील दळणवळण व्यवस्था मजबूत व्हावी, यासाठी विशेष प्रयत्न**

# मुबलक वीज आणि सुयोग्य सेवा

**राज्याचे** अपारंपरिक उर्जा धोरण जाहीर करण्यात आले असून खाजगी सहभागच्या माध्यमातून सुमारे ७५०० मेगावॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारण्यात येतील. पारंपरिक ऊर्जा क्षेत्रातून क्षमतेएवढी ऊर्जा निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. या वर्षी राज्यातील आणि विशेषत: मुंबईतील वाढीव वीज मागणी आम्ही पूर्ण करू. विजेचे दर आटोक्यात ठेवून सर्वसामान्यांना ते परवडतील याची काळजी घेण्यात येईल. 'मेक इन महाराष्ट्र' हा कार्यक्रम यशस्वीपणे राबवणे व राज्यातील उद्योगांना अधिक चालना देणे, सर्वसामान्य वीजग्राहकांना दिलासा देणे यासाठी वीज दर नियंत्रित ठेवले जातील. कृषी ग्राहकांसाठी प्रस्तावित केलेल्या जुन्या कृषी संजीवनी योजनेच्या आधारावर नळ पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी पुरवठा संजीवनी योजना २०१५ लागू करण्यात यावी असा महावितरण कंपनीतर्फे शासनास प्रस्ताव सादर केला आहे. त्या अनुषंगाने पाठपुरावा करण्यात येईल. राज्यात ५ लाख सौर कृषिपंप बसविण्याचे निश्चित करण्यात आले असून या अनुषंगाने ७५४० ऑफ ग्रीड सौर कृषिपंप बसवण्यात येतील. त्याच्या परिपूर्ततेकडे लक्ष केंद्रित केले जाईल. ग्रामीण भागात वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देणार.



**चंद्रशेखर बावनकुळे**
(ऊर्जा, नवीन व नवीकरणीय
ऊर्जा मंत्री)

**शब्दांकन : जयश्री कोल्हे**

## संकल्पाची दिशा

- **महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या कंपन्यांची एकूण कार्यक्षमता वाढविण्यासाठी व खर्च कमी करण्यासाठी अंतर्गत सुधारणांचा कालबद्ध कार्यक्रम हाती घेणार**
- **अपारंपरिक ऊर्जास्रोतांच्या माध्यमातून जास्तीत जास्त वीजनिर्मिती करण्याचा प्रयत्न करणार**
- **यंत्रणेतील त्रुटीमुळे अनेकवेळा खंडित वीजपुरवठ्याला नागरिकांना सामोरे जावे लागते. त्यामुळे या वर्षी तांत्रिक कारणांमुळे वीज खंडित होण्याचे प्रमाण रोखणार**
- **शेतकऱ्यांची वीजजोड मागणी प्रलंबित राहणार नाही, याकडे लक्ष देणार**

# स्वच्छ जल, स्वच्छ परिसर

**२०१९** पर्यंत राज्यातील संपूर्ण कुटुंबांना वैयक्तिक शौचालय उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला आहे. आगामी काळात टंचाई उपाय योजनेंतर्गत नवीन विंधन विहिरी घेणे, त्यांची देखभाल करणे त्याचप्रमाणे जुन्या विंधन विहिरींची देखभाल दुरुस्ती करणे या विषयावर भर देऊ. पाणीपुरवठा करण्यासाठी सक्षम असलेल्या विहिरीतील गाळ काढण्यात येईल व त्यांची खोली वाढवण्यात येईल. त्यामुळे कुटुंबाना टंचाईकाळात पाण्याचा मुबलक साठा मिळू शकेल. टंचाईग्रस्त भागात पाणीपुरवठा नियमित होण्यासाठी तात्पुरती पूरक नळ योजना राबवण्यात येईल. नव्या वर्षात स्वच्छता मोहीम आणखी गतीने राबवण्यात येऊन तिला



**बबनराव लोणीकर**
(पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री)

लोकचळवळीचे स्वरूप देण्यात येईल. मराठवाड्याच्या पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा अनुशेष भरून काढण्यासाठी व पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर कायमची मात करण्यासाठी औरंगाबाद येथे 'जल आयुक्तालय' स्थापन करण्यासाठी सकारात्मक पावले उचलले जातील. शहरांचा दर्जा आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरणारे अमृत अभियान प्रभावीपणे राबवण्यात येईल. राज्यातील अधिकाधिक ग्रामपंचयाती हागणदारी मुक्त करण्यासाठी व अशा ग्रामपंचायतींना सातत्य टिकवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल.

**शब्दांकन : राहुल भालेराव**

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

### संकल्पाची दिशा

- **मराठवाड्याच्या पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा अनुषेश भरून काढण्यासाठी औरंगाबाद येथे 'जल आयुक्तालय' स्थापणार**
- **स्वच्छ महाराष्ट्र अभियान राबवण्यावर आगामी काळात भर दिला जाणार**
- **हागणदारीमुक्त गावांच्या संख्येत दरवर्षी वाढ करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणार**
- **ग्रामीण भागातील नळ पाणीपुरवठा सुरळीत व्हावा यासाठी विशेष दुरूस्ती मोहीम राबवणार**

# सुदृढ आरोग्याच्या दिशेने

**महाराष्ट्रात** शिवआरोग्य टेलिमेडिसिन योजना, ऑपरेशन कायापालट आदी अभिनव योजना नव्या वर्षात प्रभावीपणे राबवण्यात येतील. कुपोषणाचा प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल. त्या अनुषंगाने कुपोषित बालकांना पूरक पोषण आहार देण्यासाठी शासन धोरण तयार करीत आहे. अशा प्रकारचे धोरण आणणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरेल. पूर्ण वाढ न झालेल्या मुलांचे प्रमाण कमी करण्याची लक्षणीय कामगिरी महाराष्ट्राने केली आहे. तरीदेखील हे प्रमाण अजूनही २३ टक्के एवढे आहे त्यावर अधिक भर देण्यात येत आहे. लहान बालकांना बालपणात होणाऱ्या रोगांचे समूळ उच्चाटन



**डॉ. दीपक सावंत**
(सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री)

करण्यासाठी पेंटाव्हॅलंट लसीकरणाचा फार मोठा फायदा होणार असून ही लस सर्व बालकांना राज्य शासनाकडून मोफत देण्यात येणार आहे. हा उपक्रम प्रभावीपणे राबवण्यात येईल. मुंबईत वाहतूक कोंडीमुळे अनेक रुग्णांना वेळेवर रुग्णालयात पोहोचता येत नाही. पण आता अशा रुग्णांना गतिमान सेवा देण्यासाठी शिवआरोग्य बाइक ॲम्ब्युलन्स सेवा सुरु करण्यात येईल. आरोग्य विभागातील १०८५५ रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेला वेग देण्यात येईल. यामुळे सामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

**शब्दांकन : गजानन पाटील**

### संकल्पाची दिशा

- **बालकांमधील खुजेपणा कमी करण्यासाठी व कुपोषणमुक्तीसाठी केंद्र शासनाच्या योजना राज्यात प्रभावीपणे राबवणार**
- **सामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे बळकटीकरण, रिक्तपदांची भरती, टेलिमेडिसिन सेवेचा विस्तार अशा अनेकविध योजना राबवणार**
- **आरोग्य विभागातील रिक्त पदे तातडीने भरणार**
- **लहान बालकांना होणाऱ्या रोगांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पेंटाव्हॅलंट लसीकरण राबवणार**

# सामाजिक न्यायाची नवी दिशा

**नव्या** वर्षात केंद्र शासनाच्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन'च्या धर्तीवर महाराष्ट्रात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची' स्थापना करून त्याचे कामकाज सुरू करण्याचा संकल्प केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेची स्वतंत्र इमारत बांधण्याचे काम सुरू करणार आहे. याठिकाणी जात पडताळणी व इतर आनुषंगिक कामे तातडीने पूर्ण होण्यास मदत होईल. गेल्या वर्षी इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमिपुजन झाले. तसेच लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेले घर राज्य शासनाने खरेदी केले आहे. या वर्षात



**राजकुमार बडोले**
(सामाजिक न्यायमंत्री)

या ठिकाणी बाबासाहेबांचे त्यांच्या कर्तृत्वाला साजेसे स्मारक उभे राहील, याकडेही लक्ष देणार. मागासवर्गातील मुली-महिला आता शिक्षण घेऊन मोठ्या शहरात नोकरी करत आहेत. अशा महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर या ठिकाणी वर्किंग वुमेन्स हॉस्टेल उभारण्याचा मानस आहे. येत्या वर्षभरात स्वत:ची इमारत उभी करू. ही इमारत पूर्ण होईपर्यंत भाडेतत्त्वावरील जागेत हे वसतिगृह सुरू करू. सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाधिक योजना लोकांपर्यंत पोहोचवण्याकडे लक्ष केंद्रित करणार आहे.

**शब्दांकन : नंदकुमार वाघमारे**

## संकल्पाची दिशा

- **अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी ५० वसतिगृहे बांधण्याच्या संकल्पपूर्तीवर लक्ष केंद्रित करणार**
- **केंद्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता प्रतिष्ठानची' स्थापना करून त्याचे कामकाज सुरू करणार**
- **नोकरी करणाऱ्या महिलांसाठी मुंबई, पुणे व नागपूर या ठिकाणी वर्किंग वुमेन्स हॉस्टेल उभारणार.**
- **लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असलेल्या घराचे आंतरराष्ट्रीय स्मारक करण्यासाठी प्राधान्याने लक्ष पुरवणार**

# गतिमान प्रशासनासाठी तंत्रज्ञानाची जोड

**राज्यातील** सर्वसामान्य नागरिकांचा दैनंदिन जीवनात प्रशासनाशी संबंध येत असतो. सामान्यांना ज्या सेवा बहाल करायच्या असतात त्यांची सांगड आधुनिक तंत्रज्ञानाशी घालून जलद आणि पारदर्शक प्रशासकीय सेवा देण्यासाठी नव्या वर्षात लक्ष केंद्रित केले जाईल.

राज्य सरकारने सुरू केलेल्या लोकोपयोगी योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. क्षेत्रीयस्तरावरील नागरिकांना छोट्या छोट्या कामांसाठी मंत्रालयापर्यंत येण्याची गरज पडू नये म्हणून मंत्रालयातील लोकशाही दिन ऑनलाइन करण्यात आला आहे. आता दर महिन्याला होणाऱ्या ऑनलाइन लोकशाही दिनामुळे ग्रामीण भागातील जनतेला मुंबईत येण्याची गरज



**स्वाधीन क्षत्रिय**
(मुख्य सचिव)

नाही. नागरिकांना विहित कालावधीत सेवा मिळविण्याचा हक्क प्रदान केलेल्या सेवा हमी कायद्यातील ४३ सेवा आपले सरकार या पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन करण्यात आल्या आहेत. नव्या वर्षात अधिकाधिक सेवा ऑनलाइन करण्याचा आमचा मानस आहे. राज्यातील नागरिकांना मी आश्वस्त करू इच्छितो की, जलयुक्त शिवार, डिजिटल इंडिया, स्मार्ट सिटी, स्वच्छ महाराष्ट्र या सारख्या विविध योजनांच्या माध्यमातून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी आम्ही नव्या वर्षात अधिक प्रभावीरीत्या कार्यरत राहू..

**शब्दांकन: अजय जाधव**

## संकल्पाची दिशा

- **नव्या वर्षात जास्ती जास्त सेवा ऑनलाइन करणार**
- **वरिष्ठ अधिकारी कामकाज सांभाळून रोज एक तास सर्वसामान्यांना भेटणार**
- **सामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठीच्या मूलभूत संशोधनाची योग्य रीतीने सांगड घालून त्याचा प्रभावी वापर करण्यावर भर**
- **शेतकरी आत्महत्या सारख्या गंभीर विषयावर कृषी विद्यापीठे आणि संशोधन केंद्राची मदत घेऊन समस्येवर उपाय शोधला जाईल**

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

# चौफेर विकास

**समता,** सामाजिक न्याय, लोकशाही आणि मानवी समाजामध्ये न्यायाची प्रस्थापना ही मूल्ये जपण्याचा प्रयत्न गेल्या वर्षभरात करण्यात आला. समाजाच्या सर्वस्तरातील लोकांच्या कल्याणासाठी काम करून त्यांचा चौफेर विकास साधणे हा नव्या वर्षाचा संकल्प आहे. सामाजिक, शैक्षणिक. आर्थिक आणि सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात योग्य दिशेने विकास करण्यावर लक्ष केंद्रित करणार. इंदू मिल परिसर आणि लंडन येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक गतीने निर्माण करण्यासाठी लक्ष पुरवणार. पुणे, नागपूर आणि दिल्ली या तिन्ही ठिकाणी अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करणे गरजेचे होते ते केंद्र सुरू करण्यात आले आहेत.



**दिलीप कांबळे**
(सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्याक विकास, राज्य उत्पादन शुल्क राज्यमंत्री)

**शब्दांकन: काशीबाई थोरात**

# बालकल्याणाला प्राधान्य

२०१६ मध्ये स्त्री भ्रूण हत्येस प्रतिबंध करणे आणि शिक्षणात मुलींचा सहभाग वाढविणे यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार आहे. महिला व बालकांमध्ये कुपोषण निर्मुलनासाठी जनजागृती करणे, बालगृहांची सुधारणा, निरीक्षण आणि सुरक्षितता याला प्राधान्य देणार आहे. बाल सुधारगृहातील मुले व मुलींच्या कल्याणासाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवण्यात येईल. रेशनकार्डांचे संगणकीकरण यावर लक्ष केंद्रित करणार. जेनेरीक औषधाला प्रोत्साहन देण्याला प्राधान्य देणार.



**विद्या ठाकूर**
(महिला व बालविकास, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, औषधी प्रशासन राज्यमंत्री)

**शब्दांकन : वर्षा फडके**

# पर्यटन वाढीला चालना

**पर्यटन** क्षेत्राचे उद्योग म्हणून स्वतंत्र अस्तित्व आहे. जागतिक स्तरावर दहशतवाद, आर्थिक मंदी यांची प्रत्येक देशाला झळ पोहचत असते. अशा परिस्थितीत महाराष्ट्राचा पर्यटनाचा आलेख वाढता राहावा यासाठी २०१६ मध्ये प्रयत्नशील राहणार आहे. पर्यटकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येईल. गृहविभाग, सार्वजनिक आरोग्य, पणन, कृषी व फलोत्पादन आणि पर्यटन या सर्व विभागाच्या कामांची एकमेकांशी सांगड घालून जनतेची सुरक्षा, पोलिसांचे आरोग्य, शेतीच्या योजना, शेतमालाचे विपणन आणि किफायतशीर भाव यासाठी सतत प्रयत्नशील असून पर्यटनाच्या वाढीसाठी कृषी पर्यटनाबरोबरच दीक्षाभूमी व ड्रॅगन पॅलेस सारखी स्थळे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी नव्या वर्षात पाठपुरावा करणार.



**राम शिंदे**
(गृह (ग्रामीण), पणन, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, कृषी आणि फलोत्पादन राज्यमंत्री)

**शब्दांकन : राहुल भालेराव**

# कामगारांना दिलासा

**नव्या** वर्षात कामगारांना अधिकाधिक दिलासा देण्याचा प्रयत्न राहील. कापसाच्या प्रत्येक बोंडावर राज्यातच प्रक्रिया करून त्यामार्फत मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करण्यावर वस्त्रोद्योग विभागामार्फत लक्ष केंद्रित केले जाईल. सर्व प्रकारच्या वस्त्रोद्योग प्रक्रिया घटकांसाठी अनुदान देण्यात येईल. परिवहन व्यवस्था अधिक सुरक्षित, जलद आणि आरामदायी करण्याचा प्रयत्न राहील.

पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजना अधिक प्रभावीपणे राबवल्या जातील. अतिरिक्त दूध समस्येचे नियोजन करण्यावर भर राहील. दुधाची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी केंद्र शासनाकडे प्राधान्याने पाठपुरावा करणार.



**विजय देशमुख**
(सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम), परिवहन, कामगार, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री)

**शब्दांकन : इर्शाद बागवान**

# महसूलवृद्धीवर भर

**नागरिक** व शेतकरी हिताचे महसूल विभागाशी संबंधित निर्णय अधिकाधिक प्रभावीपणे राबवण्यावर लक्ष केंद्रित करणार. मुद्रांक वसुलीचे विविध उपाय केल्याने व ऑनलाइन प्रणालीमुळे महसुलात वाढ अपेक्षित आहे. त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याचा संकल्प केला आहे. जलयुक्त शिवार अभियानातून यवतमाळ जिल्हा टंचाईमुक्त करण्याचा निश्चय केला आहे. नदी पुनरूज्जीवन प्रकल्पाला गती देण्यासाठी प्रयत्न केले जातील. जलउत्क्रांती योजनेंतर्गत जिल्ह्यात ५० मोठ्या बंधाऱ्यांची लोकसहभाग व श्रमदानातून निर्मिती करण्याचा अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. तो कालबद्धरीत्या पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या समन्वयामुळे आता सरकारी कामे तत्काळ होत असल्याचा अनुभव सामान्य जनतेला आला आहे. आगामी वर्षात त्यात आणखी गती आणली जाईल.



**संजय राठोड**
(महसूल विभाग राज्यमंत्री)

**शब्दांकन : संजय डी.ओरके**

# सहकाराचे सक्षमीकरण

**सहकार** क्षेत्राने महाराष्ट्राच्या प्रगती आणि विकासात मोठी भर घातली आहे. नवीन वर्षात सहकार विभागाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या समस्या प्रभावीपणे सोडवण्याचे प्रयत्न केले जातील. नोंदणीकृत सहकारी संस्थांच्या
सर्वेक्षणाच्या कालबद्ध मोहिमेची अंमलबजावणी केली आहे. नागरी पतसंस्थांवरील प्रभावी नियंत्रणासाठी नियामक मंडळ, स्थिरीकरण व ठेव इत्यादीबाबत सहकार कायद्यात नवीन प्रकरण समाविष्ट करण्याची व राज्यातील बहुराज्यीय पतसंस्थांची सहकार विभागामार्फत तपासणी कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. त्यास नवीन वर्षात गती देण्यात येईल. अल्पमुदत कर्जाचे मध्यम, मुदत कर्जात रूपांतरण केल्यानंतर अशा कर्जाच्या परतफेडीचा कालावधी तीन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढवण्याबाबत सूचना दिल्या आहेत.




**दादाजी भुसे**
(सहकार राज्यमंत्री)

**शब्दांकन : गजानन पाटील**

# सिंचन क्षमता वाढवणार

**नव्या** वर्षात राज्याची सिंचनक्षमता वाढवण्यासाठी जुन्या सिंचन प्रकल्पाचे पुनरुज्जीवन, नदीजोड प्रकल्प बंधाऱ्याचे पावसाळी नियोजन तसेच प्रकल्प गतीने पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्ध मोहीम हाती घेण्यात येणार आहे. जलसंधारण विभागामार्फत शाश्वत शेती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येईल. दुष्काळावर कायमची मात करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येईल. जलयुक्त शिवार अभियानाला गतिमान करण्यात येईल. या माध्यमातून राज्यातील सर्वच शेतीयुक्त जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी प्रयत्न केले जातील. अनुशेषांतर्गत सर्व प्रकल्प तसेच ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुंतवणूक झालेले प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देणार. आणि २०१९ पर्यंत अपूर्ण प्रकल्पापैकी ५० टक्के प्रकल्प वितरण प्रणालीसह प्राधान्याने पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.



**विजय शिवतारे**
(जलसंपदा व जलसंधारण, संसदीय कामकाज राज्यमंत्री)

**शब्दांकन : राहुल भालेराव**

# सूक्ष्म नियोजनावर भर

**२०१६** मध्ये मेक इन महाराष्ट्र, मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना, डिजिटल महाराष्ट्र, स्वच्छ भारत अभियान, स्मार्ट सिटी यासारख्या नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करणार. प्रत्येक गावात शौचालय बांधणे, गावातील परिसर स्वच्छ ठेवणे, हागणदारीमुक्त गाव निर्माण करणे हे उद्दिष्ट आहे. प्रत्येक गाव हे स्वयंपूर्ण करणे यावर लक्ष केंद्रित करणार. सिंधुदुर्ग आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये कृषी आणि फलोत्पादनासाठी सकस जमीन आणि पोषक वातावरण आहे. याचा फायदा घेऊन या जिल्ह्यांमधील कृषी उत्पादन आणि फलोत्पादन वाढवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यासाठी तसेच अधिकाधिक भात लागवडीसाठीही प्रयत्न करणार.

शेतकरी आणि कष्टकरी जनतेच्या विकासासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.



**दीपक केसरकर**
(वित्त, ग्रामविकास, नियोजन राज्यमंत्री)

**शब्दांकन : वर्षा फडके**

संकल्प २०१६
स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

# कौशल्य विकासावर भर

**आदिवासी** समाज हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा घटक असून त्याच्या विकासासाठी व संवर्धनासाठी असलेल्या योजना अधिक प्रभावीपणे राबवण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थी मुख्यप्रवाहात यावे म्हणून त्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. कौशल्य विकासावर अधिकाधिक भर देण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या पोषण आहाराकडे प्राधान्याने लक्ष पुरवले जाईल. 'स्वच्छ भारत स्वच्छ आश्रमशाळा' हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने सर्व शासकीय अनुदानित आश्रमशाळा तसेच वसतिगृहांमध्ये राबवण्यात येणार आहे, या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशेष प्रयत्न करणार असून प्रारंभी हा कार्यक्रम आदिवासी विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय आश्रमशाळामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासून राबवण्यात येत आहे.



**राजे अम्ब्रीशराव राजे सत्यवानराव अत्राम**
(आदिवासी विकास राज्यमंत्री)

**शब्दांकन : राहुल भालेराव**

# गृहप्रकल्पांना चालना

**म्हाडाच्या** माध्यमातून सामान्य जनतेला हक्काचे घर घेणे शक्य व्हावे म्हणून प्राधान्याने लक्ष पुरवणार आहे. ही घरे अल्पदरात उपलब्ध करून देताना, या घरांच्या बांधकामाचा दर्जा विकासकामार्फत बांधण्यात येणाऱ्या विक्री घटकाच्या इमारतीइतकाच चांगला राहील यावर लक्ष केंद्रित करणार. एसआरएच्या प्रकल्पांमधील अडथळे दूर करून या प्रकल्पांना अधिक गती देणार. उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या अभ्यासक्रमात शिक्षण घेता यावे, यासाठी अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील. कौशल्यावर आधारित नवीन अभ्यासक्रम सुरू करणार.



**रविंद्र वायकर**
(गृहनिर्माण, उच्च आणि तंत्र शिक्षण राज्यमंत्री)

**शब्दांकन : सचिन निमकर**

# स्वच्छता आणि सुरक्षा

**नोव्हेंबर,** २०१६ पर्यंत संपूर्ण मुंबई शहर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्यात येणार असून यासाठी ६०२० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येतील. सर्व प्रमुख शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबवण्यात येईल. महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येईल. राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका/नगरपंचायतीची ३६५ शहरे ऑक्टोबर २०१६ पर्यंत हागणदारीमुक्त करण्यासाठी प्रयत्न करणार. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यातील आंतरराज्यीय स्मार्ट सिटी चॅलेंज स्पर्धेत ही सर्व शहरे पात्र होण्यासाठी प्रयत्न करणार. मुंबई, नागपूर, पुणे येथील मेट्रो प्रकल्पांना गती देण्यात येऊन कौशल्य विकासाच्या माध्यमातून अधिकाधिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणार. राज्यात ५ वर्षात २५लाख कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे.



**डॉ. रणजित पाटील**
राज्यमंत्री, गृह (शहरे), नगरविकास, सामान्य प्रशासन, संसदीय कार्य

**शब्दांकन: विलास बोडके**

# समतोल विकास

मेक इन महाराष्ट्र ही संकल्पना राज्यात यशस्वी करण्याचा संकल्प आम्ही केला आहे.

'इज ऑफ डुईंग बिझनेस'च्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न सुरू असून उद्योगवाढीसाठी सुलभ व गतिमान प्रक्रिया अमलात आणण्यावर लक्ष केंद्रित करणार आहे. औद्योगिकीकरणाला गती मिळावी म्हणून नवीन उद्योग उभारण्यासाठी ७६ परवानग्यांची संख्या कमी करून ३७ वर आणली आहे. ती अजून कमी करून २५ वर आणण्याचा संकल्प या वर्षात पूर्ण करणार. विदेशी गुंतवणूकदेखील मोठ्या प्रमाणावर आकर्षित करण्यासाठी तसेच राज्याच्या मागासभागात उद्योग विस्तार व्हावा यासाठी प्रयत्न सुरू असून या प्रयत्नांना नव्या वर्षात गती देणार. कामकाजात अधिकाधिक संगणक प्रणालीचा वापर करण्याचा मनोदय होता तो पूर्ण केला आहे.



**प्रवीण पोटे-पाटील**
(पर्यावरण, उद्योग, खनिकर्म, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री)

**शब्दांकन : जयश्री कोल्हे**

## विशेष मुलाखत



**केंद्राच्या स्वच्छ भारत धोरणाच्या अनुषंगाने महाराष्ट्रात स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू आहे. राज्यातील ग्रामीण भागात स्वच्छतेची सवय लागावी, उघड्यावर शौचास बसणे बंद व्हावे यासाठी जनजागृती करण्यास सुरुवात केली, त्याचे दृश्य परिणाम आता दिसू लागले आहेत. राज्यातील ४ हजार गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. राज्याची स्वच्छता व पाणीपुरवठ्याविषयी सांगताहेत पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री बबनराव लोणीकर**

# शुद्ध जल, स्वच्छ महाराष्ट्र

**राज्यात स्वच्छतेच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे?**

''पाणी हे जीवन आहे, तर स्वच्छता अत्यावश्यक बाब आहे. केंद्राच्या स्वच्छ भारत अभियानाच्या अंमलबजावणीसाठी, राज्य स्तरावर स्वच्छ महाराष्ट्र कोष स्थापन केला आहे. सीएसआर (कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) मधून येणाऱ्या निधीतून स्वच्छता विभाग आर्थिकदृष्टीने सशक्त होणार आहे.

दोन हजार ग्रामपंचायती हागणदारीमुक्त करण्याचे ठरले असताना विभागाच्या प्रयत्नाने एका वर्षात ४ हजार ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत. पुढील वर्षी आम्ही १० हजार ग्रामपंचायतीचे ध्येय निश्चित केले आहे. स्वच्छता प्रबोधनासाठी स्वच्छतादूत आणि सर्वांसाठी शुद्ध पाणी देण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजना लवकरच कार्यान्वित होत आहे.

**हागणदारीमुक्त शहरे आणि गावे या योजनेला किती आणि कसा प्रतिसाद आहे?**

राज्यातील ५६ लाख कुटुंबांकडे स्वतःचे स्वच्छतागृह नाही. मी मंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर २ हजार गावे हागणदारीमुक्त करण्याचा संकल्प जाहीर केला होता. सावित्रीबाई फुलेंच्या जन्मदिनी मोहीम सुरू झाली. महाराष्ट्राला देशात पहिला क्रमांक मिळाला. मी स्वतः ३५० गावांचा यादरम्यान दौरा केला. पुढील वर्षी १० हजार ग्रामपंचायती हागणदारीमुक्त करण्याचा निश्चय केला आहे. यापूर्वी शौचालयासाठी ४ हजार रुपये अनुदान मिळायचे, त्यात आता बदल करून ६० टक्के केंद्र आणि ४० टक्के राज्य असे सूत्र निश्चित झाले आहे. गावातील उकांडे, पाण्याच्या योजना स्वच्छ करण्याचे सरकारचे धोरण आहे. जनावरे आणि नागरिकांच्या वावरामुळे पाणवठे दूषित होतात. त्यातून रोगराई वाढते. त्यामुळे इतर स्वच्छता मोहिमेसाठी सरकारकडे निधी नव्हता. मोऱ्या काढणे, फवारणी आणि उकांडे काढण्यासाठी कोणतेही लेखाशीर्ष नव्हते. जालना शहरात ४० वर्षांचा कचरा शिल्लक आहे. ५२ हजार टन कचरा उचलण्यासाठी ६० ते ६५ कोटी खर्च येईल. १० कोटी नगरपालिकेचे उत्पन्न आहे. त्यामुळे संपूर्ण कचरा काढण्याचे ठरले तर ६० वर्ष लागतील. शहरातील कचरा गावात टाकला जातो, गावालाही त्रास होतो. खेड्यातील किंवा शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची गरज आहे. केंद्राचा आणि नगरपालिकेचा निधी एकत्रित करून ही योजना राबवायची आहे. शिर्डी, पंढरपूर, तुळजापूरसारख्या तीर्थक्षेत्राच्या शहरांमध्येदेखील कचऱ्याचा प्रश्न बिकट झाला आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून या विभागाला नेमके पाठबळ कसे मिळते?**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरी व ग्रामीण अशा दोन्ही आघाड्यांवरील स्वच्छतेकडे लक्ष वेधले आहे. राज्यातील मोठे उद्योगपती सीएसआर फंडातून निधी खर्च करत असतात. आज या निधीचे ऑडिट होत नाही. यापुढे सीआर फंडातील निधी मुख्यमंत्री स्वच्छता कोषात जमा करण्यात येईल. स्वच्छता विभागाच्या माध्यमातून एकात्मिक स्वच्छतेचे काम हाती घेण्यात येईल. स्वच्छ महाराष्ट्र अभियान, ग्रामीण आणि नागरी भागात राबवण्यात येईल. मुख्यमंत्री या कोषाचे अध्यक्ष

विजय गायकवाड

आहेत. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री म्हणून मी उपाध्यक्ष आहे. या अभियानाचे राज्य संचालक हे कोषाध्यक्ष असतील. या अभियानांतर्गत राज्यातील सर्व शहरे आणि गावे हागणदारीमुक्त करून स्वच्छ करायची आहेत. या अभियानाच्या अंमलबजावणीसाठी वैयक्तिक शौचालये, सामुदायिक शौचालये आणि घनकचरा व्यवस्थापन यासाठी येणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात प्राप्त होणारे केंद्र व राज्य शासनाचे अनुदान अपुरे आहे. सार्वजनिक शौचालयांसाठी केंद्र व राज्यशासनाचे अनुदान उपलब्ध होणार नाही. त्यामुळे या दोन्ही शासनाच्या निधीव्यतिरिक्त इतर स्रोतांमधून निधी उपलब्ध करण्यासाठी कोष निर्मिती केली आहे.

**स्वच्छतेच्या प्रबोधनासाठी आपला विभाग नवीन काय करीत आहे?**

स्वच्छतेचे प्रबोधन काळाची गरज आहे. यासाठी विविध स्तरावर आमचे प्रयत्न आहेत. जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांसाठी स्वच्छताविषयक दोन दिवसाची कार्यशाळा नुकतीच पुण्यात घेतली. या कार्यशाळेतून अनेक गोष्टी पुढे आल्या. महिनाभरात जिल्हापातळीवर कामाला गती आली. गावपातळीवर नेमलेल्या स्वच्छतादुताने ३०० स्वच्छतागृहांची जबाबदारी सांभाळायची आहे. त्यासाठी त्याला ४४ हजार रुपये इतके मानधन देण्यात येईल. सामाजिक आणि बचतगटाच्या चळवळीत महिला आणि तरुणांना संधी देण्यात येईल. स्वच्छतागृहांच्या उभारणीपासून देखभालीची जबाबदारी देण्यात येईल. शहरीभागातही ८ लाख शौचालयांच्या निर्मितीची गरज आहे. प्रत्येक जिल्ह्यात आता उपमुख्य कार्यकारी अधिकारी – स्वच्छता आणि पाणीपुरवठा असे पद निर्माण करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वच्छता रथ देण्यात आला आहे. पंढरपूरमध्ये यंदा स्वच्छता दिंडी राबवण्यात आली. हा कार्यक्रम आता राज्यभर राबवण्यात येईल. पंढरपूरमध्ये यंदाच्या वारीमध्ये कधी नव्हे इतकी अशी स्वच्छता दिसून आली. वारकऱ्यांनीही स्वच्छतेबाबत समाधान व्यक्त केले आहे.

**'घरात शौचालय, दारात पाणी' या योजनेला कसा प्रतिसाद आहे?**

पूर्वी १०० दिवस पावसाचे असायचे आता १०० दिवसांचा पाऊस १०० तासांवर आला आहे. मागील काळात सिंचनावर ७० हजार कोटींचा खर्च झाला, परंतु सर्वत्र पाणी काही उपलब्ध झाले नाही. खानदेश आणि मराठवाड्यात भूगर्भातील पाण्याची पातळी घटली आहे. विदर्भ आणि कोकणाची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे, या ठिकाणी पाऊस पडूनही पाणी अडवणे शक्य होत नाही. मराठवाड्यातील पाणी वाहून आंध्रप्रदेशात जाते. त्यातील आणखी एक अडचण म्हणजे एकाच वेळी २६ हजार शेतकऱ्यांनी याचिका दाखल करून, १७ वर्षांपूर्वीच्या भूसंपदानाची भरपाई देण्याची मागणी केली आहे. शौचालय असेल त्या ठिकाणी पाण्याची आवश्यकता असते. राज्य सरकारने जलयुक्त शिवाराची चळवळ हाती घेतली आहे. पाच हजार गावे सरकारच्या निधीतून दुष्काळमुक्तीकडे वाटचाल करत आहेत, १००० गावे लोकसहभागातून दुष्काळमुक्त होत आहे. पुढील वर्षी या चळवळीला अधिक गती येऊन घरात शौचालय आणि दारात पाणी ही संकल्पना प्रत्यक्षात साकारली जाईल.

**मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेला किती वर्षांसाठी वाढ देण्यात आली आहे?**

सुरुवातीला विभागाने एकाच वर्षाचा आराखडा केला होता. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री यांच्या निर्देशाने आता सरकारने पुढील चार वर्षांचा आराखडा निश्चित केला आहे. या योजनेतून नव्या पाणी पुरवठा योजनांबरोबरच जुन्या राष्ट्रीय पेयजल आणि भारतनिर्माण अंतर्गत बंद पडलेल्या योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. १ हजार कोटीतून सर्व बंद पडलेल्या योजना सुरू करता येणे शक्य आहे. टँकर, दूषित पाणी आणि टंचाईचे निकष लावून गावांची निवड केली जाईल.







**'अटल अमृत अभियाना'ची राज्यातील स्थिती कशी आहे?**

केंद्र सरकारने माजी प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने अटल–अमृत अभियान सुरू केले आहे. या अभियानासाठी केंद्र सरकार ७५ टक्के निधी देणार आहे, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने २५ टक्के निधी द्यायचा आहे. १ लाख लोकसंख्येपेक्षा जास्त ४३ शहरांमध्ये 'अटल अमृत योजना' राबवण्यात येणार आहे.

**पाणी पुरवठा आणि जीवन प्राधिकरण यांच्या संदर्भात कायम निधीचा प्रश्न असतो त्यात काय सुधारणा आहे?**

जीवन प्राधिकरण आणि राज्य सरकारच्या पातळीवर निधीची कमतरता दूर करण्यात येईल. ग्रामपंचायत पातळीवर २ कोटी रुपयेपर्यंतच्या योजनांचे काम होते. जिल्हा परिषद ७ कोटी रुपयेपर्यंत काम करते. त्यावरील कामे जीवन प्राधिकरण करते. जीवन प्राधिकरणाची नव्याने बांधणी करण्यात येईल. खारपाण पट्ट्यातील पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नालाही विभागाने प्राधान्य दिले आहे. खारपाण पट्ट्यातील अशा निवडक गावांमध्ये विभागाच्या माध्यमातून आरओ प्लांट उभारण्यात येईल. यामध्ये मोठी गुंतवणूक आहे, त्यामुळे टप्प्याटप्प्याने शुद्ध पाणी वितरणाचा कार्यक्रम राबवण्यात येईल.

**(लेखक हे ॲग्रोवन दैनिकाचे विशेष प्रतिनिधी आहेत.)**
**संपर्क : ०९८७०४४७७५०**

# सुरक्षेचा तिसरा डोळा




जवळपास १२ कोटी लोकसंख्या असणाऱ्या आणि नावाप्रमाणेच महा-राष्ट्र असणाऱ्या राज्यात उत्तम कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही कोणत्याही सरकारपुढे एक आव्हानात्मक जबाबदारी असते. वर्षभरापूर्वी राज्याची सूत्रे हाती घेताना उत्तम कायदा आणि सुव्यवस्था राखणे हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्राधान्याचा विषय होता. त्या दृष्टीने त्यांनी गृहमंत्रालयाची सूत्रे जाणिवेने स्वत:कडे घेतली. गेल्या काही वर्षांत या

**आंतरराष्ट्रीय शहर असलेल्या मुंबईची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी संपूर्ण शहरात जागतिक दर्जाचे व उच्च क्षमता असलेले सुमारे ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दक्षिण मुंबईतील कुलाबा ते वरळी दरम्यानच्या संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी सुमारे १२५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.**



**हेमराज बागूल**

व्यवस्थेला धक्का देणाऱ्या घटना राज्यात घडल्याने तिचा आढावा घेऊन व नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांबाबत मुख्यमंत्र्यांनी निर्धार केला होता. त्यात पोलीस दल अद्ययावत करणे, नव्या तंत्रज्ञानाची मदत घेऊन या दलाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय सुधार करणे आदी उपाययोजनांचा प्रामुख्याने समावेश होता.

पोलीस दलाच्या कार्यपद्धतीत गतिमानता आणण्यासाठी अनेक उपायांबाबत वर्षानुवर्षे केवळ घोषणाच झाल्या होत्या. या सर्व घोषणा अमलात आणण्याचे आव्हान त्यांच्यासमोर होते. या पार्श्वभूमीवर गेल्या वर्षभरात याबाबत प्रत्यक्षात झालेली कार्यवाही सरकारची या विषयाबाबतची कळकळ आणि निर्धार दर्शविणारी आहे.

मुंबई, पुणे आणि पिंपरी चिंचवड येथील सीसीटीव्ही प्रकल्प, ठाण्यातील डिजिटल वाहतूक नियंत्रण, नागपूर शहरातील डीसीआरएमएस- डायल १०० व सीसीटीएनएस या उपक्रमांचा ठळक उल्लेख करावा लागेल. या उपाययोजनांमुळे पोलीस दलाचा पारंपरिक चेहरा बदलत असून ते आता सुसज्ज, सक्षम आणि अद्ययावत अशा पोलीस दलात रूपांतरित होत आहेत.

## सीसीटीव्ही निगराणीखाली मुंबई !

मुंबई नागरी संकुलातील दोन कोटी लोकांची सुरक्षा हा सरकारसाठी मोठ्या जबाबदारीचा भाग आहे. त्या दृष्टीने सरकारकडून सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत. मुंबईवर २६ नोव्हेंबर २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईच्या सुरक्षेबाबत अधिक व्यापक आणि सजग दृष्टिकोन सरकारने ठेवला आहे. आर्थिक महत्त्व असलेली शहरे दहशतवाद्यांच्या निशाणावर आहेत. या शहरांना लक्ष्य करून राष्ट्राची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्याचा डाव त्यामागे आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध अंगाने मुंबई महत्त्वपूर्ण असून, देशाचा आर्थिक-राजकीय-सामाजिक मानबिंदू असणारे हे शहर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर राहिले आहे. यापूर्वी या शहराने दहशतवादी हल्ले अनुभवले

असून देशाच्या अर्थव्यवस्थेसह मानसिकता खच्ची करण्याचे प्रयत्न झाले आहेत.

या जागतिक महत्त्व असलेल्या शहराची सुरक्षा अधिक भक्कम करण्यासाठी संपूर्ण शहरात जागतिक दर्जाचे व उच्च क्षमता असलेले ६ हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला होता. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात दक्षिण मुंबईतील कुलाबा ते वरळी दरम्यानच्या संवेदनशील व महत्त्वाच्या ठिकाणी १२५० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

या प्रकल्पाचे तीन नियंत्रण कक्ष असून त्यात वाहनांचे नंबर प्लेट डिटेक्शन, व्हिडीओ नालिटिक्स तसेच एक हजार पोलीस वाहनांच्या जीपीएस ट्रॅकिंगची सुविधा आहे. या प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याचे काम एप्रिल- २०१६ मध्ये तर तिसऱ्या व अंतिम टप्प्याचे काम ऑक्टोबर २०१६ मध्ये पूर्ण होणार आहे. या प्रकल्पामुळे मुंबई शहराच्या सुरक्षेबरोबरच दहशतवादी कारवायांवर देखरेख ठेवणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे व शिस्त लावणे आदी कामात मदत होऊ शकेल.

### पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये सीसीटीव्ही

शंभर टक्के सीसीटीव्ही निगराणी असणारे पुणे हे देशातील पहिले शहर ठरले आहे. या यंत्रणेमुळे संपूर्ण शहरावर अहोरात्र नजर ठेवणे शक्य झाले आहे. जर्मन बेकरी स्फोटानंतर पुणे शहरातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. त्यामुळे संपूर्ण शहरात सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचा निर्णय यापूर्वीच घेण्यात आला होता. परंतु, अनेक अडचणींमुळे हे काम रखडले होते. संपूर्ण पुणे शहरात सीसीटीव्ही बसविण्यासाठी सुमारे २२५ कोटी रुपये एवढा खर्च आला असून पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील ६५०

## नागपूरमध्ये डीसीआरएमएस डायल-१००



नागपूर पोलीस नियंत्रण कक्षातील डीसीआरएमएस डायल-१०० (DCRMS -Distress Call Report Management System) या यंत्रणेमुळे पोलिसांची कार्यक्षमता वाढून जनतेला अधिक गुणात्मक सेवा देणे सुलभ होणार आहे.

पूर्वी नागपूर पोलिसांच्या नियंत्रण कक्षाकडे केवळ १० लाईन्स असल्याने वाढत्या कामकाजासाठी त्या अपूर्ण ठरत होत्या. आता २० लाइन्समुळे अधिक व्यापक व तत्पर सेवा देणे शक्य होणार आहे. या यंत्रणेमुळे नियंत्रणकक्षाकडील कॉल ड्रॉपचे सध्या ८०-८५ टक्के असलेले प्रमाण शुन्यावर येणार असून, त्यासाठी बसविण्यात आलेल्या विशेष सॉफ्टवेअरमुळे सर्व कॉलचा अहवाल प्राप्त होणार आहेत. तसेच या यंत्रणेला जोडलेल्या व्हिडीओ मॉनिटर सुविधेमुळे १०० क्रमांकावर येणारे कॉल आवश्यक तपशीलासह प्रदर्शित होणार असून, तक्रारदारास नियंत्रण कक्षाकडून एसएमएस प्राप्त होणार आहे. कॉल प्राप्त होण्यासह कॉल करणाऱ्याचे लोकेशन, क्रमांक, ओळख आदी तपशीलही प्राप्त होणार असल्याने तक्रारींबाबत पोलीस दक्ष होण्यास मदत होणार आहे. १०० क्रमांकावर येणाऱ्या कॉलची ओळख पटवणारा तपशील पूर्वी मिळत नसल्याने खोट्या व निनावी तक्रारींचे प्रमाण जास्त होते. त्याला आता आळा बसणार आहे. ही यंत्रणा २४ बाय ७ कार्यरत असल्याने शहरातील गुन्हेगारींच्या तक्रारींच्या वेळेनिहाय पॅटर्नचे आकलन होऊन पोलिसांना कामाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. डीसीआरएमएस या यंत्रणेला बीट मार्शल आणि गस्ती पथकांची जोड मिळाल्याने केवळ माहिती मिळणे एवढ्यापुरती पोलिसांची कार्यक्षमता मर्यादित न राहता त्याबाबत त्वरेने कारवाई करण्यातही पोलीस दल आघाडीवर राहणार आहे. शहरातील सर्व २४ पोलिस ठाण्यांच्या क्षेत्रात एकूण १५० गस्ती वाहने तैनात करण्यात आली असून या वाहनांवर बसविलेली यंत्रणा संबंधित कर्मचारी बंद अथवा निकामी करू शकणार नाहीत असे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. या सर्व वाहनांवर जीपीएस यंत्रणा बसवलेली आहे.

नियंत्रण कक्षाकडे कॉल प्राप्त झाल्यानंतर तक्रारदाराचा तपशील पाहून त्या क्षेत्रातील गस्तीपथकाला तत्काळ सूचित केले जाईल. घटनास्थळी परिस्थितीनुसार दोन अथवा अधिक बीट मार्शल पोहोचतील.या सर्व यंत्रणेसह विभागाच्या त्याबाबतच्या सुसूत्र नियोजनामुळे पोलिसांचा एखादा घटनेबाबतचा प्रतिसाद कालावधी आता २०-२५ मिनिटांवरून केवळ ५-७ मिनिटे इतका कमी करणे शक्य झाले आहे.

चौरस किलोमीटर परिसरात अहोरात्र निगराणी ठेवता येणार आहे.

## पोलीस ठाणी पेपरलेस आणि डिजिटल !

गतिमान आणि पारदर्शक प्रशासनासाठी सीसीटीएनएस प्रकल्पाच्या माध्यमातून शासनाच्या विविध विभागात ई–यंत्रणा राबवण्यात येत आहे. पोलीस विभागात प्रामुख्याने पोलीस ठाण्याच्या कारभारात गतिमानता येण्यासाठी पेपरलेस यंत्रणेसह माहितीचे जाळे (नेटवर्क) तयार करण्यात येत आहे.



**केंद्र शासनाच्या ई–गव्हर्नन्स योजनेंतर्गत गुन्हा आणि गुन्हेगारीचा मार्ग काढण्यासाठी नेटवर्क यंत्रणा (सीसीटीएनएस) हा प्रकल्प मिशन मोड प्रोजेक्ट म्हणून संपूर्ण देशामध्ये राबवण्यात येत आहे. या प्रकल्पामध्ये गुन्हा आणि संबंधित गुन्हेगारांच्या माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी राज्यातील सर्व पोलीस यंत्रणा अत्याधुनिक पद्धतीने जोडल्या जात आहेत. या प्रकल्पाच्या उभारणीकरिता राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषण विभाग हे समन्वय कार्यालय म्हणून कार्यरत आहेत. या प्रकल्पाच्या नेटवर्क कनेक्टिव्हीटी, डाटा डिजिटायझेशन, जिल्हा संगणक प्रशिक्षण केंद्र आदी कामांसाठी २२ कोटी ५६ लाख रुपये खर्च करण्यात येतील.**

## ठाण्यात वाहतुकीचे डिजिटल नियंत्रण

ठाण्यासह ठाण्याशी जोडली गेलेली सारी शहरे स्मार्ट सिटी म्हणून विकसित होत आहेत. महानगरांची 'अर्बन मोबिलिटी' गतिमान राखण्याचे सध्या मोठे आव्हान आहे. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढूनही त्यानुसार नागरी शिस्त आणि जाणिवांचा विकास झालेला नाही. त्यातून विविध प्रश्न निर्माण झाले आहेत. रस्ते वाहतूक सुरळीत ठेवण्याची मोठी जबाबदारी पोलिसांनाच पेलावी लागत आहे. पारंपरिक पद्धतीने वाहतुकीचे नियोजन आता कालबाह्य ठरू पाहत आहे. या दृष्टीने ठाणे पोलीस आयुक्तालयाने महत्त्वाचे 'डिजिटल पाऊल' टाकले आहे. आयुक्तालयाने डिजिटल यंत्रणेच्या माध्यमातून वाहतूक नियंत्रण कक्ष अद्ययावत केला आहे.

## मुंबईतील महिला व बालसुरक्षा अधिक चोख

महिलांना कायम सुरक्षित वाटावे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे आणि त्याचाच एक भाग म्हणून महिला गस्ती पथक वाहने मुंबईत सुरू करण्यात आली आहेत. घरात आणि घराबाहेर पडणारी प्रत्येक महिला सुरक्षित असली पाहिजे म्हणून सरकारने संवेदनशीलता दाखवून ही उपाययोजना केली आहे. मुंबई शहरातील ९३ पोलीस ठाण्यांच्या क्षेत्रात ही वाहने तैनात करण्यात आली आहेत. त्यांचे लोकार्पण नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. महिला व बालकांवर होणाऱ्या अत्याचाराला पायबंद घालण्यासाठी हे गस्तीपथक निश्चितच प्रभावी ठरणार आहे.

## वाहतुकीसाठी ई–चलन प्रणाली

नागपूर पोलिसांनी कार्यान्वित केलेल्या ई–चलन प्रणालीमुळे वाहतुकीबाबतची नियंत्रण व्यवस्था अधिक काटेकोर होणार आहे. त्यामुळे वाहनचालकाने केलेल्या वाहतूक नियमांच्या उल्लंघनाबाबत संभ्रम राहणार नाही. सर्वच वाहन चालकांना त्यांच्या विरुद्ध दाखल प्रकरणात दंडाची विश्वसनीय माहिती एस.एम.एस. स्वरूपात उपलब्ध होणार आहे. वाहन चालकाने वेळीच दंड भरल्यास दंडाची रक्कम जमा झाल्याची पावतीदेखील एसएमएसद्वारे दिली मिळणार आहे. ही माहितीदेखील तातडीने डाटा बेसवर अद्ययावत होईल. बँकेच्या कामकाजाप्रमाणे रोखीचे व्यवहार चोख ठेवण्यात मदत होणार आहे. पोलिसांच्या कामात पारदर्शकता येऊन अपप्रवृत्तींना आळा बसेल. या यंत्रणेमुळे सॉफ्टवेअरमधून अपघातांच्या गुन्ह्यांचे तांत्रिक विश्लेषण करता येणे शक्य असल्याने, संपूर्ण जिल्ह्यातील अपघातांची कारणमीमांसा करता येईल. त्यामुळे मानवी चुका कमी होऊन अपप्रवृत्ती टाळता येणे शक्य होईल. वेगवेगळे रिपोर्ट तयार करताना लागणारे श्रम व वेळ यांची प्रचंड प्रमाणात बचत होईल. ई–चलनामुळे कागदी अभिलेखापासून मुक्ती मिळून पर्यावरणाचे रक्षण करता येईल. वेगवेगळ्या प्रकारच्या रिपोर्ट्सचे कॉम्बिनेशन एका क्लिकवर एक्सल शीटमध्ये उपलब्ध होऊ शकेल. वारंवार चलन होणारे वाहन किंवा चालकाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. नियम मोडणाऱ्या गाडीचा क्रमांक पोलीस शिपायाने यंत्रणेतील मोबाइलमध्ये टाकल्यास त्या गाडीमालकाची संपूर्ण माहिती मोबाइलवर उपलब्ध होणार आहे.

### सायबर फोर्स

**सरकारने विविध निर्णयातून पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा निर्धार केला आहे. भविष्यात 'स्ट्रीट क्राइम' कमी होऊन 'सायबर क्राइम' वाढणार आहेत. त्या दृष्टीने डिजिटल गुन्ह्यांसंदर्भात ११०० पोलिसांचे डिजिटल बेस्ड फोर्स निर्माण करण्यात येत आहे. सायबर क्राइमशी संबंधित प्रकरणांसाठी या क्षेत्रातील संस्थांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. पुणे सायबर सुरक्षा केंद्र उभारण्यासाठी मायक्रोसॉफ्टसारख्या नामांकित कंपनीशी मुख्यमंत्र्यांनी चर्चा केली आहे. जास्तीच्या न्यायवैद्यक प्रयोगशाळा तसेच प्रत्येक जिल्ह्यात न्यायवैद्यक प्रयोगशाळा, मोबाइल युनिट कार्यान्वित करण्यात येत आहेत. गुन्हेगारी रोखणारी पहिली सोशल मीडिया लॅब चंद्रपूर येथे होत आहे.**



**(लेखक हे मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०८१०८९७०४०४**




# पहिली स्मार्ट सिटी

"Let the whole world know that the first Smart City of India is launched by Maharashtra', मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ४ डिसेंबर रोजी वाशी येथील प्रदर्शन केंद्रामध्ये सिडकोच्या 'नवी मुंबई (दक्षिण) स्मार्ट सिटी प्रकल्पा'च्या शुभारंभप्रसंगी आपल्या भाषणात जाणीवपूर्वक वापरलेले हे एकमेव इंग्रजी वाक्य. या एका वाक्यातून त्यांनी परकीय गुंतवणूकदारांपर्यंत अपेक्षित असलेला संदेश सहजपणे पोहोचवला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्मार्ट सिटी उभारण्याच्या आवाहनाला, सिडकोच्या स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या माध्यमातून सर्वप्रथम प्रतिसाद देऊन; आघाडीचे राज्य ही आपली प्रतिमा आणखी ठळक करण्यात महाराष्ट्र यशस्वी झाला आहे.




शहरांचा नियोजनबद्ध विकास करताना सिडकोने नवी मुंबई (दक्षिण) स्मार्ट सिटीच्या माध्यमातून देशातील पहिली स्मार्ट सिटी उभारण्यास प्रारंभ करून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. स्वनिधीतून ३४ हजार ७४४ कोटी रुपये खर्चून ही स्मार्ट सिटी सिडको उभारणार आहे.

दक्षिण नवी मुंबईमधील १२ हजार हेक्टर ब्राऊन फिल्ड क्षेत्रातील सात शहरांमध्ये राबवण्यात येणारा हा स्मार्ट सिटी प्रकल्प १० उपक्रमांवर आधारित असून त्यात ८८ उपप्रकल्पांचा समावेश आहे. याबरोबरच २३० हेक्टर क्षेत्रातील 'पुष्पकनगर स्मार्ट टाऊनशीप' हा ग्रीनफील्ड प्रकल्पदेखील हाती घेण्यात आला आहे. हे दोन्ही प्रकल्प पुढील चार वर्षांत पूर्णत्वास येणार आहेत.

स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या पहिल्या प्रकारात स्मार्ट सिटी इनिशिएटीव, स्मार्ट ऑर्गनायझेशन, ई–गव्हर्नन्सद्वारा पारदर्शकता आणि व्यवहारसुलभता, पर्यावरणीय शाश्वतता, स्वच्छ भारत, नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे आणि सर्वसमावेशक नियोजन या घटकांचा समावेश आहे. दुसऱ्या प्रकारात पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, पोर्ट सिटी आणि परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीचा समावेश आहे.

**विशाल ढगे**

## ५५ हजार परवडणारी घरे

आर्थिकदृष्ट्या मागास तसेच कमी उत्पन्न गटातील लोकांसाठी ५५ हजार परवडणारी घरे सिडको बांधणार आहे. स्मार्ट शहरांमधील नागरिक कामाच्या ठिकाणी चालत जाऊ शकतात किंवा कामाच्या ठिकाणी जलद पोहोचण्यासाठी त्यांच्या घराजवळच सुलभ सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून दिली जाईल.

स्मार्ट पार्किंग व्यवस्थापनामध्ये वेळेची बचत, कॅशलेस पेमेंट ऑप्शन, वाहनांची सुरक्षितता तसेच पार्किंग जागेची आगाऊ नोंदणी यांसारख्या सुविधांची सोय आहे. पहिल्या टप्प्यात चारचाकी वाहनांच्या पार्किंगच्या उपलब्धतेबद्दल माहिती देणारे मोबाइल/वेब ॲप्लिकेशन उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये १४ रेल्वे स्थानकांचा, खारघर येथील सेंट्रल पार्क, बेलापूर येथील अर्बन हाट तसेच वाशी येथील प्रदर्शन केंद्रावरील वाहनतळांचा समावेश असणार आहे. पार्किंग स्लॉटच्या सेन्सरच्या माध्यमातून जागेच्या उपलब्धतेबद्दल सेंट्रल गेटवेमार्फत माहिती पुरवली जाणार आहे. डिसेंबर २०१६ अखेर हा प्रकल्प कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

पनवेल येथे ग्रीनफिल्ड इंटर स्टेट बस टर्मिनस बांधण्यात येणार आहे. याबरोबरच वाशी रेल्वे स्थानक ते वाशी सेक्टर २८ यादरम्यान रोपवे सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हार्बर लाइनच्या नेरूळ–बेलापूर–सीवूड–उरण मार्गिकेचे काम हाती घेण्यात आले आहे.

एमयूटीपी – ३ अंतर्गत पनवेल–कर्जत रेल्वे मार्गिकेमुळे कल्याणमार्गे छत्रपती शिवाजी टर्मिनस ते कर्जत या प्रवासापेक्षा पनवेलमार्गे प्रवासाचे अंतर २७ मिनिटांनी कमी होणार आहे. हा प्रकल्प २०२० पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. याबरोबरच छत्रपती शिवाजी टर्मिनसवरील भार हलका करण्यासाठी पनवेल येथे टर्मिनस उभारण्यात येणार असून या कामाला २०१६ पासून सुरुवात होणार आहे. हार्बर लाइनवर धावणाऱ्या सर्व उपनगरीय गाड्या १२ डब्यांच्या करण्यासाठी पायाभूत सुविधांचे काम मार्च २०१६ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

## सामाजिक सेवा सुविधा

स्मार्ट सिटीच्या संकल्पनेध्ये ज्येष्ठ नागरिक, महिला आणि अपंगांना सेवा पुरविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. सर्व सार्वजनिक इमारतींमध्ये अपंगांच्या सहज प्रवेशासाठी विशेष उपाययोजना करून त्यांचे लेखापरीक्षणदेखील करण्यात येणार आहेत. अपंगांसाठी सिडकोच्या गृहप्रकल्पांमध्ये ३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

महिलांच्या विविध प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्थांसाठी तसेच महिला संसाधन केंद्रांसाठी काही भूखंड राखीव ठेवण्यात आले आहेत. युवा प्रकल्पग्रस्तांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आयएल ॲण्ड एफएस या नामांकित संस्थेच्या सहकार्याने कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जात आहे.

## नागरिकांची सुरक्षितता

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी २९३ ठिकाणी ५७४ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत बेलापूर किल्याचे संवर्धन, इंटलिजेंट वाहतूक व्यवस्थापन, खांदेश्वर प्लाझा, बेलापूर येथे वॉटर फ्रंट मरिना, सीवूड रेल्वे कॉम्प्लेक्सचा विकास, मोकळ्या जागा आणि उद्यानांचा विकास, पर्यावरण संवर्धन यांसारख्या अनेक उपप्रकल्पांचा समावेश आहे. सिडको पोर्ट सिटीची उभारणीदेखील करत आहे. नागरिकांना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे याकरिता पायाभूत सोयीसुविधांच्या एकूण खर्चापैकी १२ टक्के खर्च जलव्यवस्थापनावर सिडको करत आहे.

सिडको संस्था स्मार्ट बनवण्याकरिता ई–गव्हर्नन्सच्या माध्यमातून अधिकारी–कर्मचाऱ्यांची क्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जातील. सामाजिक सेवा भूखंडांच्या वाटपासाठी ऑनलाइन प्रणाली, ई–ऑफिस,सॅप प्रणालीचा वापर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे पोर्टल, ४जी कनेक्टिव्हिटी, ऑनलाइन बांधकाम परवानगी प्रणाली, बसची वेळ दर्शवणारे स्मार्ट बसथांबे, वसाहत व्यवस्थापन प्रणाली, माहिती अधिकार कायद्याचे अर्ज ऑनलाइन भरण्याची सुविधा, सिडकोनिर्मित घरांबद्दल माहिती देणारी अद्ययावत प्रणाली, सर्व शासकीय शाळा आणि कॉलेजना मोफत ब्रॉडबॅण्ड कनेक्टिव्हिटी इत्यादी सेवांचादेखील यामध्ये समावेश आहे.

**(लेखक हे सिडकोचे जनसंपर्क अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९९६९२०५६६५**



महाराष्ट्रातील पहिले स्वच्छ शहर

# पाचगणी

# कचरा गेला, फुलल्या बागा





स्वच्छ महाराष्ट्र अभियान
सप्तपदी स्वच्छतेची

**सातारा जिल्ह्यात महाबळेश्वरनंतर थंड हवेचे ठिकाण म्हणून पाचगणीला पर्यटकांची पसंती असते. पाचगणी येथील टेबल लॅन्ड, पारसी पॉईंट आणि सिडनी पॉईंट ही पर्यटकांची खास आवडती ठिकाणे आहेत. वर्षांनुवर्षे कचरा केंद्र म्हणून अस्तित्वात असणाऱ्या पॉईंटचे रूपांतर आता स्वच्छ भारत पॉईंट म्हणून केले आहे. भविष्यात हा पॉईंट निश्चितपणे पर्यटकांच्या पसंतीला उतरेल आणि पाचगणी नगरपालिकेची गौरवगाथा जाताना आपल्यासोबत घेऊन जाईल.**

पाचगणी नगरपालिकेची स्थापना १९१० ला झाली. नगरपालिकेच्या स्थापनेपूर्वीपासून पाचगणी येथील सव्वा एकर जागेवर या परिसरातील कचरा टाकला जात होता. या कचरा डेपोचे रूपांतर घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रक्रिया प्रकल्प कचरा डेपो सुशोभीकरण,कचरा प्रक्रिया प्रकल्प उभा करून पाचगणी नगरपालिकेने आपल्या कामाचा आदर्श निर्माण केला आहे. वर्षांनुवर्षे साठलेल्या कचऱ्याचे रूपांतर खतामध्ये झाले होते. त्याची विक्री पालिकेने केली. सध्या या जागेचे सुशोभीकरण करून या ठिकाणी अत्यंत सुंदर बगिचा निर्माण केला आहे. दररोज शहरातून गोळा करण्यात येणारा ५ टन कचरा वर्गीकरण करून, या ठिकाणी आणला जातो. येथे उभ्या करण्यात आलेल्या कचरा प्रक्रिया प्रकल्पांतर्गत, सेंद्रीय खतामध्ये रूपांतर करणाऱ्या यंत्रामध्ये टाकला जातो. या यंत्रामध्ये

**शहरातून दररोज गोळा करण्यात येणाऱ्या ५ टन कचऱ्याचे वर्गीकरण केले जाते. हा कचरा प्रक्रिया प्रकल्पांतर्गत सेंद्रीय खतामध्ये रूपांतर करणाऱ्या यंत्रामध्ये टाकला जातो. छोट्या भागामध्ये कल्चर सॅनिटेट, लाकडी भुसा टाकला जातो. यानंतर हे सर्व यंत्रामधून काढून छोट्या हौदामध्ये टाकले जाते. त्याचे रूपांतर सेंद्रीय खतात झाल्यावर ते स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना विकले जाते.**

प्रामुख्याने ओला कचरा, सुका पालापाचोळा टाकला जातो. छोट्या भागामध्ये कल्चर सॅनिटेट, लाकडी भुसा आदी टाकले जाते. यानंतर हे सर्व यंत्रामधून काढून तयार करण्यात आलेल्या छोट्या हौदामध्ये टाकले जाते. ८ दिवसांमध्ये त्याचे रूपात सेंद्रीय खतात होते. हे सेंद्रीय खत प्रामुख्याने स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकऱ्यांना विकले जाते. सध्या सकाळी ७ ते सध्यांकाळी ७ अशा १२ तासात गोळा होणाऱ्या ३ टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जात आहे. उर्वरित लोखंडी, प्लास्टिक तसेच काचेच्या बाटल्या आदी कचरा भंगारवाल्यांना विकला जातो, तर प्लास्टिक खंडाळा आणि कोरेगाव येथील फर्निश ऑइल निर्मिती कारखान्यासाठी पाठविला जातो.

**प्रशांत सातपुते**

वर्षानुवर्षे कचरा पॉईंट म्हणून ओळख असणाऱ्या या कचरा पॉईंटचे रूपांतर घनकचरा व्यवस्थापनांतर्गत प्रक्रिया प्रकल्प कचरा डेपोत केले आहे. याचे उद्घाटन नगरविकास सचिव मनीषा पाटणकर– म्हैसकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. सुशोभीकरण करण्यात आलेल्या या पॉईंटचे स्वच्छ भारत पॉईंट, स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट असे नामकरण श्रीमती पाटणकर यांनी यावेळी केले. यावेळी हा पॉईंट, पारसी पॉईंट आणि सिडने पॉईंट यांच्या सुशोभीकरणाबरोबरीनेच स्वच्छ भारत पॉईंट, स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट म्हणून सरस ठरेल. पाचगणी गिरिस्थान नगरपरिषदेने आपल्या कृतीने देशाला आदर्श घालून दिला आहे, असे गौरवोद्गारही श्रीमती पाटणकर यांनी यावेळी काढले. पाचगणी गिरिस्थान नगरपालिकेने आपल्या कृतीतून कचऱ्याचे व्यवस्थापन करून एक नवा पॉईंट निर्माण केला आणि भारत स्वच्छ अभियानामध्ये एक दमदार पाऊल टाकले आहे.

**(लेखक हे साताऱ्याचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९४०३४६४१०१**

- **१९१० म्हणजे पालिका स्थापनेच्या पूर्वीपासून सव्वा एकर जागेवर जमा केला जात होता कचरा.**
- **८ महिन्यापासून कचऱ्याच्या विलगीकरणानंतर खत विक्री.**
- **कचरा पॉईंटवर तयार झाली सुंदर बाग.**
- **घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाव्दारे सध्या अडीच टनावर प्रक्रिया.**
- **उर्वरित अडीच टन कचऱ्याचे होतेय विलगीकरण.**
- **कचरा पॉईंट बनला स्वच्छ भारत पॉईंट, स्वच्छ महाराष्ट्र पॉईंट.**

# माथेरान जनजागृतीतून स्वच्छता



**पर्यटकांचे आदरातिथ्य करणाऱ्या माथेराननने आपले सौंदर्य अधिक खुलविण्यासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियानातील स्वच्छतेचा वसा घेऊन अनुकरणीय अशी मजल गाठली आहे. या नगरपरिषदेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पारितोषिक देऊन नुकतेच गौरवण्यात आले.**

**डॉ.राजू पाटोदकर**

'आले गावकऱ्यांच्या मना, तिथे कोणाचे चालेना...' याप्रमाणे माथेरानच्या नागरिकांनी ठरवले की, आपले प्रधानमंत्री नरेंद्रजी मोदी यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आलेल्या 'स्वच्छ भारत अभियानात' सहभागी व्हायचे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती म्हणजे २ ऑक्टोबर २०१४ पासून या अभियानास शहरात प्रारंभ करण्यात आला. नगरपरिषदेचे कर्मचारी आणि त्यांच्या शाळेतील कर्मचारी, विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची शपथ घेऊन अभियानास सुरुवात केली. मुठभरांनी सुरू केलेला स्वच्छतेचा वारू पुढील दहा दिवसात चौफेर उधळून संपूर्ण शहरात वावरू लागला. शहरातील नागरिकांना, उद्योजकांना, हॉटेल मालकांना आपले घर, शहर, परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत संबंधित नगरसेवकांनी आवाहन केले. त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळून २१ ते ३० ऑक्टोबर १४ या दहा दिवसात गल्ली, मोहल्ला, वस्ती, चौक, सार्वजनिक शौचालये सर्वत्र सफाई सुरू झाली. विशेषत: पर्यटकांना आकर्षित करणारी माथेरानमधील सर्व पर्यटनस्थळे (पॉईंट्स) प्लॅस्टिक, कचरा गोळा करून स्वच्छ करण्यात आली. सर्वत्र जनजागृती करून कचरा उघड्यावर न फेकता घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे सुपुर्द करण्याचे सांगण्यात आले. शहराच्या प्रमुख ठिकाणी स्वच्छ भारत अभियान संदर्भात बॅनर्स, होर्डिंग



लावून जनजागृती केली, तर संपूर्ण गावात मेगाफोनद्वारे स्वच्छता अभियानाची माहिती दिली. याला महत्त्वाची जोड मिळाली ती राज्याचे स्वच्छतादूत तथा ज्येष्ठ निरूपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या आशीर्वादाची. रेवदंडा येथील डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानमार्फत जवळपास १४०० दासभक्तांनी १६ नोव्हेंबरला संपूर्ण माथेरान शहरात स्वच्छता केली. त्यामुळे अभियानास मोठे बळ मिळाले.

### शंभर टक्के शौचालय

माथेरान शहराने डोक्यावरून किंवा गाडीने मैला वाहून नेण्याची पद्धत २५ वर्षांपूर्वीच बंद केली आहे. ४ जुलै, २०१५ च्या सर्वेक्षणातील माहितीनुसार शहरातील निवासी भागात ८८५ व लॉजिंग बोर्डींग हॉटेलमध्ये १२५३ शौचालये आहेत. तसेच नगरपरिषदेच्या मालकीची १३८ सार्वजनिक शौचालयेदेखील आहेत. ९६५ कुटुंबांपैकी ७७९ कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये असून उर्वरित १८६ कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात. माथेरान शहरामध्ये २०११ च्या जनगणनेपूर्वीच उघड्यावर शौचास बसण्याची पद्धत पूर्णत: बंद करण्यास नगरपरिषदेला १०० टक्के यश प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झालेल्या नगराध्यक्षांच्या सभेमध्ये माथेरानच्या नगराध्यक्षांनी नगरपरिषदेच्या हद्दीत उघड्यावर शौचास जाणारे कोणतेही कुटुंब नाही, अशी माहिती देऊन उघड्यावर शौचास बसण्याचे बंद झाल्याचे अभिमानाने घोषित केले.

### बहुपयोगी बायोगॅस प्रकल्प

कोणतेही कार्य सिद्धीस जाण्यासाठी, अचूक नियोजन व काटेकोर अंमलबजावणी महत्त्वाची असते आणि हे जर योग्य झाले तर यश आपसूकच मिळते. याचा प्रत्यय माथेरान नगरपरिषदेला आला. स्वच्छता मोहीम राबवत असताना, त्यांनी प्रामुख्याने कचरा विल्हेवाटेचे नियोजन व अंमलबजावणी केली. खाजगी बाजार, कत्तलखाने, उपहारगृहे, गोठे, तबेले येथील कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी बीआरसीच्या तंत्रानुसार तयार केलेला निसर्गऋण बायोगॅस प्रकल्प महत्त्वाचा ठरला. या ठिकाणी दररोज अंदाजे ६.५० मे.ट. कचरा जमा होऊन त्याची विल्हेवाट लावली जाते. या प्रकल्पास आयएसओ – ९००१ – २००८ हे जागतिक दर्जाचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पातून तयार झालेल्या गॅसचा उपयोग नगरपरिषदेची निवासस्थाने, दवाखाने, कार्यालय आदी ठिकाणी ज्वलनासाठी केला जातो. तर शहरातील स्ट्रीट लाइट याद्वारे कार्यान्वित केलेले आहेत. अवघे ३६ लक्ष रुपये खर्च करून हा प्रकल्प उभारला गेला आणि साधारणत: ६० ते ७० हजार रुपयांची प्रतिमाह बचत करण्यास नगरपरिषद यशस्वी ठरली. असा हा बहुपयोगी प्रकल्प ठरला.



### नगराध्यक्ष गौतम गायकवाड



**माथेरानचे नगराध्यक्ष गौतम भीम गायकवाड या अभियानासंदर्भात बोलताना म्हणाले, 'माझ्या नगराध्यक्षपदाच्या कार्यकाळात या नगरपरिषदेला हा सन्मान मिळाला, हे माझे भाग्य समजतो. माझी सर्वांना विनंती आहे की, माथेरान हे केवळ माथेरानकरांचे नसून संपूर्ण देशाचे आहे. आपल्या राज्यातील हे एक महत्त्वाचे निसर्गरम्य पर्यटनस्थळ आहे. तेव्हा स्वच्छ व सुंदर माथेरान ठेवण्यासाठी नागरिकांसह पर्यटकांनी सहकार्य करावे. हा परिसर इको सेंसेटिव्ह झोन असल्याने प्लास्टिक व इतर कचरा याबाबत सर्वांनी विशेष दक्षता घेऊन माथेरानची निसर्गरम्यता व सुंदरता वाढवावी.**

### प्लास्टिक बॅग बंदी

माथेरान क्षेत्र हे पर्यावरण संवेदनशील म्हणून केंद्र शासनाने घोषित केल्यामुळे नगरपरिषद हद्दीत प्लास्टिक बॅग वापरावर पूर्णत: बंदी आहे. त्यानुसार असलेल्या सर्व नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी होण्याकरिता नगरपरिषदेने सन २००० सालापासून प्रयत्न सुरू केले. शहरातील नागरिक, हॉटेलधारक, बंगलेधारक, स्टॉलधारक यांना वेळोवळी नोटीसा दिल्या आहेत. तसेच वर्तमानपत्राद्वारे, मेगाफोनद्वारे सर्वांसाठी प्लास्टिक बॅग वापर पूर्णत: बंदीचे आवाहन केले. त्यास मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळाला. शिवाय नागरी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत २००५ सालापासून, आऊटपूट बेसिसवर ठेकेदाराची नियुक्ती करून, त्यांच्यामार्फत दररोज शहरात स्वच्छता करून घेतली जाते. या कामामुळे नगरपरिषदेच्या हद्दीतील नागरिकांना रोजगार मिळाला आहे. ओला व सुका कचरा, बांधकामाचे डेब्रिज, जैव व घनकचरा याची योग्य विल्हेवाट, जनजागृतीवर सातत्याने भर आणि मुख्य म्हणजे नागरिकांनी स्वत: दिलेला प्रतिसाद याद्वारे नगरपरिषदेने हे शिवधनुष्य उचलून; स्वच्छतेचा झेंडा फडकवला आहे. अर्थातच ज्याप्रमाणे आपण परदेशात गेल्यानंतर तेथील स्वच्छता पाहून, इतरत्र कचरा टाकण्यास धजावत नाही. तसेच आपल्या देशात, आपल्या गावातही केल्यास काय हरकत? याचा विचार माथेरानला येणाऱ्या पर्यटकांनी नक्कीच करावा.

**(लेखक हे रायगडचे जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९८९२१०८३६५**

# वेंगुर्ला अभिनव आणि यशस्वी



**एखाद्या विधायक कामासाठी जेव्हा जनता आणि प्रशासन एकत्रित येतात तेव्हा ते काम कितीही अवघड असले तरी पूर्णत्वाला नक्कीच जाते आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे समाजाला दिशा देणारा हा एक महत्त्वाचा विधायक उपक्रम ठरतो ! यासाठी आवश्यक असते ती दूरदृष्टी व कल्पक नेतृत्व. याचाच प्रत्यय सध्या वेंगुर्ला नगरपरिषदेच्या प्लास्टिक निर्मूलन, हागणदारीमुक्त शहर, कचरा संकलन या विधायक कार्यक्रमातून दिसून येत आहे. कचऱ्याचे चतु:सूत्री पद्धतीने वर्गीकरण व प्रक्रिया हा एक अभिनव उपक्रम असून, वेंगुर्ला नगरपरिषदचे मुख्याधिकारी रामदास कोकरे यांच्या कल्पक व ध्येयनिष्ठ पुढाकाराला नगराध्यक्ष प्रसन्ना कुबल व सर्व नगरसेवक, सर्व कर्मचारी तसेच नागरिक यांनी दिलेल्या सहकार्यामुळे ; वेंगुर्ला शहरात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाची एक लोकचळवळ निर्माण झाली आहे.**

लोकसहभागाची उत्स्फूर्तता, प्रशासनाची जागरूकता आणि योग्य व्यवस्थापन या सर्वांच्या एकत्रित परिपाकामुळे आज वेंगुर्ला नगरपरिषद प्लास्टिकमुक्त झाली आहे. देशातील पहिली कचरामुक्त नगरपरिषद म्हणून तिची वाटचाल सुरू झाली आहे. केवळ वाटचालच नव्हे तर कचरा व्यवस्थापनाबाबत तिने संपूर्ण देशात आपला आदर्श निर्माण केला आहे.

**अर्चना माने**

दररोज संकलित केल्या जाणाऱ्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती, बायोगॅस, ब्रिकेट त्याचबरोबर कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वेंगुर्ल्यात अंदाजे सहा एकर जागेत कचरा व्यवस्थापनेचा प्रकल्प विकसित करण्यात आला आहे. या प्रकल्पात दररोज दीड ते दोन टन ओला कचरा, साडेचार ते पाच टन सुका कचरा तर ५० किलो प्लास्टिक कचरा संकलित केला जातो. त्यानुसार ओल्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती, बायोगॅसची निर्मिती केली जाते. या शिवाय प्लास्टिक कचऱ्याचे प्लास्टिक क्रशर मशीनद्वारे विघटन करून, हा कचरा डांबरात घालून त्याचा वापर मजबूत अशा रस्ते बांधणीसाठी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. काचेच्या व धातूच्या बाटल्या रिसायकलिंगसाठी

देण्यात येणार असून, या विक्रीपासून उपलब्ध झालेला निधी हा पुन्हा याच प्रकल्पाच्या आवश्यक बाबींसाठी वापरण्यात येणार असल्याचा मानस मुख्याधिकारी रामदास कोकरे यांनी व्यक्त केला आहे.




**सुका कचरा, ओला कचरा, प्लास्टिक आणि काच व धातूंचा कचरा या चतु:सूत्रीनुसार कचऱ्याचा स्वीकार, वर्गीकरण आणि त्याचे स्वतंत्ररीत्या संकलन करणारी वेंगुर्ला नगरपरिषद ही देशातली पहिली नगरपरिषद**

## देशातली पहिली नगरपरिषद

सुका कचरा, ओला कचरा, प्लास्टिक आणि काच व धातूंचा कचरा या चतु:सूत्रीनुसार कचरा घेताना नागरिकांकडूनच तो वर्गीकरण करून घेऊन, तो स्वतंत्ररीत्या संकलित करणारी वेंगुर्ला नगरपरिषद ही देशातील पहिली नगरपरिषद म्हणावी लागेल. नागरिकांनी कचरा चतु:सूत्रीला उत्स्फूर्त प्रतिसाद देत स्वत: आपल्या खर्चातून ठिकठिकाणी कचऱ्याचे वर्गीकरण करणाऱ्या कचरापेटींची उभारणी केली आहे. या पेटीत कचऱ्याच्या प्रकारानुसार रोज सकाळी घरातला कचरा टाकला जातो. वेंगुर्ला नगरपरिषदेच्या कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांना जी.पी.एस.ची सुविधा बसवण्यात आली असून, त्यानुसार कोणती गाडी कोणत्यावेळी कुठे आहे याची दररोज नोंद अधिकाऱ्यांकडून घेतली जाते. याशिवाय प्रत्येक गाडीबरोबर एका पथकाची नियुक्ती करण्यात आली असून यद्वारे प्रत्यक्ष कचऱ्याची व्यवस्थित उचल केली जाते की, नाही यावर देखरेख ठेवली जाते. त्याचबरोबर रोज सकाळी स्वत: मुख्याधिकारी व इतर अधिकारी, कर्मचारी सकाळी सहा ते नऊ या वेळेत शहरात फिरून; कचरा संकलित व वर्गीकृत केला जातो याबाबत पाहणी करतात. याशिवाय निर्माल्य टाकण्यासाठी ठिकठीकाणी कलश ठेवण्यात आले आहेत. तसेच वेबसाईट, व्हॉटस ॲप व १८००२३३२०९९ या टोल फ्री क्रमांकावर कचरा संकलनाबाबत नागरिकांच्या काही समस्या असल्यास संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वेंगुर्ला नगरपरिषदेचे

## प्लास्टिकपासून मुक्ती

**'कशाला करता मायक्रॉनची बात...बंद करू या प्लास्टिक एकसाथ' हा नारा देत वेंगुर्ला नगरपरिषदेने प्रशासन व लोकसहभागामधून सुरू केलेली ही वाटचाल कमालीची यशस्वी झाली आहे. नागरिकांनीही यामध्ये आपला कृतिशील सहभाग नोंदविला आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणून नगरपरिषदेने दिलेल्या कापडी व कागदी पिशव्यांचा वापर येथील नागरिक आवर्जून करताना दिसून येत आहेत. याशिवाय बाहेरून येणारे पर्यटक, नागरिकांसाठीही प्लास्टिकच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे. येत्या काही दिवसात ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची सोय उपलब्ध करण्यात येणार असून कचरा निर्मितीस कारणीभूत असलेल्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे.**

मुख्याधिकारी रामदास कोकरे यांचे सूक्ष्म नियोजन आणि व्यवस्थापन, त्याचबरोबर नगरपरिषदेचे अधिकारी आणि कर्मचारी आणि महत्त्वाचे म्हणजे नागरिकांचा मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद व सहभाग यामुळे या अभियानाला गती मिळाली. हळूहळू लोकांमध्ये जागरूकता निर्माण होऊन त्यांचा या मोहिमेस चांगला प्रतिसाद मिळू लागला. या विधायक कामाला युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ इंडिया या बँकांनी आर्थिक हातभार लावला. त्यामुळे वेंगुर्ला नगरपरिषदेचा एकही रुपया खर्च न होता लोकसहभागातून हा आदर्श उपक्रम साकार झाला.

**सुक्या कचऱ्यापासून कंपोस्ट खताची तसेच काजू फॅक्टरीसाठी लागणाऱ्या ब्रिकेट व शेगडीसाठी वापरण्यात येणाऱ्या गोळ्यांची निर्मिती केली जाते.**



**(लेखिका सिंधुदुर्गच्या माहिती सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत.)**

# समतोल विकासावर भर




**महाराष्ट्राच्या प्रादेशिक समतोल विकासावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भर दिला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासूनचा अनुशेष भरून काढताना विदर्भाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना आखण्यात आल्या आहेत. हिवाळी अधिवेशनात रस्त्यांपासून दंत महाविद्यालयापर्यंत आणि कृषीपासून उद्योगापर्यंत सर्वच क्षेत्रांमध्ये विदर्भ उर्वरित महाराष्ट्राच्या बरोबरीने यावा, यासाठी पुढील काही बाबींवर भर देण्यात आला.**

- गोसेखुर्दसाठी कंपनी स्थापन करणार. त्यासाठी १० हजार कोटी रुपयांचे करमुक्त कर्जरोखे उभारणार.
- सुपर एक्सप्रेस हायवेला समांतर रेल्वेमार्ग उभारणार. पहिला टप्पा २०१९ पर्यंत पूर्ण करणार.
- विदर्भ व मराठवाड्यामधील पायाभूत सुविधा पूर्ण करण्यासाठी कृषी, उद्योग आदी क्षेत्रात विशेष उपाययोजना करण्यासाठी भरीव निधी उपलब्ध करून देणार
- विदर्भ व मराठवाड्यामध्ये रस्त्यांचे जाळे कमी आहे. त्यासाठी येत्या दोन वर्षामध्ये १९ जिल्ह्यातील रस्ते बांधणीसाठी विशेष बाब म्हणून ५०० कोटी रुपये देणार
- इको-टुरिझम बोर्डामार्फत नागपुरात शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन योजना
- आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांसाठी श्री सिद्धीविनायक शिष्यवृत्ती देणार.
- विदर्भाचा अनुशेष भरून काढण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवण्यात या विभागातील शासकीय नोकर भरतीचा अनुशेष भरून काढण्याची कार्यवाही सुरू.



- आरोग्य विभागाचा विदर्भ व मराठवाड्याचा २३९.३६ कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष भरून काढण्यासाठी मार्चच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात निधी दिला जाईल.
- वर्धा-यवतमाळ-नांदेड रेल्वेमार्गासाठी विशेष कंपनी.
- वरूड येथे संत्रानिर्जलीकरण प्रकल्प.
- मिहानमध्ये लॉजिस्टिक पार्क व हब
- विदर्भ व मराठवाड्यातील ३९ सिंचन प्रकल्प मार्चपर्यंत पूर्ण करण्याचा संकल्प या अनुषंगाने सुधारीत प्रकल्पांना मान्यता प्रदान.
- वाशिम येथे नवे शासकीय दंत वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले जाईल. याच्या पाठपुराव्यासाठी जानेवारीत जिल्हाधिकारी, स्वयंसेवी संस्था व लोकप्रतिनिधींची समिती स्थापन केली जाईल.
- सार्वजनिक आरोग्य विभागाचा अनुशेष भरून काढण्यासाठी पूर्ण निधी देण्यात येईल. आरोग्य विभागात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आवश्यकता असून विदर्भ व मराठवाड्यात ७५७ वैद्यकीय अधिकारी व विशेष तज्ज्ञ अधिकारी भरण्याचे आदेश

- अकोला, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गोंदिया, लातूर, उस्मानाबाद या विमानतळांचे प्रश्न केंद्र सरकारकडे जाऊन सोडवणार





- संत्रा उत्पादकांना प्रती झाड ५०० रुपये मदत मिळायची. ती वाढवून प्रती झाड २४०० रुपये करण्यात आली. यासंबंधीचा शासकीय आदेश जारी करण्यात आला.

- दोन महिन्यात उद्योगांना कमी दरात वीज मिळेल. उद्योगांची समस्या सोडविण्यासाठी एक स्थायी समिती स्थापन केली जाईल.



# रस्तेसुरक्षा व्हावी आपली जीवनशैली

**जगातील प्रगत, विकसनशील आणि विकसित देशात विविध प्रकारच्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. रस्ते आणि पायाभूत सुविधांमध्ये वाढ होऊन त्यात गुणात्मक बदल झालेला आहे. शिवाय लोकांच्या क्रयशक्तीत वाढ झाल्याने वाहननिर्मिती उद्योग वाढीस लागला आहे. त्यामुळे अधिकाधिक वाहने रस्त्यावर येत आहेत.**



वाहनांची संख्या वाढल्याने अपघातांची संख्या वाढली आहे. यामध्ये बरीच प्राणहानीसुद्धा होत आहे. त्यामुळे देशात आणि राज्यात रस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत आहे. एका अंदाजानुसार देशात १४ कोटी ३८ लाख वाहने आहेत. त्यापैकी महाराष्ट्रात १ कोटी ७५ लाख वाहने आहेत. या वाहनांमुळे रस्त्यांवरील गर्दी वाढत आहे. अनेकदा वेगमर्यादेचे पालन न करण्यामुळे अपघात होतात. वेगवेगळ्या प्रकारच्या निष्काळजीपणांमुळे अपघातांना निमंत्रण दिले जाते. पुढच्याच ठेस मागचा शहाणा असे काही होताना दिसत नाही. डोळ्यांसमोर अपघात घडूनही पुन्हापुन्हा त्याच त्याच चुका केल्या जातात. त्यातून नवे अपघात घडतात. लोकांचे प्राण जातात. रस्ते वाहतूक खोळंबते. खोळंबलेली अशी वाहतूक बरेच आर्थिक नुकसानही करून जाते. प्राणहानी ते वित्तहानी अशा मोठा विस्तार एका अपघातामुळे होतो.

## हानी टाळण्यासाठी प्रयत्न

प्राणहानी आणि वित्तहानी टाळण्याचे प्रयत्न सातत्याने होणे आवश्यक आहे. त्यासाठी जनजागृती आवश्यक आहे. त्यामुळे परिवन मंत्री दिवाकर रावते यांनी रस्ते वाहतूक सुरक्षेला प्राधान्य देण्याचे ठरवले आहे.


एका अधिकृत आकडेवारीलनुसार देशात २०१४-१५ साली १ कोटी ३८ लाख अपघात झाले. यातील महाराष्ट्रातचा आकडा होता, ६१ हजार ८९०. या अपघातामध्ये १२ हजार १९४ व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या. ४१ हजार ६०१ जखमी झाल्या. बरेचजण कायमचे अपंग झाले. मृत्यू पावलेल्या व्यक्तिंमध्ये २५ ते ४० या वयोगटातील व्यक्तींचा सर्वाधिक समावेश होता. हा वयोगट सर्वाधिक क्रियाशील असा असतो. अनेक घरातील कर्तेसवर्ते मरण पावल्याने जसे त्या कुटुंबाचे भरून न येणारे नुकसान होते तसेच देश व राज्याचेही होत असते. अनेक प्रतिभावंत गुणी कलावंत, खेळाडू व इतर मान्यवरांना आपले प्राण या अपघातात गमवावे लागले आहे. त्यामुळे रस्ते सुरक्षा ही अत्यंत महत्त्वाची बाब ठरली आहे.

## काही उपाययोजना

रस्त्यांवरील अपघातांच्या कारणांमध्ये वाहन चालकांची चुकी हे एक ठळक कारण दिसून आले आहे. वाहनचालक हा घटक लक्षात घेऊन परिवहन विभागाने गेल्या काही दिवसांपासून संगणकीकृत शिकावू अनुज्ञती चाचणी, सेन्सर बेस्ड वाहनचालक चाचणी, ऑटोमेटेड व्हेइकल तपासणी आदी बाबींवर भर दिला आहे. शासनाने रस्तेसुरक्षा नियमावली तयार केली असली तरी त्याची पुरेशी जाणीव सामान्य नागरिकांना नसते. त्यामुळे लोकांना या नियमावलीची माहिती करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत. रस्तेसुरक्षेचे महत्त्व लोकांना पटावे यासाठी दरवर्षी भारत सरकारतर्फे जानेवारी महिन्यात रस्तेसुरक्षा सप्ताह आयोजित केला जातो. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकार १० जानेवारी ते १४ जानेवारी २०१६ या कालावधीत रस्तेसुरक्षा पंधरवाडा आयोजित करणार आहे. हा पंधरवाडा यशस्वी करण्याचे आवाहन परिवहन मंत्री दिवाकर रावते यांनी केले आहे.

## सर्वांची जबाबदारी

रस्तेसुरक्षा ही सर्वांचीच जबाबदारी असल्याने प्रत्येक घटकाने या सुरक्षेतसाठी आपले योगदान दिले पाहिजे. सर्वांचे सहकार्य आणि समन्वयातूनच हा पंधरवाडा यशस्वी होऊ शकतो. या पंधरवड्यात राज्यात व्याख्याने, कार्यशाळा, रॅली, चित्रकला निबंधस्पर्धा आयोजित केल्या जातील. यामध्ये अधिकाधिक लोकांनी सहभागी होण्याचे आवाहन श्री.



रावते यांनी केले आहे. रस्ता अपघात घडल्यावर केवळ बघे न बनता व पुढे न जाता, मदतीला धावा असेही आवाहन त्यांनी केले आहे. रस्तेसुरक्षा ही सर्वच शासकीय विभागाचीही जबाबदारी असून त्यांनीही प्रयत्न करणे गरजेचे आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने हेल्मेटचे महत्त्व मोठे असल्याने हेल्मेट वापरण्यासाठी बंधपत्र लिहून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हेल्मेट वापरण्याची सवय लोकांनी स्वत:च करायला हवी कारण जीव वाचवणारी ही उत्तम सवय आहे.

रस्तेसुरक्षा केवळ पंधरवड्याची बाब नसून ती जगण्याची पद्धतीच होणे गरजेचे आहे. त्यासाठी जाणीवजागृती महत्त्वाची ठरते. ही जाणीवजागृती आपल्या हितासाठी व राज्याच्या सर्वांगीण कल्याणासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे सर्वांनी यात आपला सक्रिय सहभाग दिला पाहिजे.

**टीम लोकराज्य**



# 'वाल्हे'चा कायापालट

**राज्य सरकारची 'जलयुक्त शिवार' योजना अनेक गावांसाठी वरदान ठरू लागली आहे. जुने जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आहेत. छोटे-छोटे बंधारे भरल्याने आजूबाजूची पिके वाचली आहेत. विहिरी, कूपनलिकांच्या पाण्यात वाढ झाली आहे. सरकारी योजनेबरोबरच लोकांनी पुढाकार घेऊन योजनेला एक लोकचळवळीचे रूप दिले आहेत. अशक्य वाटणारी कामे कमी वेळेत झाल्याने परिसराचा कायापालट होऊ लागला आहे. अशी एक यशोगाथा वाल्हे या गावाची..**

**खंडूराज गायकवाड**

पुणे जिल्ह्यातील अवर्षणग्रस्त तालुका म्हणून पुरंदर तालुका ओळखला जातो. याच तालुक्यात महाराष्ट्राचे कुलदैवत मार्तंड खंडेरायाची सोन्याची जेजुरी. अशा या तीर्थक्षेत्रापासून दहा कि.मी. अंतरावर ३६ कि.मी. परिसरात विखुरलेल्या बारा वाड्या-वस्त्यांचे सुमारे दहा हजार लोकवस्तीचे तालुक्यातील सर्वात मोठे



असलेल्या 'वाल्हे' या गावाचा जलयुक्त शिवार योजनेमुळे कायापालट झाला. कुठेही प्रसिद्धीच्या झोतात नसलेल्या रामायणकार वाल्मिकी ऋषींची समाधी याच गावात आहे.

### गावाने करून दाखवले...

विकासाच्या दृष्टीने अत्यंत मागासलेले व दुष्काळाने होरपळलेले हे गाव पुरंदर तालुक्यातील अत्यंत कमी पर्जन्यमान असलेल्या गावापैकी एक आहे. मात्र या गावाने 'गाव करील, तिथे राव काय करेल' या उक्तीप्रमाणे 'गाव करील, तिथे प्रशासन काय करेल' हे दाखवून दिले. दुष्काळामुळे शेतात पिके नाहीत. या भागात कुठेही औद्योगिक प्रकल्प नाही. त्यामुळे बेरोजगारांची संख्या वाढत गेली. गावातील काही तरुण रोजगारासाठी बाहेरगावी गेले. म्हणूनच या गावातील काही धाडसी नागरिकांनी राज्य सरकारच्या मदतीसोबत काही खाजगी संस्थांकडून जलयुक्त शिवार योजनेची कामे हाती घेण्यासाठी आर्थिक मदत मिळवण्याकरीता दानशूर व्यक्तींकडे हात पुढे केला. त्यांना या प्रयत्नात मोठे यश मिळाले. रसिकलाल थारीवाल ट्रस्ट आणि सकाळ रिलीफ फंडाच्या माध्यमातून जलयुक्त शिवार योजनेच्या कामाला आर्थिक मदत मिळाली, अन् कामाला गती मिळाली. गावातील प्रत्येक गावकऱ्यांने या कामासाठी योगदान दिले. काम करणाऱ्या मजुरांना कोणी पाणी दे! कोणी आपल्या पदरच्या खर्चाने या कामगारांना नाष्टा जेवण दे! काही गावकऱ्यांनी बंधाऱ्यातील गाळ व्यवस्थित काढला जातो की नाही हे बघण्यासाठी एक दिवसाचा रोजगार बुडवून दिवसभर देखरेखीचे काम चोख बजावले. त्यामुळे ज्या कामांना एक कोटी ८० लाख रुपयांची गरज होती, ती कामे अवघ्या ५८ लाख रुपयांत एक रुपयांचा भ्रष्टाचार न होऊ देता, पूर्ण झाले. कृषी विभागाच्या योजनेंतर्गत सात छोट्या-मोठ्या बंधाऱ्याची कामे गावात पूर्ण झाली आहेत. या जलयुक्त शिवार योजनेचे काम पाहण्याचा 'मोह' मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही आवरता आला नाही. म्हणूनच या गावातील पिंगोरी बंधाऱ्याला मुख्यमंत्र्यांनी ११ जून २०१५ रोजी भेट दिली. त्यांनी या लोकसहभागाच्या कामाचे तोंड भरून कौतुक केले. या गावचे उपसरपंच पोपट नाना पवार, तालुक्याबाहेर सेवेत असलेले परंतु गावाबद्दल आस्था असलेले तहसीलदार आणि याच गावचे ग्रामस्थ संदेश शिर्के यांनी पुढाकार घेऊन आपल्या गावात जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून पाणी अडवण्याची लोकचळवळ उभी केली. त्यामुळे संपूर्ण गाव एकदिलाने या कामासाठी सहभागी झाले.

### नवा आदर्श

हे सर्व करीत असताना विविध स्तरांवर प्रशासकीय मान्यता महत्त्वाच्या असतात. त्यासाठी सरकारी कार्यालयात दहा वेळा येरझाऱ्या आल्याच. परंतु महाराष्ट्रात एकमेव या गावाचे उदाहरण म्हणावे लागेल की, पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरव राव आणि पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कांतीलाल उमप यांनी एप्रिलपासून या अवर्षणग्रस्त वाल्हे गावातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामाला गती देऊन एक नवीन आदर्श घडवला. गावकऱ्यांना दुष्काळावर मात करण्यासाठी एक प्रकारचा विश्वास निर्माण करून दिला, म्हणूनच गावातील लोकांनी उत्साहाने सहभाग घेतला. गावात ठिकठिकाणी तीन फोकलेन मशिन, एक जीसीबी आणि नऊ डंपर गाड्याच्या माध्यमातून गाळ काढण्याचे काम रात्रंदिवस सुरू होते. ४८ एकर क्षेत्रातील सुमारे अडीच लाख घनमीटर गाळ काढला. परंतु काढलेला गाळ आणि मुरूम फेकायचा कुठे? ही समस्या गावासमोर उभी होती. परंतु युक्ती नाही, म्हणजे ते गाव कसले! त्यावर गावकऱ्यांनी उपाय शोधून काढला. काही गाळ त्यांनी शेतकऱ्यांच्या शेतात टाकून जमिनीची भरणी केली. हा गाळ शेतकऱ्यांनी आपल्या स्वखर्चाने शेतात टाकला. बंधाऱ्यातून काढलेल्या मुरुमाचा बंधाऱ्याच्या बाजुलाच चांगला २१ कि.मीटरचा रस्ता तयार करण्यात आला. गावातील क्रीडांगणावर मुरूम टाकून या मैदानाचे सपाटीकरण त्यांनी केले. उद्या जर या भागात उत्तम पाऊस पडला तर या एकूण बंधाऱ्यात एवढी पाणी साठवण्याची क्षमता झाली आहे की त्यानंतर जरी गावात दोन वर्षे पाऊस पडला नाही तरी जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून, बांधलेल्या बंधाऱ्यातील पाणी या गावाला सुजलाम-सुफलाम ठेवील; असे नियोजन या लोकसहभागामुळे झाले आहे.

**(लेखक हे सांज महानगरीचे मंत्रालय प्रतिनिधी आहेत.)**
**संपर्क : ०९८१९०५९३३५**

## मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात तीन पक्षी अभयारण्ये

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या १० व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात तीन नवीन पक्षी अभयारण्यांना मंजुरी देण्यात आली. त्यात माहूल शिवडी क्षेत्र, नवी मुंबईतील पाम बीच येथील टीएससी - एनआरआय पानथळ जमीन आणि पांजे फुंडे क्षेत्र यांचा समावेश आहे.



फ्लेमिंगो पक्षी अधिवास सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. याच बैठकीत मुंबई ट्रान्स हार्बर प्रकल्पासही मान्यता देण्यात आली. राज्य वन्यजीव मंडळाच्या शिफारसीसह हा प्रस्ताव आता राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे पाठवण्यात येईल.

राज्य वन्यजीव मंडळाच्या ९ व्या बैठकीत मुंबई ट्रान्स हार्बर प्रकल्प चर्चेसाठी सादर करण्यात आला होता. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर आवश्यकतेनुसार तज्ज्ञांच्या मदतीने अभ्यास करून उपाययोजना सुचवाव्यात असे या बैठकीत निश्चित करण्यात आले होते. त्याप्रमाणे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीने अभ्यास करून आपल्या उपाय योजनांचा अहवाल सादर केला. या अहवालामध्ये सुचवण्यात आलेल्या सर्व योजनांवर सविस्तर चर्चा होऊन या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

प्रायोगिक तत्त्वावर बीड, लातूर, उस्मानाबाद आणि जळगाव जिल्ह्यातील काही निवडक तालुक्यांमधील गावांकरिता एक वर्षासाठी रोही आणि रानडुक्कर यांना उपद्रवी म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. राज्यातील उर्वरित जिल्ह्यात ज्याठिकाणी रोही आणि रानडुक्करांचा उपद्रव आहे तिथे या प्राण्यांचा उपद्रव थांबवण्याच्या पद्धतीचा भारतीय वन्यजीव संस्था देहरादून यांच्या सहकार्याने शास्त्रशुद्ध अभ्यास करावा व राज्य वन्य जीव मंडळाच्या पुढील बैठकीत त्याचे सादरीकरण व्हावे असे निश्चित करण्यात आले.

## रेमंड प्रकल्पास जमीन

वस्त्रोद्योग क्षेत्रात अव्वल असलेल्या रेमंड कंपनीस अमरावती येथील नांदगाव पेठ औद्योगिक वसाहतीतील २०० हेक्टर जमीन देण्यासंदर्भातील देकार पत्र रेमंडचे चेअरमन व व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया यांना नुकतेच देण्यात आले. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे आठ हजार रोजगार निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, रेमंड उद्योगाने अमरावतीतील नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याचा घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे. रेमंड उद्योग समुहाने नेहमीच महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी प्राथमिकता दिली आहे. शासनाच्या वतीने आणण्यात येणाऱ्या नवीन वस्त्रोद्योग धोरणामुळे रेमंड कंपनीला राज्यात गुंतवणूक केल्याचा फायदा मिळणार आहे. रेमंड कंपनी ही वस्त्रोद्योगाची पायाभरणी करणारी कंपनी ठरेल.

ज्या ठिकाणी कापसाचे उत्पादन होते, त्या ठिकाणी वस्त्रोद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रक्रिया करण्यासाठी टेक्स्टाइल पार्क उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा परिणाम म्हणून नांदगाव पेठ येथील या टेक्स्टाइल पार्कमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूकदार येत आहेत. नागपूरमध्ये नुकत्याच झालेल्या वस्त्रोद्योग परिषदेत सहा उद्योगांनी गुंतवणूक करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. राज्यातील टेक्स्टाइल पार्कमध्ये गुंतवणूक करणाऱ्या रेमंड कंपनीसह इतर सर्वच गुंतवणूकदारांना राज्यशासनाचा उद्योग विभाग सर्वतोपरी सहकार्य करेल.

## तारांकित

### महाराष्ट्राचा सन्मान

नौदलात नौदल प्रमुखानंतर सर्वात मानाचे स्थान असते ते व्हाइस ॲडमिरल यांचे. या पदावर महाराष्ट्राचे किशोर ठाकरे यांची नियुक्ती झाल्याने राज्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

हवाई दलात प्रवेशासाठी एनडीएमध्ये प्रवेश घेतलेल्या श्री. ठाकरे यांना उंचीमुळे हवाई दलात प्रवेश मिळाला नाही, मात्र देशसेवेची जिद्द आणि परिश्रम घेण्याची तयारी यामुळे त्यांनी नौदलात आपल्या कर्तृत्वाची



पताका उंचावत ठेवली. देशसेवेचा वारसा मिळालेल्या श्री. ठाकरे यांचे वडील ओंकार ठाकरे यांना सैनिकी शिक्षणाची आवड. त्यामुळे शासकीय विज्ञान महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावर त्यांनी प्रादेशिक सेनेत नाव नोंदवले आणि मेजर हुद्द्यापर्यंत पोहोचले. घरातूनच असा वारसा मिळालेल्या श्री. ठाकरे यांनी एनडीएमध्ये प्रवेश घेतला आणि नौदलाची सेवा स्वीकारली. लोणावळ्याचे आयएनएस शिवाजी, वेलिंग्टनचे संरक्षण सेवा कर्मचारी महाविद्यालय व सिकंदराबादच्या संरक्षण व्यवस्थापन महाविद्यालयातून प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर ठाकरे १९७९ मध्ये नौदलात मरिन इंजिनियर ऑफिसर म्हणून रुजू झाले. आपल्या दीर्घ सेवाकाळात त्यांनी नौदलाच्या तांत्रिक विभागात अनेकदा उल्लेखनीय कामगिरी बजावली. त्यासाठी त्यांना २००६ मध्ये नौसेना पदकाने, तर २०१३ ला अतिविशिष्ट सेवा पदकाने गौरवण्यात आले आहे.

## गाणाऱ्या व्हायोलिनचा सन्मान !



ज्येष्ठ संगीतकार श्री. प्रभाकर जोग यांना सन २०१५ या वर्षासाठीचा देण्यात येणारा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ गायिका सुलोचना चव्हाण यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आले. सांस्कृतिक कार्य मंत्री विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार श्री. जोग यांना प्रदान करण्यात आला. पाच लाख रुपये, मानचिन्ह व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. तावडे यांनी श्री. जोग यांचा सन्मान करताना सांगितले की, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सांगीतिक क्षेत्रात श्री. जोग यांनी मोठे यश मिळवले. त्यांचे जीवन नव्या पिढीसाठी दिशादर्शक आहे.

संगीतकार, संगीत संयोजक आणि व्हायोलिन वादक म्हणून तब्बल सहा दशकांहून जास्त वर्षे कार्यरत असलेल्या श्री. जोग यांचे मराठी आणि हिंदी चित्रपट संगीताबरोबरच भावसंगीतातही मोलाचे योगदान आहे. संगीतकार सुधीर फडके यांचे सहाय्यक म्हणून काम केले. 'गीतरामायणा'तील गाण्यांना प्रभाकर जोग यांच्या व्हायोलिनचे सूर लाभले आहेत. भारतरत्न लता मंगेशकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या नावाने गायन आणि संगीत क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केलेल्या ज्येष्ठ कलाकारास हा पुरस्कार देण्यात येतो.

## स्मार्ट सिटीसाठी २९ हजार ६०० कोटी रुपयांचा प्रस्ताव

राज्याच्या शहरांतील पायाभूत सुविधांचा विकास व्हावा यासाठी केंद्र सरकारची स्मार्टसिटी योजना राज्यात राबवली जात आहे. या योजनेंतर्गत शहरांच्या सर्वंकष विकासाच्या दृष्टीने भौतिक,संस्थात्मक,सामाजिक व आर्थिक पायाभूत सुविधा या मूलभूत बाबींचा विकास करण्यात येईल. त्यासाठी राज्याने केंद्र शासनाकडे २९६४७.४५ कोटी रुपयांचा प्रस्ताव पाठवला आहे.

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार स्मार्ट सिटी अभियानाच्या प्रथम टप्प्यात राज्यस्तरीय उच्चाधिकार समितीने नवी मुंबई, पुणे, नाशिक, बृहंमुंबई, ठाणे, नागपूर, अमरावती, सोलापूर, कल्याण-डोंबिवली आणि औरंगाबाद या शहरांची शिफारस केली आहे. शहरनिहाय प्रकल्प किंमत (आकडे कोटीमध्ये): बृहंमुंबई १११८, पुणे २९३२, ठाणे ६६३०, नाशिक १९४५, कल्याण-डोंबिवली २०५७, सोलापूर २९२१, अमरावती ५३०५, नागपूर ३४०९, नवी मुंबई १७३४.९५, औरंगाबाद १५९५.५. केंद्र शासनाने निवडलेल्या स्मार्ट शहरांना ५ वर्षासाठी प्रतिवर्ष/ प्रतिशहर केंद्र शासनाचे रुपये १०० कोटी अनुदान मिळणार असून राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रत्येकी रुपये ५० कोटी इतका हिस्सा द्यावयाचा आहे.

Smart City

## तारांकित

### सामाजिक न्याय विभागाचे संकेतस्थळ

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ५९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने सामाजिक न्याय विभागाचे संकेतस्थळ www.sjsa.maharashtra.gov.in आणि फेसबुक पेजचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दादर येथील चैत्यभूमीवर करण्यात आले.

या वेळी मुख्यमंत्री म्हणाले की, या संकेतस्थळ आणि फेसबुकच्या माध्यमांमुळे सामाजिक न्याय विभागामार्फत राबवण्यात




येणाऱ्या विविध योजनांची माहिती सामान्य माणसांना त्वरित मिळण्यास मदत होणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाद्वारे स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचा संदेश देशाला दिला आहे. डॉ. आंबेडकरांनी संविधानात अधोरेखित केलेल्या समता, बंधुता आणि एकात्मतेच्या बळावरच राज्याची आणि पर्यायाने देशाची प्रगती करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे.

या वेळी महापौर स्नेहल आंबेकर, शालेय शिक्षणमंत्री विनोद तावडे, सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, आमदार भाई गिरकर, उपमहापौर अलका केरकर, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अजोय मेहता, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव उज्वल उके, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त डॉ. पल्लवी दराडे, समाजकल्याण आयुक्त पियुष सिंह यांच्यासह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

## गौरव क्रीडापटूंचा....



राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या शिवछत्रपती राज्य पुरस्कारांचे वितरण क्रीडा व युवक कल्याण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते झाले. २०१२-१३ चा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार पुण्याचे रमेश विपट यांना तर २०१३-१४ च्या राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार लातूरचे गणपतराव माने यांना प्रदान करण्यात आला. यावेळी पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश बापट, आमदार मेधा कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी श्री. तावडे म्हणाले की, राज्याचा क्रीडा नकाशा तयार केला जाऊन कीडा संस्कृतीच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांचा विकास केला जाणार आहे.

२०१२-१३ आणि २०१३-१४ च्या अनुक्रमे ४४ व ४० पुरस्कारार्थींचा म्हणजेच एकूण ८४ पुरस्कारार्थींचा गौरव या वेळी केला गेला. या समारंभात जीवनगौरव, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता पुरस्कार, साहसी पुरस्कार, एकलव्य पुरस्कार आदी पुरस्कारांचे वितरण केले गेले. शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्काराचे स्वरुप रोख रुपये ३ लाख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक तसेच जिजामाता राज्य क्रीडा, शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार खेळाडू व संघटक, राज्य क्रीडा साहसी तसेच एकलव्य राज्य क्रीडा (अपंग खेळाडू) पुरस्काराचे स्वरुप रोख रुपये १ लाख, स्मृतिचिन्ह व गौरवपत्र असे आहे.

## स्वच्छतेचा महासंकल्प

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वच्छ महाराष्ट्र अभियानासाठी जातीने लक्ष घालत आहेत. हे अभियान यशस्वी करण्यासाठी ग्रामीण आणि नागरी भागात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. स्वच्छतेची लोकचळवळ होण्यासाठी समाजातील सर्वच घटकांचा समावेश अत्यावश्यक ठरतो. यासाठी नवीन वर्षात आपण स्वच्छतेचा महासंकल्प करू या. यामध्ये उघड्यावर शौचास जाणार नाही, घरी शौचालय नसल्यास सार्वजनिक शौचालयाचा वापर करेन, घरी शौचालय बांधण्यासाठी पुढाकार घेईन आणि त्याचा वापर करेन हा सर्वात महत्त्वाचा संकल्प आहे. त्याचबरोबर उघड्यावर कचरा टाकणार नाही, प्लास्टिकचा अनिर्बंध वापर करणार नाही, ओल्या आणि सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करेन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकणार नाही, असा संकल्प करून हे राज्य स्वच्छ आणि सुंदर बनवू या.**



## तारांकित

### गौरव महाराष्ट्राचा

महाराष्ट्रातील तीन अधिकाऱ्यांचा 'जी फाइल्स' पुरस्काराने दिल्लीत गौरव करण्यात आला. संस्थेने २०१५ च्या वार्षिक पुरस्कारासाठी देशभरातील १० प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवड केली. त्यात महाराष्ट्रातील ३ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समारंभात ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अनिल काकोडकर यांना 'जीवन गौरव पुरस्कार' देण्यात आला. हा क्षण महाराष्ट्रासाठी गौरवास्पद ठरला. हा पुरस्कार केंद्रीय खाण व पोलाद मंत्री नरेंद्र



सिंह यांनी प्रदान केला. सरकारचे कायदे, नियम व योजनांची चोख अंमलबजावणी करून; कल्याणकारी समाजव्यवस्था निर्माण करण्यात मोलाची भूमिका वठवत, इतरांसाठी पथदर्शी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा गौरव 'जी फाईल्स' ही संस्था करते.

महाराष्ट्र शासनाच्या जालना येथील आंतरराष्ट्रीय उपग्रह देखरेख कक्षाचे प्रभारी अभियंता अजय सिंघल यांना'असाधारण योगदान पुरस्कार',जलसंपदा आणि रोजगार हमी योजना विभागाचे सचिव प्रभाकर देशमुख आणि विधी व तांत्रिक विभागाच्या महासंचालक मीरा बोरवणकर यांना 'उत्कृष्ट योगदान पुरस्कार' प्रदान करण्यात आले. रेल्वे मंत्री सुरेश प्रभु, हरयाणा राज्याचे अर्थमंत्री कॅप्टन अभिमन्यू या वेळी उपस्थित होते.

## 'गोपीनाथ गड' या स्मारकाचे लोकार्पण




बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील पांगरी येथील वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात, स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या 'गोपीनाथ गड' या स्मारकाचे लोकार्पण आणि गोपीनाथ मुंडे यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा होते. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या सहवासातून मिळालेल्या अनुभवांमुळेच आपण राज्याचे नेतृत्व चांगल्या प्रकारे करू शकत असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, मुंडे साहेबांच्या अचानक जाण्यामुळे आमच्यावर मोठा आघात झाला, मात्र त्यांची कन्या पंकजाताईंनी या समाजाचे नेतृत्व पुढे चालवल्यामुळे समाजातील प्रश्नांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. गडाच्या निर्मितीमध्ये राज्य शासनाचा एकही पैसा नसून, तो केवळ गोपीनाथरावांच्या प्रियजनांनी आपल्या घामाच्या पैशातून उभा केला आहे. हा गड आपल्या सर्वांना उपेक्षित समाजाच्या विकासासाठी सतत प्रेरणा देत राहील. समारंभाचे अध्यक्ष तथा भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा यांनी आपल्या भाषणात तळागाळातील जनतेसाठी गोपीनाथ मुंडे यांनी केलेल्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.

## अमृत योजनेंतर्गत २०७७ कोटी रुपयांच्या कृती आराखड्यास केंद्राची मान्यता

केंद्र शासन पुरस्कृत अटल मिशन फॉर रिज्युव्हिनेशन ॲण्ड अर्बन ट्रान्स्फॉर्मेशन (अमृत) अभियानाची अंमलबजावणी देशातील ५०० शहरांमध्ये करण्यात येणार आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ४३ शहरांचा समावेश आहे. लोकसंख्या एक लाखापेक्षा अधिक असलेल्या शहरांची निवड अमृत अभियानात करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या शिखर समितीने राज्याच्या २०७७.९६ कोटी रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्यास मान्यता दिली आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत निवेदन करताना सांगितले.

अमृत अभियानांतर्गत समावेश असलेल्या राज्यातील ४३ अभियान शहरामध्ये नागरी सेवांचा स्तर उंचावण्याच्या अनुषंगाने पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याबाबतच्या केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठीचा २०७७.९६ कोटी रुपयांचा राज्य वार्षिक कृती आराखडा केंद्र शासनास सादर करण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. या अभियानांतर्गत शहरामध्ये पाणीपुरवठा, मल:निसारण, पर्जन्य जलवाहिनी, नागरी परिवहन व हरित क्षेत्र विकास या मूलभूत सुविधांचा विकास करण्यात येणार आहे. या कृती आराखड्यामध्ये पाणीपुरवठाविषयक प्रकल्पांना प्राधान्य देण्यात आले आहे. पाणीपुरवठा योजने-तील दुरुस्ती व देखभालीचा खर्च कमी करण्यासाठी सौरऊर्जेचा वापर करण्याच्या राज्याच्या नावीन्यपूर्ण संकल्पनेलाही मान्यता दिली आहे.

अमृत
Atal Mission for Rejuvenation and Urban Transformation

# तारांकित

## पद्मविभूषण पुरस्काराने दिलीपकुमार यांचा सन्मान

हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते दिलीप कुमार यांना पद्मविभूषण पुरस्काराने नुकतेच त्यांच्या वांद्रे येथील राहत्या घरी सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना भारत सरकारच्या वतीने गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी प्रदान केला. दिलीपकुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीच्या भरभराटीसाठी केलेले काम महत्त्वपूर्ण आहे. त्यांचे या क्षेत्रातील योगदान कधीही न विसरता येण्यासारखे असल्याचे केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी यावेळी सांगितले. दिलीपकुमार यांच्या घरी पार पडलेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,



आमदार आशिष शेलार, दिलीप कुमार यांच्या पत्नी अभिनेत्री सायरा बानू यांच्यासह दिलीपकुमार यांचे कुटुंबीय उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ज्येष्ठ अभिनेते दिलीपकुमार यांचा पद्मविभूषण पुरस्काराने सन्मान होणे ही आनंदाची बाब आहे. दिलीपकुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीत मोलाची कामगिरी बजावत असतानाच, चित्रपटसृष्टीला दिशा देण्याचे काम केले आहे. दिलीपकुमार यांना दिल्लीमध्ये एप्रिल महिन्यात झालेल्या राष्ट्रपती भवनातील पुरस्कार सोहळ्यास प्रकृती अस्वस्थ्यामुळे उपस्थित राहता आले नव्हते. राष्ट्रपती महोदयांच्या वतीने केंद्रीय गृहमंत्र्यांनी दिलीपकुमार यांच्या घरी येऊन त्यांचा सन्मान केला.



# स्निग्ध प्रेमाचा सण संक्रांत

**थंडीचा कडाका थोडा ओसरला की, निळ्याशार आकाशात विविधरंगी पतंग गर्दी करू लागतात. वातावरण कसे आल्हाददायक होते. हीच चाहूल असते संक्रांत सणाची. संक्रांत, तीळ संक्रांती किंवा मकर संक्रांत हा सण खरेच इतर सणापेक्षा वेगळा आहे. तीळगुळाचा गोडवा अलगदपणे जिभेवर पसरवत लहानमोठयांना 'गोड बोला' सांगणारी संक्रांत म्हणूनच सर्वांना हवीहवीशी वाटते.**

**कीर्ती पांडे**

संक्रांतीला इतर भारतीय सणांसारखे फारसे कर्मकांड नसते. त्यामुळे संक्रांतीला आधुनिक जीवनाशी छान जुळवून घेता आले आहे. आपण साजरे करत असलेले इतर सण चांद्रतिथींप्रमाणे येतात त्यामुळे त्याच्या तारखा तर कधी-कधी महिनेही बदलतात; पण संक्रांत दरवर्षी ठरल्याप्रमाणे १४ किंवा फारतर १५ जानेवारीला येणार हे ठरलेले, कारण हा एकच सण असा आहे जो आपण सौर दिनदर्शिकेनुसार साजरा करतो. याचे कारण या सणाच्या नावातच दडले आहे. संक्रांती म्हणजे संक्रमण, आणि संक्रमण म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे. संक्रांतीमध्ये आपण साजरे करतो ते सूर्याचे संक्रमण. सूर्य या दिवशी मकर राशीत प्रवेश करतो. अर्थात सूर्याचे धनु राशीतून मकर राशीत संक्रमण होते. म्हणून या दिवसाला म्हणतात मकर संक्रांती. खरे तर सूर्याचे वर्षातून १२ वेळा असे संक्रमण होते (राशी १२ आहेत) म्हणजे वर्षभरात १२ वेळा संक्रांती येतात पण त्यातही मकर संक्रांतीला विशेष महत्त्व आहे. या दिवशी फक्त राशीचे संक्रमण नसते तर याच सुमारास दक्षिणयन संपून उत्तरायण सुरू होते. यानंतर थंडी कमी होत असतांना सूर्याचा ताप वाढणार असतो. तो दिवसागणिक तिळातिळाने वाढतो अशी आपली एक मराठी समजूत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात मकर संक्रांतीला तीळसंक्रांत असे म्हणतात.

भारतीय विश्वकोशानुसार मकर संक्रांती हा सण ख्रिस्ताब्दाहून जुना नसावा. भारतीय खगोलशास्त्राला जेव्हा नक्षत्राबरोबरच असणाऱ्या राशींचे अस्तित्व जाणवले आणि त्यानंतर सूर्याचे राश्यांतर कळले असावे. यामुळे होणारे भौगोलिक बदल टिपतानाच केव्हातरी मकर संक्रांतीच्या उत्सवाला सुरुवात झाली असावी. कालांतराने त्याचे दैवीकरण झाले आणि संक्रांतीदेवीची निर्मिती झाली. दरवर्षी पंचांगात त्या-त्या वर्षीच्या मकर संक्रांतीचे वर्णन केलेले असते. ती ज्या दिशेने येते तिकडे समृद्धी आणि ज्या दिशेला जाते तिकडे नुकसान होईल, वगैरे गोष्टी यात वर्णन केलेल्या असतात. बारकाईने हे वर्णन वाचले तर असे लक्षात येते की हवामानाची संभाव्य स्थिती आणि त्यातील संभाव्य धोके यांचे येऊ घातलेल्या वर्षाबाबतचे अंदाज या वर्णनात मांडलेले असतात.

संक्रांतीचा सण हा पूर्वापार सुगीचा सण किंवा पीक कापणीचा उत्सव असावा असे वाटण्याला बराच वाव आहे. शेती हाच आर्थिक स्रोत असणाऱ्या जगभरातील समाजामध्ये पिकाच्या कापणीचा काळ हा महत्त्वाचा आणि आनंदाचा मानला जातो. या वेळी उत्सव साजरा करण्याची परंपराही आहे. असेच काहीसे मकर संक्रांतीबाबत असावे असे वाटते.

संक्रांती म्हटले की सर्वात आधी आठवतो तो तीळगूळ. या दिवशी मोठ्यांनी लहानांना तीळगूळ द्यायचा आणि म्हणायचे 'तिळगूळ घ्या, गोड बोला'. शौर्य, विजय, यश यासाठी वेगवेगळे उत्सव साजरे करणारा भारतीय समाज गोड बोलण्यासाठीही उत्सव साजरा करतो हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. गोड बोलणे सांगावे लागावे इतके कठीण असते की काय? हो, खरंच. वर्षभर येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांशी सामना करताना, गोड बोलण्याचा वसा टिकवून ठेवणे खरेच कठीण आहे. म्हणून गोड बोलण्याचा संदेश मोठ्यांकडून लहानांकडे जावा, यासाठी तीळ संक्रांतीची योजना आपल्या पूर्वजांनी केली असावी.

तीळसंक्रांत महाराष्ट्रात खरे तर तीन दिवस साजरी केली जाते. या सणाचा पहिला दिवस म्हणजे भोगी. या दिवशी तिळाचे उटणे लावून स्नान





करतात. काही ठिकाणी मुगाच्या खिचडीचा नैवद्य या दिवशी असतो. तीळ लावलेली बाजरीची भाकरी आणि भोगीची भाजी हे या दिवसाचे वैशिष्ट्य. बाजारात उपलब्ध असणाऱ्या सगळ्या भाज्यांची मिक्स भाजी म्हणजे भोगीची भाजी. गाजर, वाटाणा, तुरीचे दाणे, हरभरा इतर भाज्याबरोबर घालतांनाच आवडतात म्हणून लालचुटुक आंबटगोड बोरंही घातली जातात. एखाद्या लेकुरवाळीला जसं 'हे नको ते नको' असे म्हणून चालत नाही तसंच या भाजीचं आहे. म्हणून या भाजीला कदाचित लेकुरवाळी भाजी असेही म्हणत असावे.

संक्रांतीचा दुसरा दिवस म्हणजे मकर संक्रांत. या दिवशी तर नुसती चंगळ असते. तीळगुळाचा खमंग सुवास वातावरणात दरवळत असतोच तसेच तीळगुळाची पोळी किंवा 'तीळाची लाटोरी' यांचा बेत असतो. यादिवशी स्त्रिया मातीच्या छोट्या छोट्या माठांमध्ये ज्याला सुगड म्हणतात. गाजर, बोरं, ऊस, सुपारी, तीळ, तांदुळ, पैसे वगैरे घालून त्याची पुजा करतात आणि हे वाण सुवासिनींना देतात. यानिमित्त हळदीकुंकू करतात. संक्रांतीचे हे हळदीकुंकू रथसप्तमीपर्यंत करण्याची प्रथा आहे.

संक्रांतीचा तिसरा दिवस म्हणजे किक्रांत. या दिवशी काही ठिकाणी आदल्या दिवशीचे उरलेसुरले खाऊन दिवस घालवण्याची प्रथा आहे तर काही ठिकाणी मांसाहारही केला जातो.

लग्नानंतर येणाऱ्या पहिला संक्रांतीला तिळवा म्हणतात. यासाठी नवपरिणीत जोडप्यासाठी त्यांच्या सासरहून हलव्याचे सुरेख दागिने आणले जातात. हलव्याचे दागिने, काळी साडी आणि त्यानिमित्त सासर-माहेरकडून होणारे कौतुक हे सर्वांनाच हवेहवेसे वाटते. संक्रांत हा असा लेकुरवाळा सण आहे. तो बायकांचा, माणसांचा, मुलांचा, मुलींचा असा कोणा एकाचा नाही तर सर्वांना आनंदाचे वाण देणारा आणि गोड बोलण्याचा वसा देणारा आहे.

बदलत्या काळानुसार संक्रांतीचे स्वरूप आज थोडेफार बदललेलेअसले तरी तीळगुळाचे आणि हळदीकुंकवाचे महत्त्व आजही आहे. संक्रांतीला पतंग उडवण्याची परंपरा काही ठिकाणी आहे. यानिमित्त काही ठिकाणी पतंग उत्सवही साजरे केले जातात.

## एक तीळ सात जण

संक्रांतीच्या दिवशी तीळाचे महत्त्व सांगताना 'एक तीळ सात जणांनी वाटून खाल्ला'' असे कुणीतरी सहज बोलून जाते किंवा आपणही एकोप्याबद्दल बोलताना वानगीदाखल असे म्हणतो पण याची गोष्ट मात्र बहुतेकांना माहीत नसते. खूप शोध घेतल्यावर मला कळली ती गोष्ट अशी -



एक शेतकरी होता, त्याला सात मुले होती. त्यांचे आपसात अजिबात पटत नव्हते, त्यामुळे शेतीची वाटणी करा म्हणून ती वडलांच्या मागे लागली होती. वडलांनी यावर एक उपाय केला ते म्हणाले वाटणी करतोच पण त्याआधी हा एक तीळ तुम्ही सात जण सारखा वाटून घ्या. एवढासा तीळ तो कसा वाटणार? ते खूप विचारान्ती त्यातील एकाला युक्ती सुचली त्यांनी सात जणांनी मिळून तो तीळ पेरला. त्याला भरभरून तीळ आले, ते त्यांनी सारखे वाटून घेतले पण यादरम्यान त्यांना एकोप्याची शक्ती कळली होती आणि त्यांची शेताच्या वाटणीची मागणी आपोआप मागे पडली. संक्रांतीच्या दिवसात तिळाला खूप महत्त्व आहे याचे कारण म्हणजे या दिवसात थंडी आणि गार हवा यामुळे शरीरातील स्निग्धांश जास्त प्रमाणात शोषले जातात, ती कमतरता तिळामुळे भरून निघते. गुळातून लोह मिळते तर तिळातून हृदयासाठी आवश्यक असणारे अनसॅच्युरेटेड फॅट्स मिळतात. याशिवाय व्हिटॅमिन अ, क, लोह आणि कॅलशियम तिळात समावलेले असते. यामुळे बदलणाऱ्या हवामानात तीळगूळ खाणे पौष्टिक ठरते.

**संक्रांतीला सूर्याला तीळ अर्पण का करायचे किंवा महत्त्व काय आहे यासाठी एक पौराणिक कथा सांगितली जाते :-**

शनी ग्रह आणि यमदेव ही सूर्याची दोन मुलं तर सूर्याच्या पत्नीचे नाव छाया. एकदा छाया आणि शनी यांना सूर्याचा राग आला आणि त्यांनी त्याला शाप दिला. त्यामुळे सूर्याला भयंकर त्रास झाला. या त्रासापासून त्याच्या दुसऱ्या पुत्राने यमाने त्याची सुटका केली. त्यानंतर सूर्याने त्याच्या तापाने शनीची सर्व संपत्ती भस्मसात केली. पण पत्नीच्या आणि यमाच्या समजावण्यामुळे सूर्यदेव शनीच्या घरी पोहोचले तो दिवस मकर संक्रांती. शनीजवळ काळ्या तिळाशिवाय त्यांना द्यायला काही उरले नव्हते. म्हणून त्याने त्यांना काळे तीळ अर्पण केले. यामुळे प्रसन्न झालेल्या सूर्यदेवांनी त्याची संपत्ती पूर्ववत केली. म्हणून या दिवशी तिळाचे महत्त्व आहे.

## हलवा

तीळगुळाचा सुंदर नाजूक अवतार म्हणजे हलवा. तिळावर साखरेचा रंगीत पाक चढवून काटेदार हलवा बनवला जातो. हलवा करण्याचे काम अतिशय नीटनेटकेपणाने करावे लागते. थोडी जरी अस्वच्छता असली तरी हलव्याचा पांढराशुभ्र रंग काळवंडण्याची भीती स्त्रियांना वाटायची. हळदीकुंकवाला येणाऱ्या मैत्रिणींच्या हातावर स्वत: केलेला नाजूक सुंदर हलवा ठेवताना आणि त्यांच्याकडून कौतुक करवून घेताना स्त्रियांच्या चेहऱ्यावर वेगळीच प्रसन्नता पसरते.

## काळी चंद्रकला आणि संक्रांती

एरवी काळ्या रंगाचे वावडे असणाऱ्या स्त्रियांना संक्रांतीसाठी मात्र काळी साडीच हवी असते. एकतर संक्रांतीचे जे दैवतीकरण करण्यात आले आहे तिचा रंग काळा आहे आणि या दिवसांमध्ये असणाऱ्या थंडीपासून काळा रंग उष्ण असल्याने ऊब देतो म्हणून संक्रांतीला काळी वस्त्रे परिधान करतात.

## बोरनहाण

संक्रांतीला पाच वर्षापर्यंतच्या मुलांना काळे कपडे घालून, हलव्याचे दागिने घालून सजवले जाते आणि त्यांचे औक्षण करून बोरं, सुका मेवा, चॉकलेट इत्यादींनी न्हाऊ घातले जाते. यालाच बोरनहाण असे म्हणतात, तर काही ठिकाणी लूट असेही म्हणतात.

**(लेखिका या संस्कृती विषयाच्या अभ्यासक आणि महाराष्ट्र अहेडच्या संपादिका आहेत.)**
**संपर्क : ०९५९४९४४८००**

किल्ल्यांवरील देवदेवता

# श्रद्धा आणि प्रेरणा

डॉ. सचिन जोशी

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या काळात गडकिल्ल्यांनी खूप मोठ्या प्रमाणावर महाराजांना मदत केली. महाराजांच्या लष्करात हिंदू धर्मीयांची संख्या जास्त असल्याकारणाने अनेक गड किल्ल्यांवर हिंदू देवदेवतांची मंदिरे बांधली गेलेली दिसतात. तसेच काही ठिकाणी किल्ल्यांची व तेथील मंदिरांची दुरवस्था झाल्याने सध्या फक्त मूर्तीच गडावर पाहता येऊ शकतात.

## प्रादेशिक विविधता

गडकिल्ल्यांवरील देवदेवतांमध्ये प्रादेशिक विविधता दिसून येते. उदा. कोकणातील किल्ल्यांवर भगवती देवी, रवळनाथ, वेताळ यासारख्या देवतांची मंदिरे आहेत, घाट माथ्याजवळील किल्ल्यांवर हनुमान, गणेश, शिव, महिषासुरमर्दिनी यासारख्या देवतांच्या मूर्ती किंवा मंदिरे बांधलेली दिसतात. भगवान शिव किंवा शंकराची मंदिरे महाराष्ट्रातील जास्तीत जास्त किल्ल्यावर बांधलेली आहेत. शिवाच्या मूर्तीची पूजा होत नसून शिवलिंगाची पूजा अनेक ठिकाणी केली जात असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात १०० पेक्षा जास्त किल्ल्यांवर शिवमंदिरेच पाहायला मिळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीच्या किल्ल्यावर म्हणजेच रायगडावर दोन शिवमंदिरे आजही उभी आहेत. यापैकी जगदीश्वर किंवा वाडेश्वराचे प्रशस्त मंदिर भवानी टोकाकडे जाणाऱ्या वाटेवर बांधले आहे. दुसरे तुलनेने लहान शिवमंदिर नगारखान्याच्या खालील बाजूस कुशावर्त तलावाजवळ आहे. वाडेश्वर किंवा जगदीश्वर मंदिर परिसर खूप मोठा असून याच मंदिरासमोर छत्रपती शिवाजी महाराज यांना मृत्यूनंतर अग्नी दिला. हरिश्चंद्रगड या किल्ल्यावरील शिवमंदिर ११ ते १२ व्या शतकात बांधले असल्याचे पुरावे तेथील स्थापत्यशास्त्राच्या अभ्यासावरून दिसून येतात. मधुमकरंदगड किल्ल्याच्या माचीवर आणि माथ्यावर अशा दोन्ही ठिकाणी शिवमंदिरे आहेत.

## भैरव आणि रवळनाथ

शिवाचाच अवतार म्हणजे भैरव होय. अनेक गडकिल्ल्यांवर भैरवाची मंदिरे किंवा मूर्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. भैरव या देवतेच्या नावाने चार वेगवेगळे 'भैरवगड' नावाचे किल्ले महाराष्ट्रात कोंकण, घाटमाथा आणि पठारी भागात आजही पाहायला मिळतात.

कणकवली तालुक्यातील नरडवे गावाजवळील भैरवगड आणि चिपळूण-सातारा जिल्ह्याच्या सरहद्दीवरील घाटमाथ्यावर असलेला भैरवगड हे दोन्ही किल्ले दाट जंगलात वसलेले आहेत. सिंहगड किल्ल्यावर भैरवाचे मंदिर आहे. पेशवे काळात या मंदिराच्या मूर्तीच्या देखभालीसंबंधीची जी व्यवस्था होती त्याची माहिती ऐतिहासिक कागदपत्रात येते. भैरवाप्रमाणेच रवळनाथ हेदेखील एक शिवाचेच रूप आहे. कोकणातील गडकिल्ल्यांवर मध्ययुगीन काळात काही ठिकाणी ही मंदिरे बांधली गेली होती. मूर्तीशास्त्राच्या दृष्टीने पाहिले असता असे लक्षात येते की रवळनाथ आणि भैरव या दोन देवतांच्या मूर्तींची जडणघडण साधारणतः सारखीच आहे. दोन्ही मूर्तींच्या हातातील आयुधे एकसारखीच आहेत.



गारजाई देवी, घनगड


रायगड हनुमान


भैरव मूर्ती


रतनगड गणेश

**गडकिल्ले ही महाराष्ट्राच्या मध्ययुगीन कालखंडातील लष्करी सामर्थ्याची प्रतीके आहेत. वास्तविक हे किल्ले बांधण्यामागचे कारण म्हणजे शत्रूपासून बचाव करणे व तेवढ्याच ताकदीने त्याच्यावर हल्ला करणे हे होते. महाराष्ट्रात शिवपूर्वकालात मोठ्या प्रमाणावर हिंदू धर्माच्या लोकांच्या वसाहती होत्या. त्यामुळे राजवट जरी बहामनी, मोघल अशा मुस्लीम सत्ताधीशांची असली तरीही वेगवेगळ्या जातीजमातींचे हिंदू लोक महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात राहत होते. अनेक हिंदू लोक निजामशाही, आदिलशाही आणि मोगलांच्या सैन्यात लहानमोठ्या पदांवर काम करीत होते. या लोकांच्या धार्मिक भावना लक्षात घेऊन शिवपूर्वकाळातदेखील अनेक गडकिल्ल्यांवर हिंदू देवदेवतांची मंदिरे बांधली गेली. आता मात्र अनेक ठिकाणी फक्त मंदिरांचे अवशेष आणि मूर्ती गडांवर पाहायला मिळतात.**




## शक्तीरूपी देवता

गडकिल्ल्यांवरील अजून एक महत्त्वाची देवता म्हणजे हनुमान किंवा मारुती. मध्ययुगीन काळात तेथे नित्यनियमाने पूजा होत असावी. हनुमान या देवतेचे नाव गडावरील बुरुजांना, पाण्याच्या टाक्यांना आणि दरवाज्यांना देखील दिले गेले होते. या प्रकारातील सर्वात मोठे उदाहरण म्हणजे रायगडावरील हनुमान टाके, लोहगडावरील हनुमान दरवाजा आणि कुलाबा किल्ल्यातील आंग्रेकालीन हनुमंत बुरूज, इ. बऱ्याच वेळेला हनुमान या देवतेची मूर्ती किल्ल्यांच्या दरवाज्याच्या दर्शनी भागावर दगडात कोरून लावलेली दिसते. याचे मुख्य कारण म्हणजे हनुमान ही द्वाररक्षक देवता आहे, असे गडावरील लोक मानत असत. गडावर प्रवेश करणाऱ्या शत्रू सैन्यापासून आपले रक्षण ही देवता करते अशी त्यांची श्रद्धा होती. युद्धप्रसंगी हेच लोक प्राण पणाला लावून शत्रूसोबत लढत असत. त्यांच्या या शौर्याला कुठेतरी श्रद्धेचीही साथ होती. हनुमानाच्या तीन महत्त्वाच्या आणि वेगवेगळ्या प्रकारच्या मूर्ती रायगड, विसापूर आणि सुरगड या किल्ल्यांवर पाहता येतात. रायगडावरील मूर्ती ही विजयनगर साम्राज्याच्या काळातील असावी असे शैली पाहून वाटते. विसापूर किल्ल्यावरील दोन हनुमान मूर्ती या पेशवेकालीन आहेत. या दोन्ही मूर्ती एकाच बनावटीच्या असून कातळात कोरलेल्या आहेत. पहिली मूर्ती गडाच्या उत्तरेकडील दरवाज्याच्या शेजारील भिंतीवर असून दुसरी गडावरील पाण्याच्या टाक्यावर आहे. या मूर्तींचे वैशिष्ट्य म्हणजे वरील भागात चंद्र- सूर्य (यावतचंद्र दिवाकर) कोरलेले असून एका बाजूला कासवाचे शिल्प तर दुसरीकडे शंखाचे शिल्प आहे. सुरगड किल्ल्यावरील हनुमानाचे शिल्प अत्यंत वेगळे आहे. यामध्ये हनुमानाच्या ओठावर मिशा दाखवल्या आहेत आणि त्याच्या कमरेला खंजीर आहे. सुरगडाव्यतिरिक्त असे शिल्प विश्रामगड या किल्ल्यावरदेखील पाहायला मिळते. शिवाजी महाराजांच्या काळात समर्थ रामदास स्वामींनी सज्जनगड किल्ल्यावर हनुमानाची स्थापना केली होती. याशिवाय हनुमंतगड नावाचा एक किल्लादेखील सिंधुदुर्ग जिल्ह्यात उभा आहे.

## लोकांचा देव

वेताळ हा कोळी समाजातील लोकांचा देव आहे असे मानले जाते. वेताळाची मंदिरे कोकणात खासकरून समुद्रकिनाऱ्यावर किंवा समुद्रातील बेटांवर बांधलेली असतात. मंदिराचे बांधकाम खूप नक्षीदार असते असे नाही आणि मंदिरात वेताळाची मूर्तीदेखील नसते. वेताळ या देवाचा एक दगड शेंदूर लावून ठेवलेला असतो आणि तोच देव म्हणून पुजला जातो. खांदेरी किल्ल्यावर आजही वेताळाचे मंदिर आहे.

## महिषासुरमर्दिनी

महिषासुरमर्दिनी या रूपातील देवी अनेक वेगवेगळ्या नावाने गडकिल्ल्यांवर आणि गडाजवळील गावांमध्येही पुजली जाते. पुणे जिल्ह्यातील तोरणा किल्ल्यावर या महिषासुरमर्दिनीचे मोठे शिवकालीन मंदिर असून या देवीला 'मेंगाई देवी' असे संबोधले जाते. राजगडावरील पद्मावती माचीवर 'पद्मावती देवीचे' मंदिर शिवकाळात बांधले गेले आणि त्याच्यासमोर महाराजांच्या पत्नी सईबाई यांची समाधी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील मोहनगड उर्फ जासलोडगड या हिरडस मावळातील किल्ल्यावर 'जननी देवीचे' मंदिर आहे. हीदेखील महिषासुरमर्दिनीच आहे. 'भगवती' या देवीची पूजा मुख्यतः कोकणात केली जाते. कोकणातील कोटकामते या कान्होजी आंग्रे यांनी बांधलेल्या किल्ल्यात भगवती देवीची पाच फूट उंच मूर्ती आहे. या शिल्पामध्ये देवी मधोमध असून बाजूला दोन्हीकडे दोन हत्ती देवीवर फुलांचा वर्षाव करीत आहेत. या मूर्तीला मूर्तिशास्त्राच्या भाषेत गजलक्ष्मी किंवा गजांतलक्ष्मी असे म्हणतात. रत्नागिरी शहराजवळील रत्नदुर्ग या किल्ल्यावरदेखील भगवती देवीची चार फूट उंच मूर्ती आहे. या रत्नदुर्ग किल्ल्याचे नाव भगवती देवीच्या मंदिरामुळे 'भगवतीचा किल्ला' असेच पडले आहे. मानगड किल्ल्यावर 'विंझाई' नावाच्या देवीचे मंदिर गडाच्या दरवाज्याखाली बांधलेले आहे. दशभुजा देवीचे मंदिर वणीच्या डोंगरावर आहेच पण त्याच्यासमोर अहिवंतगड या किल्ल्यावरही देवीची मूर्ती आहे. भगवान परशुराम या देवाचे मंदिर महाराष्ट्रात फक्त साल्हेर या किल्ल्यावर आहे. तेथे परशुरामाच्या पादुका एका छोट्या मंदिरात आहेत. साल्हेर हा महाराष्ट्रातील सर्वात उंच किल्ला असून गडाच्या सर्वोच्च माथ्यावर हे मंदिर आहे आणि गडाच्या माचीवर रेणुका मातेच्या मंदिराचे अवशेष आहेत. माहूरगड या किल्ल्यावर देखील रेणुका मातेचे मंदिर आहे. येथे खूप भाविक येत असतात. पण आज स्थिती अशी आहे की, दर्शनाला आलेल्या भाविकांना येथे असा काही किल्ला आहे आणि तो पाहण्यासारखा आहे याचाच विसर पडला आहे.


रांगणाई देवी मंदिर


रायगड, शिरकाई


विश्रामगड हनुमान


खांदेरी वेताळ

**(लेखक पुणे येथील डेक्कन महाविद्यालयात पुरातत्त्व विभागात संशोधक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**



# सह्याद्रीचे नक्षत्र
# भिमाशंकर

**महाराष्ट्राला सर्वात मोठे वरदान लाभले आहे ते सह्याद्रीच्या रूपात. निसर्गाने आपला खजिनाच जणू महाराष्ट्राला बहाल केला आहे. यामध्ये जसे हिरवाईने गच्च भरलेले पाचू आहेत तसेच उन्हात पिवळ्या किरणांनी उभे पुष्कराजासारखे बोडके डोंगरही आहेत. याच रांगेत आपली अंगभूत वैशिष्ट्ये जपत भिमाशंकर उभा आहे. एकाचवेळी निसर्ग आणि अध्यात्म यांचा सुरेख मिलाफ या ठिकाणी बघायला मिळतो. या हिरव्या निसर्गाच्या सौंदर्यात, जगाच्या योग्याचे अर्थात शंकराचे स्थान ठेवण्याचे कवित्व निसर्गच करू शकतो.**

**प्रवीण कुलकर्णी**

भिमाशंकर...पश्चिम घाटातील कैलास जणू. निसर्गाची मुक्तहस्ताने उधळन केल्याने हा सगळा परिसर मंतरलेला वाटतो. शंकराच्या जटाच जणू जंगलाच्या रूपाने येथे वाढताहेत. भिमाशंकराच्या ओढीने श्रद्धाळू येथे येतातच पण निसर्गप्रमीही येथे येतात. ट्रेकर्सना तर भिमाशंकरने नेहमीच भुरळ घातली आहे. पावसाळ्यात या भागाला भेट देणे हा एक अवर्णनीय आनंद असतो. प्रचंड कोसळणारा पाऊस, त्यातून निर्माण होणारे जलप्रवाह आणि आपल्या अंगोपांगी थेंबाचे मोती मिरविणारे जंगल यांमुळे हा परिसर एक अद्‌भुत रूप घेतो. पण हे सौंदर्य टिपण्यासाठी तरुणाईचा उत्साह मात्र लागतो. त्यामुळे या परिसाराला भेट द्यायची आहे आणि निसरड्यातून वाटही काढावी लागू नये यासाठी हिवाळा हा ऋतु सर्वात चांगला आहे. पाखरांची किलबिल, खारूताईंचे सरसर झाडावर चढणे आणि हिवाळी गारव्याने पानांची होणारी सळसळ अनुभवायची तर डिसेंबर-जानेवारीत या भागाला भेट द्यायला पाहिजे.

बारा ज्योतिर्लिंगामधील एक ठिकाण म्हणून भिमाशंकर मंदिराचे महत्त्व आहे. त्याचबरोबर येथील जंगलाला अभयारण्याचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे येथील निसर्गसौंदर्याची आणि येथील नैसर्गिक साधनसंपत्तीची जपणूक झाली आहे. या जंगलात बिबट्यापासून रानडुक्कर, सांबर, भेकर, रानमांजर, रानससा, उदमांजर असे अनेक प्राणी आणि पक्षी आढळतात. महाराष्ट्राचे मानचिन्ह असलेली शेकरू ही खार या जंगलात आढते. महाराष्ट्रातील चांदोली आणि भिमाशंकर येथेच ती जास्तकरून आढळते. विशेष म्हणजे येथे आढणाऱ्या खारीला भिमाशंकरी खार असेही म्हटले जाते. तांबूस रंगाच्या या खारीचा विणीचा काळही डिसेंबर-जानेवारी असल्याने या महिन्यात भेट देणाऱ्यांना पिलांसह खार बघण्याचा योग येऊ शकतो. नैसर्गिक अधिवासात प्राण्यांना आपल्या पिलांसोबत बघण्याचा आनंद जंगलात जाऊन प्रत्यक्ष डोळ्यांनी बघितल्याशिवाय घेता येत नाही, त्याचे वर्णन डोळ्यांच्या पटलावर चित्र रेखाटूनच करायचे.

भिमाशंकरला रस्त्याने जायला पुणेनगर रस्त्यावरच्या मंचरला फाटा आहे. मुंबईहून हे अंतर अडीचशे-पावणेतीनशे किमी एवढे आहे. पुण्याहून भिमाशंकर १६८ किमी आहे. मुंबईहून जायला दोन मार्ग आहेत. पहिला मार्ग म्हणजे कल्याणनगर रस्त्याने मुरबाड , माळशेज घाट पार करत



आळेफाटा गाठायचे. पुढे पुण्याच्या दिशेला असलेल्या नारायणगाव मार्गे मंचरला वळायचे. दुसरा मार्ग म्हणजे मुंबई-पुणे मार्गावरील लोणावळा ओलांडून तळेगावहून आतल्या रस्त्याने राजगुरूनगर मार्गे मंचर गाठायचं. मंचर-भिमाशंकर हे अंतर साधारण ७० किमी असून मार्ग दाट जंगलाचा व निर्जन आहे. कोकणातून भिमाशंकरला पायी जाण्याचा मुख्य मार्ग खांडसहून आहे. कर्जत खांडस अंतर सुमारे १४ किमी आहे. कर्जत-मुरबाड रस्त्यावर कशेळे आहे. इथून खांडसला जायचे वळण आहे. खांडसहून भिमाशंकरचा ट्रेक साधारण अकरा किमीचा खड्या चढणीचा आहे. इथूनदेखील वर जाणारे दोन मार्ग आहेत. दोन्ही वाटा डोंगराच्या पहिल्या पठारावर मिळतात. एक मार्ग ' गणपतीघाट ' या नावाने ओळखला जातो. दुसरा मार्ग शिडीचा रस्ता म्हणून डोंगरभटक्यांना परिचित आहे. या मार्गातली तीन-चार ठिकाणे अतिधोकादायक आहेत. इथे दोन ठिकाणी कपरीत शिड्या लावलेल्या आहेत. ट्रेकींगची सवय असणाऱ्यांना या साहसी मार्गानेच जायला आवडते.

हिरव्याकंच पर्णभाराने लगडलेल्या वृक्षांवर गोड कूजन करणारे बुलबुल, फुलाफुलांवर उडणारी रंगीबेरंगी फुलपाखरे, आकर्षक रंगांनी मन आकर्षित करून घेणारे तऱ्हेतऱ्हेचे कीटक, या सर्वांचे निरीक्षण करणे हा अद्‌भुत अनुभव असतो. रोजच्या धकाधकीच्या शहरी जीवनाचा उबग आलेल्यांना तर हा परिसर म्हणजे नंदनवनच वाटावा, यात काहीच आश्चर्य नाही. नागफणी या उंच शिखरावरून आसपासच्या दऱ्याखोऱ्यांचे विहंगम दृश्य मनाला भुरळ पाडते. याच क्षेत्रातून भीमा नदीचा उगम होतो आणि



आग्नेय दिशेने वाहत ती पुढे कर्नाटकातील रायचूरजवळ कृष्णा नदीत विलीन होते.

**भीमाशंकर –** महाराष्ट्रातल्या तमाम वारकरी संप्रदायाला पूज्य असलेली चंद्रभागा नदीचे मूळ येथील ज्योतिर्लिंगात आहे. येथे ती भिमा नावानेच उगम पावते पुढे पंढरपुरात चंद्रभागा म्हणून ओळखली जाते. ज्योतिर्लिंगात जरी ती उगम पावत असली तरी तिथून ती गुप्त होते आणि मंदिरापासून जंगलात साधारणपणे १.५ किमी. पूर्वेला पुन्हा प्रकटते. या जागेला गुप्त भिमाशंकर म्हणून ओळखले जाते.

**कोकण कडा –** भिमाशंकर मंदिराजवळच पश्चिमेला हा कडा आहे. साधारणपणे ११०० मीटर इतकी त्याची उंची आहे. येथून अरबी समुद्रही दिसू शकतो. हे दृश्य अगदी विलोभनीय आहे.

**सीतारामबाबा आश्रम –** घनदाट जंगलाचा प्रवास करत दोन्ही बाजू आपल्या डोळ्यात साठवत, कोकणकड्यापासून पुढे गेल्यावर हे ठिकाण लागते. येथूनच नागफणीला जायला पायवाट आहे. समुद्रसपाटीपासून १२३० मीटरवर असलेल्या या नागफणीवरून दिसणारे दृश्य अतिशय विहंगम असे आहे. एखादा नाग फणा काढून उभारल्यावर जसा दिसेल तसे हे शिखर कोकणातून दिसत असल्याने याला नागफणी म्हटले जाते.

## भिमाशंकर मंदिर

**भीमाशंकराचे मंदिर नगारा शैलीत अठराव्या शतकात बांधण्यात आले आहे. त्याच्या बांधकामावर आर्य शैलीचा प्रभाव दिसून येतो. येथे महादेवाचे स्वयंभू लिंग आहे. पेशव्यांचे कारभारी नाना फडणवीस यांनी मंदिराचे शिखर बांधले. छत्रपती शिवाजी महाराजांनीही या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मदत दिल्याचा उल्लेख इतिहासात सापडतो. मंदिराच्या कोरीव दगडी खांबांवर पौराणिक देखावे खोदण्यात आले आहेत. मंदिराच्या आवारात शनिमंदिरही आहे. या क्षेत्राचा पुराणातही उल्लेख सापडतो.**

### कसे जावे :

पुण्याच्या शिवाजीनगर बस स्थानकातून तसेच नारायणगाव किंवा मंचरहून एसटी बसेस भीम ाशंकरला जातात. पुण्यापासून जवळ असलेले हे ठिकाण अंदाजे १२५ किलोमीटर भरते. सकाळी लवकर निघून संध्याकाळपर्यंत एका दिवसात पुण्यात येता येण्यासारखे हे स्थळ आहे.

### कोठे राहाल :

खासगी हॉटेल्स येथे भरपूर आहेत मात्र सलग सुट्यांच्या काळात राहण्यासाठी अगोदरच जर आरक्षण करून ठेवले तर तेथे जादा पैसे आणि वेळ वाया जाणार नाही....

# हवे निश्चित ध्येय...



**डॉ. अश्विनी जोशी**
जिल्हाधिकारी, ठाणे

**समाजासाठी काहीतरी करायचे हा उद्देश पहिल्यापासून मनात होता. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण घेतले. मात्र या व्यवसायात मन रमत नसल्याचे दिसून आल्याने प्रशासकीय सेवेत जाण्याचा निर्णय घेतला. भरपूर कष्ट आणि योग्य मार्गदर्शनामुळे यशाला गवसणी घालता आली.**

माझा जन्म ७ फेब्रुवारी १९८०चा. मी लहानाची मोठी झाले ती चिपळूणमध्येच. दहावीपर्यंत मराठी शाळेतच शिकले आणि नंतर चिपळूणच्या डीबीजे कॉलेजात महाविद्यालयीन शिक्षण घेतले. पुढे मुंबईच्या शासकीय दंत महाविद्यालयातून दंतवैद्यक अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि डॉक्टरही झाले पण तोपर्यंत मला सिव्हील सर्व्हिसेसमध्ये येऊन आपण अगदी आयएएस वगैरे करू, असे वाटले नव्हते. कालांतराने मला डेंटिस्ट्रीत फारशी रुची राहिली नाही, कारण इथे केवळ पेशंट पाहणे आणि जरी एक नोबल असला तरी फक्त व्यवसाय करणे एवढेच करता येण्यासारखे होते. माझ्या कुटुंबात डॉक्टर्स आहेत. संपूर्ण घराण्यात तब्बल ३५ वैद्य. त्यामुळे मीही याच क्षेत्रात करिअर करेल, असे सगळ्यांना वाटत होते. माझ्या मनात मात्र सारखे मला यापेक्षा अधिक काहीतरी कसे करता येईल, माझ्या कामाची व्याप्ती कशी वाढवता येईल, अधिकाधिक लोकांशी माझा संपर्क कसा वाढेल आणि त्यातून त्यांच्या जीवनाला आपण काही अर्थ मिळवून देऊ शकतो का हेच विचार सातत्याने घोळत होते.

आणि अचानक मला तो मार्ग सापडला. आयएएस होण्याचा.
प्रशासनात उत्कृष्ट करिअर करून लोकांसाठी काहीतरी योगदान देण्यासारखा दुसरा कुठला आनंद नव्हता आणि मग माझी तयारी सुरू झाली. खूप परिश्रमाला पर्याय नव्हताच पण ध्येय निश्चित असल्याने कुठलाही ताण नव्हता. एकंदर ३ वेळा सिव्हील सर्व्हिसेसची परीक्षा द्यावी लागली आणि अखेर २००५ मध्ये मी यशस्वी झाले. संपूर्ण भारतात मी १३ वी होते ही गोष्ट तर आणखी सुखावणारी होती.

माझ्या या यशात डॉ. चिंतामणराव देशमुख प्रशासकीय केंद्राचा मोठा वाटा होता हेही मला अभिमानाने सांगावे वाटते. निवडीनंतर लगेच वर्षभरासाठी नागपूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून प्रोबेशनवर रुजू झाले. या संपूर्ण वर्षभरात एकूणच महसूल व्यवस्था कशी काम करते याचा फिल्डवरचा अनुभव मिळाला. त्यानंतर अकोला येथे एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यक्रमावर प्रकल्प अधिकारी म्हणून काम करताना आदिवासींच्या योजना आणि कार्यक्रम यांच्या अंमलबजावणीविषयी विस्ताराने माहिती मिळाली आणि त्या दृष्टीने कामही करता आले. त्यानंतर मी भंडारा जिल्हा परिषद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनही काम पाहिले. नंतर अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून मुंबई उपनगरसारख्या मोठ्या आणि महानगरातील जिल्ह्यात काम करण्याचा अनुभव मिळाला. या ठिकाणी मी करमणूक शाखा, भू संपादन या गोष्टी पाहिल्या तेथून पुढे अकोल्याला आणि नंतर सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. जिल्हा परिषदेची यंत्रणा समजावून घेता आली आणि चांगले कामही करून दाखवता आले. सिंधुदुर्ग येथे 'टुरिस्ट गाइड कम ड्रायव्हर' हा निवासी प्रशिक्षणाचा तीन महिन्यांचा कार्यक्रम बेरोजगार युवक-युवतींसाठी मी राबवला हे विशेष.

अकोला येथील माझ्या काही कामांविषयी मला सांगितले पाहिजे. ग्रामविकास विभागामध्ये तेही अकोल्यासारख्या शेतकरी आत्महत्यांचे प्राबल्य असणाऱ्या जिल्ह्यात काम करणे चॅलेंजिग होते. माझ्या सुरुवातीच्या काळापासून ग्रामविकासाशी संबंधित पोस्टिंगमुळे ग्रामीण भागातील समस्या विशेषत: महिला, लहान मुले याना भेडसावणाऱ्या समस्यांवर काम करायला मिळाले. अकोल्याच्या पोस्टिंगमध्ये मी ग्रामीण भागात शाळांच्या १०० पेक्षा जास्त खोल्या बांधल्या. या खोल्या म्हणजे शिक्षणाला साहाय्यभूत ठरतील, अशा इमारती होत्या B-L- (Building as Learning -id). केंद्र सरकार वर्ग खोल्या बांधायला एक लाखाहून अधिक रुपयांचे अनुदान देते. मात्र अकोल्यात हाच उपक्रम मी अवघ्या ८ हजार रुपयांत केला. स्थानिक गवंडी, सुतार यांना प्रशिक्षित करून राबवलेला हा उपक्रम यशस्वी ठरला.

माझ्या काळात १ वर्षे आणि त्यापेक्षा लहान मुलांसाठी आणि विशेषत: गरोदर महिलांसाठी रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. अकोल्यातील सात तालुक्यामध्ये सात व्हॅन उपलब्ध झाल्या. या उपक्रमाद्वारे तीन महिन्यात १६५ प्रसूती सुखरूप पार पडल्या. यासाठी कॉल सेंटर सुरू करण्यात आले. कॉल आला की, तातडीने व्हॅन तिथे पोहोचायची या रुग्णवाहिकांतून गरोदर महिलांना तातडीने जवळच्या रुग्णालयात हलवले जाई.

अकोल्यात आणखी एका महत्त्वाच्या कार्यक्रमाशी मी निगडित होते तो म्हणजे संपूर्ण स्वच्छता. संपूर्ण जिल्ह्यातील शाळांमधून मी सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग मशिन बसवली होती जेणेकरून याबाबत मुलींमध्ये केवळ जागृती होणार नाही तर त्याचा वेळीच उपयोग होऊ शकेल आणि स्वच्छतेला प्राधान्य मिळेल. एका स्वयंसेवी संस्थेकडे या मशीन्सची आणि त्यातील नॅपकिन्स वेळीच उपलब्ध होतील याची व्यवस्था दिली होती. माझ्या दृष्टीने हा उपक्रम वयात येणाऱ्या मुलींसाठी खूप आवश्यक असा होता. मी या काळात अंगणवाडीच्या उपक्रमांमध्येही नव्या योजना राबवल्या आणि ही चळवळ अधिक मजबूत कशी होईल, हे पाहिले.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पत्नी किवा मुलीला थेट अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय झाला होता. पण त्याची अंमलबजावणी होत नव्हती. नियुक्त्यांमध्ये येणारे हितसंबंध तोडण्याचे मी ठरवले, आणि अगदी पारदर्शकपणे अकोल्यातील ६०

महिलांना खुल्या सभागृहात अंगणवाडी सेविका म्हणून नियुक्ती देण्याचे धाडस दाखविले. 'मॅडम, तुम्ही आमची नियुक्ती करून आमच्या आयुष्याला उभारी दिली, आम्हाला आत्मसन्मान दिला,' हे वाक्य ऐकायला मिळाल्यावर विरोधावर मात करण्याचे बळ मिळाले. अशा प्रकारचे अनेक अनुभव आले.

मुंबईत नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा म्हणून रुजू झाल्यावर चर्चगेट येथील कार्यालयाची रचना बदलण्याचा निर्णय मी घेतला. गरिबांना स्वस्त धान्य वेळेवर मिळावे, या उद्देशानुसार काम सुरू केले. मुंबईतील वस्त्यांच्या जवळपास दुकाने असायला हवीत, त्या दृष्टीने वस्त्यांमधील दुकांनाचे मॅपिंग सुरू केले. कोणत्या ठिकाणी वेळेत धान्य पोहोचत नाही, याविषयी अहवाल तयार झाल्यावर हे धान्य वेळेत कसे पोहोचेल, असा प्रयत्न सुरू केला. 'चावडीवाचन' हा उपक्रम मुंबईसारख्या ठिकाणी सुरू केला. तुमच्या विभागातील दुकानात या महिन्यात अमुक धान्य उपलब्ध झाले आहे, याची माहिती चावडीवाचनातून केली जाते. त्यामुळे सध्या मोठ्या प्रमाणावर धान्याची उचल सुरू झाली. तक्रारींसाठी हेल्पलाइन सुरू केली.

ज्या डॉ. चिंतामणराव देशमुख प्रशासकीय केंद्रात शिकले त्याच ठिकाणी म्हणजे ठाणे येथे जिल्हाधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली ही मोठी गोष्ट मानते. यापूर्वी १९८३मध्ये डॉ. जॉयस शंकरन यांची ठाण्याच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर तब्बल ३० वर्षांनंतर माझ्या रूपाने ठाण्याला पहिल्यांदा एक महिला जिल्हाधिकारी म्हणून लाभली.

ठाणे जिल्हाधिकारी म्हणून काम करताना एक वर्ष पूर्ण झाले आहे. आव्हाने खूप आहेत. मुंबईलगतचा हा मोठा जिल्हा असून प्रामुख्याने नागरीकरण झाले असले तरी ग्रामीण लोकसंख्या, काही प्रमाणात आदिवासी भागही आहे. मी याठिकाणी आल्यावर प्रशासनाला अधिक गती देण्याचा आणि शिस्त आणण्याचा प्रयत्न केला, अनेक गोष्टी प्रलंबित होत्या. नेवाळी येथे विमानतळासाठीच्या मोजणीचा ५० वर्षे प्रलंबित प्रश्न मी मार्गी लावला, ऐतिहासिक टाऊन हॉलचे पुनरुज्जीवन करून कला आणि सांस्कृतिक उपक्रमांसाठी एक मध्यवर्ती जागा उपलब्ध करून दिली. कळवा खाडीलगताच्या जागेवर बायोडायव्हर्सिटी पार्क तयार करण्याचे निश्चित झाले असून त्याचे काम सुरू केले, रेतीबंदरची चौपाटी हे एक चांगले पर्यटन स्थळ

## प्रेरणा

### यशाची सूत्रे

- **खूप लोक खूप सांगतात, पण जोपर्यंत आपल्या मनाला पटत नाही, आपण आपल्या मनाचे समाधान करू शकत नाही तोपर्यंत निर्णय घेऊ नका. आणि एकदा निर्णय घेतला की मागे बघू नका**
- **अपयशाची भीती बाळगू नका. एकदा दोनदा प्रयत्न करूनही अनेकवेळा यश येत नाही, पण त्यामुळे निराश न होता प्रयत्न केले तर यश नक्की मिळते**
- **आपल्याला समाजासाठी काहीतरी करायचे आहे. हा उद्देश ठेवून अभ्यास केला तर हा उद्देशच आपल्याला यशापर्यंत घेऊन जायला मदत करतो.**
- **सातत्यपूर्ण आणि योग्य मार्गदर्शनाखालील अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते**
- **आपल्याला काय व्हायचे आणि पुढे जाऊन काय करायचे आहे हे ध्येय निश्चित असल्यास अभ्यासाचा ताण येत नाही.**
- **सातत्यपूर्ण अभ्यास म्हणजे तासन्‌तास अभ्यास करण्यापेक्षा गुणवत्तापूर्ण अभ्यास कसा होईल यावर भर द्यावा.**




करण्याच्या दृष्टीने पूर्ण नियोजन झाले असून लवकरच काम सुरू होईल. रेतीचा अवैध उपसा करून खाडी आणि पर्यावरणाला नुकसान पोचविणाऱ्याविरुद्ध मी जोरदार मोहीम उघडली असून त्याचे चांगले परिणाम दिसून यायला लागले आहेत. जिल्ह्यातील शासकीय जमिनीचा डाटाबेस तयार करण्यात आला आहे. अनधिकृत आणि अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी जे जे करता येणे शक्य आहे ते ते मी करीत राहणार आहे. आपल्या अधिकाराचा वापर विधायक कामासाठी करत प्रशासकीय अधिकाऱ्याने उल्लेखनीय काम केले पाहिजे. आपल्या अधिकाराचा वापर न करता फक्त शांतपणे बसणे, हा बौद्धिक पातळीवरचा भ्रष्टाचार आहे आणि तो अधिक घातक आहे असे मला वाटते. विधायक कामे करताना आलेल्या अनेक अडचणींशी मी संघर्ष केला पण कोणतीही तडजोडीची भूमिका घेतली नाही आणि यापुढेही घेणार नाही.

**शब्दांकन : अनिरुद्ध अष्टपुत्रे**

**(लेखक हे ठाण्याचे येथील जिल्हा माहिती अधिकारी आहेत.)**
**संपर्क : ०९३२३९७६२३१**



**महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जलसंपदामंत्री गिरीष महाजन यांनी केंद्रीय जलसंसाधन मंत्री उमा भारती यांची घेतलेली भेट...ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा अमृतमहोत्सवी सत्कार, या सत्कार सोहळ्याला राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांसह देशभरातील प्रमुख नेत्यांनी दाखवलेली उपस्थिती ही या महिन्यातील नवी दिल्लीतील प्रमुख वैशिष्ट्ये ठरली...**

# जलसिंचन प्रकल्पाला गती

**दयानंद कांबळे**

पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्रिय पुढाकाराने राज्यात राबवल्या जात असलेल्या जलशिवार योजनेचे सुपरिणाम दिसत असतानाच, राज्यातील जलसिंचन प्रकल्पांना गती देण्यासाठी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारकडे महत्त्वाच्या वाटाघाटी केल्या. केंद्रीय जलसंसाधन मंत्री उमा भारती यांची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांनी कृष्णा खोरे पाणी वाटपासह मराठवाडा व विदर्भातील सिंचनाच्या समस्यांबाबत सकारात्मक चर्चा केली. कृष्णा पाणी वाटप लवादानुसार, महाराष्ट्राला मिळालेल्या पाण्याचे फेरवाटप करण्यात येऊ नये अशी भूमिका मांडताना; मराठवाड्याला त्याच्या हिश्श्याचे पाणी मिळावे आणि विदर्भातील गोसीखुर्द प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत केली. त्यास केंद्राकडून मिळालेला सकारात्मक प्रतिसाद राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला.

राज्याच्या दृष्टीने कृष्णा खोरे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्रात उगम पावणारी कृष्णा नदी जवळपास दोन हजाराहून अधिक किलोमीटरचे अंतर कापून कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगनातून वाहत जावून बंगालच्या उपसागरात मिळते. या राज्यांदरम्यान कृष्णा नदीच्या पाणी वाटपावरून निर्माण झालेल्या कृष्णा पाणी वाटप लवादातील राज्याची भूमिका मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली.

### गोसीखुर्द प्रकल्पास निधी

विदर्भातील गोसीखुर्द हा राष्ट्रीय प्रकल्प बऱ्याच वर्षांपासून रखडलेला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास विदर्भातील सिंचन क्षमता वाढेल. मात्र हा प्रकल्प पूर्ण होण्याकरिता बऱ्याच अडचणी येत आहेत. सध्या या प्रकल्पाला केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होत नाही. ही बाब लक्षात घेता प्रकल्प पूर्ण करण्याकरिता केंद्राकडून निधी उपलब्ध व्हावा, अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत केली.

### माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संकेतस्थळाला राष्ट्रीय पुरस्कार

काळाची पाऊले ओळखत महाराष्ट्र शासनाने नेहमीच आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केला आहे. राज्य शासनाचा माहिती व तंत्रज्ञान विभाग यात अग्रेसर आहे. विभागाने शारीरिक असक्षम व्यक्तींना हाताळण्यास सोयीचे असे वेब पोर्टल तयार केले असून यास राजधानीत सर्वोत्तम सरकारी संकेतस्थळाचा राष्ट्रीय पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.

केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रीय शारीरिक असक्षमीकरण दिनाचे औचित्य साधून शारीरिक असक्षम राष्ट्रीय पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात केंद्रीय अर्थमंत्री अरूण जेटली यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उत्तम कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्री थावरचंद गहलोत, राज्यमंत्री कृष्णपाल सिंह आणि विजय सांपला उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव विजय कुमार गौतम यांनी राज्य शासनाला मिळालेला सर्वोत्तम संकेतस्थळाचा पुरस्कार स्वीकारला. माहिती व तंत्रज्ञान विभागाचे संचालक एम. संकर नारायणन यांच्या मार्गदर्शनाखाली हे संकेतस्थळ तयार करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कार्यरत प्राध्यापक व स्वत: शारीरिक असक्षम असलेले धनंजय भोये यांचा संकेतस्थळ निर्मिती कार्यात सहभाग होता. शारीरिकदृष्ट्या असक्षम व्यक्तींनाही शासन निर्णय व संकेतस्थळावरील महत्त्वाची माहिती सुगमरीत्या कळावी, यासाठी ब्रेल लिपीसह ऑडिओ-व्हीडिओ क्लीप देण्याची व्यवस्था उप-लब्ध करून देण्यात आली आहे. मार्ग निर्देशित करण्याची व्यवस्थाही या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. संकेतस्थळ बहुभाषी सुविधांसहीत स्मार्ट फोन व संगणकावर सहजगत्या वापरता येऊ शकते. याच कार्यक्रमात कर्णबधिरांच्या स्वयंरोजगार गटात वैयक्तिक पुरस्कार पुण्याच्या नेहा कुलकर्णीला प्रदान करण्यात आला. मंतिमंदाच्या गटात मुंबईच्या समीर दार्जी यांना सन्मानित करण्यात आले. अपंगाच्या आदर्श व्यक्ती गटाच्या कर्णबधीर या उपगटात पुण्याच्या प्रेरणा सहाणे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### परिचय केंद्राच्या प्रदर्शनाला उदंड प्रतिसाद

येथील प्रगती मैदानावर आयोजित ३५ व्या भारतीय अंतरराष्ट्रीय उद्योग मेळाव्यात महाराष्ट्र परिचय केंद्राने महाराष्ट्र दालनात राज्य शासनाच्या गेल्या एक वर्षाच्या काळातील विकास कामांची माहिती देणारे प्रदर्शन आयोजित केले. या प्रदर्शनाचे उद्घाटन उद्योग राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांनी केले. उद्योग मंत्री सुभाष देसाई, उद्योग विभागाचे प्रधान सचिव अपूर्व चंद्रा

आदी मान्यवर उपस्थित होते. आशिया खंडातील महत्त्वाचा व्यापार मेळावा म्हणून ओळख असणाऱ्या या व्यापार मेळाव्यात व्यापारी, गुंतवणूकदार, ग्राहक मोठ्या प्रमाणात भेटी देतात. देशातील प्रत्येक राज्यांकडून आपल्या राज्यातील लघू व मध्यम उद्योगांसह राज्यसरकारच्या साहाय्याने होत असलेल्या प्रगतीची झलक येथे मांडण्यात येत असते. महाराष्ट्र दालन या मेळाव्यास भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आकर्षणाचे केंद्र असते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वात राज्याने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीची माहिती महाराष्ट्र दालनास भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवण्यासाठी मराठी व इंग्रजी भाषेत आकर्षकपणे हे प्रदर्शन भरवण्यात आली. महाराष्ट्र दालनाच्या दर्शनी भागात आकर्षक पद्धतीने मांडण्यात आलेल्या प्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येकाची पावले स्थिरावत होती. राज्याच्या प्रगतीचा आलेख एकाच ठिकाणी बघायला मिळत असल्याने प्रदर्शनाला भेट देणारा प्रत्येक व्यक्ती भरपूर माहितीचा ठेवा मिळवल्याच्या भावनेने पुढे जात होती.

**(लेखक नवी दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे उपसंचालक आहेत.)**
**संपर्क : ०९८२२१०९३६२**

## जीवेत शरद: शतम्

महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री राहिलेले, केंद्रात सलग १० वर्ष कृषिमंत्री पदाचा पदभार सांभाळणारे व भारतीय राजकारणात ५ दशक यशस्वी कारकीर्द गाजवणारे राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा दिमाखदार अमृतमहोत्सवी सोहळा येथील विज्ञानभवनात पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सोहळ्यास उपस्थित राहून शरद पवार यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी, उपराष्ट्रपती हमीद अन्सारी, लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग, काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, पंजाबचे मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल आदी मान्यवर उपस्थित होते. भारताला जागतिक स्तरावर अन्नधान्यात निर्यातदार देश बनवण्यात शरद पवार यांचे मोलाचे योगदान आहे. अशा शब्दात राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी पवारांचा गौरव केला. केंद्रीय कृषिमंत्री म्हणून सलग १० वर्ष काम करताना त्यांनी देशाच्या शेती विकासासाठी रचनात्मक कार्य केले. ९० च्या दशकात महाराष्ट्राची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी मुंबईवर अंडरवर्ल्डचे सावट होते याच काळात या शहरात बॉम्बस्फोट झाले. अशा वाईट अवस्थेत पवारांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून सक्षम नेतृत्व दिले. कठोर व अचूक निर्णय घेत मुंबईतून अंडरवर्ल्डचा नि:पात केला. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना 'सलाम बॉम्बे आणि सलाम पवार म्हणणे' औचित्याचे ठरेल, अशा शब्दात त्यांनी शरद पवार यांचा गौरव करत त्यांना दीर्घ आयुष्याच्या शुभेच्छा दिल्या.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या भाषणात म्हणाले, शरद पवार यांचा मूळ पिंड हा रचनात्मक आहे. त्यामुळे ते राजकारणात रचनात्मक काम करू शकले. देशाच्या राजकारणात सतत ५ दशके वावर असणारे पवारांचे आयुष्य देशसेवेसाठी पूर्णपणे समर्पित राहिले आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत सहकार आणि राजकारणात संतुलन राखले आहे.

उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांनी, 'शरद पवार हे एक अष्टपैलू राजकारणी आहेत' अशा शब्दात पवारांचा गौरव केला. कृषिमंत्री म्हणून पवारांना राज्यसभेत सदस्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तर देताना पवारांनी नेहमी संयत भूमिका घेल्याचेही त्यांनी सांगितले.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह म्हणाले,'शरद पवारांनी देशाला सृजनात्मक योगदान दिले.' महाराष्ट्रासह देशाच्या सहकार, कृषी, उद्योग व सामाजिक क्षेत्रात पवारांनी महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे त्यांनी सांगितले. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी म्हणाल्या, 'शरद पवारांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यास विविध पक्षांचे नेते एका मंचावर उपस्थित असल्याचे चित्रच, त्यांच्या अजातशत्रू व्यक्तिमत्त्वाचा परिचय देणारे आहे.' याप्रसंगी शरद पवार आपल्या मनोगतात म्हणाले, 'मी वयाच्या अठराव्या वर्षी राजकारणात प्रवेश केला. वयाची पंचाहत्तरी, राजकीय जीवनाचे ५५ वर्ष आणि संसदीय जीवनाचे ४९ वर्ष अशा सर्व प्रवासात जनतेने दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त करतो.' महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व आपले राजकीय गुरू यशवंतराव चव्हाण यांच्याकडून संसदीय कामकाज व राजकीय शिष्टाचाराचे धडे मिळाल्याचे त्यांनी सांगितले. आजच्याप्रसंगी आईवडलांची आठवण होत असल्याचा उल्लेख करीत त्यांच्याकडून शिक्षण प्रसार, सहकार आणि राजकीय क्षेत्राचे बाळकडू मिळाले असे ते म्हणाले. या कार्यक्रमात शरद पवार यांच्या कार्याचा वेध घेणारी लघु चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच शरद पवार यांच्या जीवनावर आधारित 'गौरव ग्रंथ', 'ऑन माय टर्म' आणि 'लोक माझे सांगाती' या पुस्तकांचे राष्ट्रपतींच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केले, तर आभार खासदार सुप्रिया सुळे यांनी मानले.

# अभ्यासपूर्ण व उपयुक्त माहिती




**दिलखुलास कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपले विचार मांडले. यात महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री विनोद तावडे, मुंबईचे माहिती आयुक्त ए.के.जैन, जलसंधारण विभागाचे सचिव प्रभाकर देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमीचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे, श्रीमती नाथीबाई ठाकरासी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.वसुधा कामत यांनी विविध विषयांवर आपली मते मांडली..**

**मा.विनोद तावडे, मंत्री, शालेय शिक्षण**

भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम आझाद, माजी राष्ट्रपती यांचा जन्मदिन १५ ऑक्टोबर हा वाचक प्रेरणा दिन म्हणून देशभरात मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी राज्यातील जनतेशी संवाद साधला.

वाचनाचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळे शाळा, महाविद्यालये, विविध ग्रंथालये, कार्यालये, सार्वजनिक ग्रंथालये, व्यावसायिक कार्यालये विविध संस्था, प्रकाशन संस्था यामध्ये वाचक प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. भारत हा जगात महासत्ता राष्ट्र होऊ शकतो हा आत्मविश्वास डॉ.अब्दुल कलाम यांनी दिला आहे. त्यांचे लिखाण, भाषण हे मुलांना प्रेरणादायी ठरत आहे. आजकालच्या प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून आजची पिढी वाचनापासून दूर जात आहे. यासाठी वाचक प्रेरणा दिन साजरा केला, असेही श्री. तावडे यांनी यावेळी सांगितले.

**अजितकुमार जैन, माहिती आयुक्त**

माहिती अधिकार कायद्यास १० वर्षे पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने माहिती अधिकाराची अंमलबजावणी राज्यात कशाप्रकारे होत आहे. त्याचबरोबर माहिती अधिकाराचा वापर सर्वसामान्य जनतेला कोणत्या स्वरुपात फायदा प्राप्त करून देतो, याविषयी मुंबईचे माहिती आयुक्त ए.के.जैन यांना आमंत्रित करण्यात आले होते.

महाराष्ट्र हे स्वत:चा माहिती कायदा निर्माण करण्यात अग्रणी राज्य आहे. माहिती अधिकाराच्या अंमलबजावणीसाठी शासनामार्फत शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच नागरिकांमध्ये जाणीवजागृतीदेखील केल्याचे श्री. जैन यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर माहिती अधिकार कायद्याची सुरुवात व चळवळीबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली.

**प्रभाकर देशमुख, सचिव, जलसंधारण आणि रोजगार हमी योजना**

कमी पर्जन्यमानावर आणि टंचाईवर मात करण्यासाठी शासनाने राबवलेले विविध उपक्रम तसेच जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पूर्णत्वास गेलेला कामाचा आढावा दिलखुलास कार्यक्रमात घेण्यात आला होता. यासाठी जलसंधारण विभागाचे सचिव प्रभाकर देशमुख यांची मुलाखत प्रसारित करण्यात आली. श्री. देशमुख यांनी महाराष्ट्रातील जलसंधारणाची सद्यस्थिती आणि भविष्यातील योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.

**डॉ.नरेशचंद्र काठोळे, संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमी**

दिलखुलास कार्यक्रमात अमरावती येथील डॉ. पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमीचे संचालक डॉ. नरेशचंद्र काठोळे यांची मुलाखत प्रसारित करण्यात आली. डॉ.पंजाबराव देशमुख आय.ए.एस. प्रशिक्षण केंद्राचे मिशन आय.ए.एस. राज्यभर राबवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी या मुलाखतीत दिली. स्पर्धा परिक्षांचा अभ्यास शालेय जीवनापासून कसा करावा, याबरोबर मुलाखतीची तयारी यासंदर्भात त्यांनी मार्गदर्शन केले. मराठी तरूणांना प्रशासकीय सेवेत येण्याच्या मुख्य उद्देशाने ४ हजार स्पर्धा परिक्षा कार्यशाळा त्यांनी घेतल्या असून पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमी येथे असणाऱ्या सुविधा, ग्रंथालये याविषयी त्यांनी माहिती दिली.


**डॉ.वसुधा कामत, कुलगुरू श्रीमती नाथीबाई ठाकरासी विद्यापीठ, मुंबई**

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त या विद्यापीठात शिकवले जाणारे अभ्यासक्रम तसेच शिक्षण पद्धतीमधील बदल, महिलांसाठी नव्याने सुरू केलेल्या अभ्यासक्रमाची माहिती, तसेच या विद्यापीठाने प्रशासनात आणलेली पारदर्शकता याविषयी माहिती डॉ. वसुधा कामत यांनी दिली. एसएनडीटी महिला विद्यापीठाची स्थापना महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिलांच्या शिक्षणासाठी केली. कालांतराने या विद्यापीठात महिलांसाठी गृहविज्ञान, मिडिया मॅनेजमेंट, तसेच नर्सिंग आणि व्यवस्थापनामध्ये हॉटेल आणि हॉस्पिटल व्यवस्थापण सुरू करण्यात आले. त्याबरोबर इंजिनिअरींगसारख्या विद्या शाखेचा समावेश करण्यात आला.

**– मीरा ढास**



**विनोद तावडे**
(मंत्री, शालेय शिक्षण)



**अजिकुमार जैन**
(माहिती आयुक्त)



**प्रभाकर देशमुख**
(सचिव, जलसंधारण आणि रोजगार हमी योजना)



**डॉ.नरेशचंद्र काठोळे**
(संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख आय.ए.एस. अकादमी)



**डॉ. वसुधा कामत**
(कुलगुरू, श्रीमती नाथीबाई ठाकरासी विद्यापीठ, मुंबई)

**सात शतके लोकप्रियतेची...**

# सुसंवाद जनतेशी...

**जय महाराष्ट्र कार्यक्रमात अनेक विषयांचा ऊहापोह करण्यात आला. त्यात महाराष्ट्राचे धर्मादाय आयुक्त शशिकांत सावळे, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष गंगाराम गवाणकर, पहिल्या अखिल भारतीय मराठी बालनाट्य संमेलनाच्या अध्यक्षा कांचन सोनटक्के, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक डॉ. दीपक आपटे, आदींना आमंत्रित करण्यात आले होते. या मुलाखतींचा हा थोडक्यात आढावा...**

**गंगाराम गवाणकर, नियोजित अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन**

९६ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ रंगकर्मी, मालवणी नाटकांचे बादशाह असलेले गंगाराम गवाणकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. गवाणकरजींनी आजवर अनेक उत्तमोत्तम नाटकांची निर्मिती केली असून वस्त्रहरण, वन रुम किचन, वेडी माणसं. वात्रट मेले ही त्यांची नाटके अत्यंत गाजली आहेत. गवाणकरजींच्या एकूणच अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाध्यक्षपदापर्यंतच्या प्रवासाविषयी आणि नाट्य संमेलनाध्यक्ष पदावरून ते घेणार असलेल्या भूमिकेविषयी, त्यांनी जय महाराष्ट्र कार्यक्रमादरम्यान माहिती दिली. सर्वप्रथम वयाची पंचाहत्तरी पूर्ण होत असतानाच अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळत असल्याचा आनंद असल्याचे ते म्हणाले. बाल रंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी आणि व्यावसायिक रंगभूमी असे रंगभूमीचे तीन टप्पे आहेत. त्यामुळे रंगभूमीचा पाया असलेली बाल रंगभूमी अधिक सक्षम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. नाट्य प्रकाराला कुठलीही मरगळ आली नसून दिवसेंदिवस नवनवीन नाटके रंगभूमीवर येत असल्याचे गवाणकरजींनी विशेषत्वाने नमूद केले.

**कांचन सोनटक्के, अध्यक्षा, अखिल भारतीय मराठी बालनाट्य संमेलन**

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. मात्र, यंदा प्रथमच सोलापुरात अलीकडेच पहिल्यावहिल्या मराठी बालनाट्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या पहिल्यावहिल्या संमेलनाध्यक्षपदी नाट्यशाला या संस्थेच्या माध्यमातून अंध, अपंग, कर्णबधिर आणि मतिमंद मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना रंगभूमीवर आणणाऱ्या ज्येष्ठ रंगकर्मी कांचन कमलाकर सोनटक्के यांची निवड करण्यात आली होती. या पहिल्यावहिल्या बालनाट्य संमेलनाविषयी, बालनाट्य संमेलनाध्यक्षपद तसेच त्यांच्या आजवरच्या नाट्यप्रवासाविषयी कांचन सोनटक्के यांनी माहिती दिली. नाट्य संस्कार रुजवण्यासाठी शाळा हा घटक महत्त्वपूर्ण असून शालेय वयातच नाट्यसंस्कार रुजवण्याची गरज असल्याचे कांचनताईंनी सांगितले. राज्य नाट्य स्पर्धेंतर्गत बालनाट्य स्पर्धा गेल्या १५ वर्षांपासून घेण्यात येत आहे. बालनाट्य चळवळीसाठी हे अत्यंत फायदेशीर असल्याचे कांचनताईंनी सांगितले. यासोबतच नाट्यशाळा या संस्थेचे विविध उपक्रम, स्पर्धा, कार्यक्रम याविषयी माहिती त्यांनी कार्यक्रमादरम्यान दिली.

**शशिकांत सावळे, धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र**

सर्वसामान्य नागरिकांना पोलिस आयुक्तालय, महसूल आयुक्तालयाची माहिती असते. मात्र, चॅरिटी कमिशनर अर्थात धर्मादाय आयुक्त कार्यालयाविषयी सर्वसामान्य आजही अनभिज्ञ आहे. याच धर्मादाय आयुक्तालयाचे कामकाज, रचना, कार्यपद्धती याविषयीची सर्वसामान्यांना माहिती व्हावी, यासाठी जय महाराष्ट्र कार्यक्रमात महाराष्ट्राचे धर्मादाय आयुक्त शशिकांत सावळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. राज्यातील सर्व विश्वस्त संस्थांवर नियंत्रण ठेवण्याची प्रमुख जबाबदारी धर्मादाय आयुक्त कार्यालयाची असते. धर्मादाय आयुक्तांना सामाजिक, जनहिताचे काम करण्याची संधी मिळते. देशभरात महाराष्ट्र, गुजरात ही राज्ये विश्वस्त संस्थाच्या बाबतीत आघाडीवर आहेत.

**डॉ. दीपक आपटे, संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी**

पर्यावणाचा समतोल राखून त्याचे संवर्धन, जतन व्हावे यासाठी देशभरात अनेक संस्था, संघटना कार्यरत आहेत. आपल्या राज्यातही पर्यावरण संवर्धन, पक्षी, प्राण्यांविषयीचे संशोधन, सर्वेक्षण करण्याचे काम १५ सप्टेंबर १८८३ पासून म्हणजे गेल्या १२५ वर्षांहून अधिक काळापासून मुंबई येथील बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी अर्थात बीएनएचएस ही संस्था काम करीत आहे. पर्यावरण संवर्धन, संरक्षण क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या या संस्थेविषयी तसेच दिवसेंदिवस होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासामागची कारणे आणि हा ऱ्हास रोखण्यासाठी काय उपाययोजना करता येईल, याविषयी जाणून घेण्यासाठी जय महाराष्ट्र कार्यक्रमात बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक डॉ. दीपक आपटे यांना आमंत्रित केले होते. डॉ. आपटे यांनी बीएनएचएस या संस्थेबरोबरच पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणासाठी काय पावले उचलणे गरजेचे आहे, याविषयी विस्तृत माहिती दिली.

**– अतुल पांडे**



**गंगाराम गवाणकर**
(नियोजित अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन)



**कांचन सोनटक्के**
(अध्यक्षा, अखिल भारतीय मराठी बाल नाट्य संमेलन)



**शशिकांत सावळे**
(धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र)



**डॉ. दीपक आपटे**
(संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी)


संकल्प २०१६

स्वच्छ | सुंदर | समृद्ध | स्मार्ट | सुरक्षित महाराष्ट्र

# नव्या वर्षात प्रत्येक घरी लोकराज्य

लोकराज्य हे सर्वाधिक विक्री असलेले शासकीय मासिक आहे. या मासिकाला गेल्या सहा दशकांची परंपरा आहे. महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यात जाणारे हे एकमेव मासिक आहे. हे मासिक म्हणजे महाराष्ट्र शासनाचा आरसा आहे. या मासिकात शासनाच्या विविध योजना, निर्णय, धोरणे व इतर उपयुक्त माहिती दिली जाते.

या मासिकामुळे जनतेच्या घरी पोहोचण्यास शासनास साहाय्य होत असते. त्यामुळे या मासिकाची लोकप्रियता प्रचंड असून तरुणांपासून शेतकऱ्यापर्यंत आणि महिलांपासून कामकऱ्यांपर्यंत हे मासिक आवडीने वाचले जाते तसेच ते संग्रही ठेवले जाते. ही बाब लक्षात घेऊनच लोकराज्यने २०१६ सालामध्ये अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचण्याचा संकल्प केला आहे.







नव्या वर्षात घरोघरी लोकराज्य हा संकल्प प्रभावीपणे राबवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. लोकराज्य हे माहितीने परिपूर्ण असणारे व वाचकांचे व्यक्तिमत्व विकसित करणारे नियतकालिक असल्याने या मासिकाचे प्रत्येकाच्या घरी येणे हे ज्ञानगंगा येण्यासारखे आहे.

माहितीने परिपूर्ण असे नागरिक आपल्या न्याय हक्कांसाठी अधिक जागरूक होऊ शकतात. घरोघरी लोकराज्यची संकल्पपूर्ती होणे म्हणजे महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्ती सक्षम आणि समर्थ होणे असाच होतो. त्यामुळे घरोघरी लोकराज्यचा संकल्प या मासिकाच्या निर्मितीमध्ये सहभागी असलेल्या टीमचा असला तरी लोकराज्य हे वाचकांचे स्वत:चे मासिक आहे. त्यामुळे या संकल्पपूर्तीस त्यांचा सहभाग अत्यंत मोलाचा आहे. हा सहभाग मिळाल्यास महाराष्ट्रातील एकही गाव, एकही वाडी आणि एकही शहर लोकराज्यविना राहणार नाही.


लोकराज्यचे अधिकाधिक वर्गणीदार होणे याचाच अर्थ लोकराज्यच्या सामर्थ्यात वाढ करणे होय. समर्थ लोकराज्यमधून सक्षम अशा लोकशक्तीची निर्मिती होऊ शकते. शासनाने जनतेच्या हितासाठी घेतलेले विविधांगी निर्णय आणि योजनांचा लाभ आपल्या कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस होऊ शकतो. त्यामुळे २०१६ मध्ये घरोघरी लोकराज्य या संकल्पपूर्तीसाठी प्रत्येक गावात लोकराज्य, प्रत्येक शाळेत आणि महाविद्यालयात लोकराज्य आणि कार्यालयांमध्ये लोकराज्य असे विविध उपक्रम राबवले जातील.

लोकराज्यचा प्रत्येक अंक १० रुपयांचा आणि वार्षिक वर्गणी अवघी १०० रुपये आहे. आपण लोकराज्याचे वर्गणीदार होऊ शकताच; शिवाय गिफ्ट - अ- लोकराज्य या उपक्रमात सहभागी होऊन आपण आपले जवळचे नातेवाईक, मित्र, विद्यार्थी, वाचनालये, इतर सामाजिक संस्था, शेतकरी आदींना नववर्षाची भेट देऊ शकता.

अवघ्या १०० रुपयात वर्षभर उपयुक्त माहिती, ज्ञान, प्रेरणादायी लेख, विविध योजनांचा खजिना आपल्या घरी येईल. आपल्या ज्ञानाची कक्षा वाढवतील. शिवाय आपणास प्रगती आणि विकासाच्या विविध संधीची माहिती घरपोच देतील.


तेव्हा, टीम लोकराज्यच्या २०१६ च्या 'घरोघरी लोकराज्य' या संकल्पात सहभागी होऊन तो यशस्वी करा. कारण लोकराज्य हे जसे आमचे आहे, त्याहून अधिक तुमचे आहे. तुमच्या लाडक्या आणि आवडत्या लोकराज्यला नव्या वर्षात प्रत्येकाच्या घरी पोहोचवू या..

**टीम लोकराज्य**




## उर्दू लोकराज्य आणि महाराष्ट्र अहेड

**याबरोबरच लोकराज्यची भावंडे असलेली उर्दू लोकराज्य हे उर्दूतून प्रसिद्ध होणारे आणि महाराष्ट्र अहेड हे इंग्रजीतू प्रसिद्ध होणारे मासिकेही जास्तीत जास्त लोकापर्यंत पोचविण्याचा संकल्प केला आहे.**



# लोकराज्य दुर्मीळ अंक प्रदर्शन

**शासन आणि जनता यांना जोडणारा दुवा असलेले लोकराज्य मासिक प्रत्येक माणसापर्यंत पोहोचावे यासाठी माहिती आणि जनसंपर्क खात्याच्या विविध विभागांकडून आणि कार्यालयाकडून सातत्याने प्रयत्न होत असतात. त्याचाच एक भाग म्हणून हिवाळी अधिवेशनानिमित्त नागपूर-अमरावती विभागाने लोकराज्यचे प्रदर्शन आयोजित केले होते तर ६ डिसेंबरला प्रकाशन शाखेच्या वतीने चैत्यभूमीवर प्रदर्शन भरविण्यात आले होते. या दोन्ही प्रदर्शनाला लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

विधानभवन परिसरात प्रवेश करताच माहिती जनसंपर्क महासंचालनालयाने लावलेले लोकराज्य प्रदर्शन येणाऱ्या-जाणाऱ्यांचे लक्ष वेधून घेत होते कारण या प्रदर्शनात केवळ १०-१२ वर्षांतीलच नव्हे तर १९६४ पासूनचे लोकराज्यचे अंक प्रदर्शनात ठेवण्यात आले होते. लक्षवेधी ठरणाऱ्या या प्रदर्शनाला आतापर्यंत अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. हिवाळी अधिवेशनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर-अमरावती विभागाने हा उपक्रम राबवला. या प्रदर्शनात १९६४ पासून नोव्हेंबर २०१४ पर्यंतचे अनेक विशेषांक पाहण्यासाठी ठेवलेले होते. यामध्ये बालगंधर्व विशेषांक, शाहू महाराज यांच्या राज्यरोहण सोहळा शताब्दीनिमित्त काढलेला विशेषांक, धम्मचक्र प्रवर्तन महोत्सव विशेषांक ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी (नोव्हेंबर १९९०) साने गुरुजी, वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण, पंजाबराव देशमुख, महात्मा गांधी, स्वातंत्र्य दिन, विदर्भ विशेषांक (२०११) अखिल भारतीय साहित्य संमेलन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक विशेषांक, निवडणूक, शेती, सिंचन, मुली वाचवण्यासंदर्भातील विशेषांक, शिक्षण, वन, पर्यटन यासह इतरही विषयाला परिपूर्ण वाहिलेले विशेषांक ठेवण्यात आले होते.






### लोकराज्य घरोघरी

**'जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील ९० गावांमधील प्रत्येक कुटुंबाला लोकराज्य देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्यामुळे शासनाच्या योजना थेट घराघरांत पोहोचतील. पुढील टप्प्यात उर्वरित तालुक्यांमध्ये ही योजना विस्तारण्यात येईल. त्यासाठी वार्षिक ४.५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.'**

**- बबनराव लोणीकर,** पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री

## दुर्मीळ अंक

१९६४ पंडित जवाहरलाल नेहरू, १९७१,७२,७३,७५,७९,१९८० ऑगस्ट स्वातंत्र्यदिन विशेषांक, २००१ डॉ. पंजाबराव देशमुख विशेषांक, १९९७ ज्ञानेश्वरी सप्तशताब्दी, १९८७ बालगंधर्व, १९९१ डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी विशेषांक, १९९१ सुधाकरकराव नाईक, मुख्यमंत्र्यांच्या यशस्वी कारकिर्दीचे १०० दिवस, १९९६ सावित्रीबाई फुले विशेषांक, २०१२ यशवंतराव चव्हाण विशेषांक- यशवंत कीर्तिवंत, दुर्मीळ अंक वि.दा.सावरकर, राजर्षी शाहू महाराज, १९७२ मराठवाडा विकास विशेषांक, रवींद्रनाथ टागोर विशेषांक, आरोग्य संपदा विशेषांक, अहिल्याबाई होळकर, विदर्भ विशेषांक आदींसह अनेक दुर्मीळ विशेषांक या प्रदर्शनात पाहायला मिळाले.

**टीम लोकराज्य**

## शिवाजी पार्कवर महापरिनिर्वाणदिनानिमित्त लोकराज्यचा स्टॉल

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त दादरच्या चैत्यभूमीवरील शिवाजी पार्कवर आयोजित केलेल्या पुस्तक प्रदर्शनामध्ये 'लोकराज्य'चा स्टॉल उभारण्यात आला होता. यामध्ये लोकराज्य मराठी, उर्दू आणि महाराष्ट्र अहेडचे वर्षभराचे अंक विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. डॉ. आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी राज्यातून तसेच देशभरातून लाखो अनुयायी चैत्यभूमीला भेट देतात. यावेळी ते शिवाजी पार्कवरील पुस्तक प्रदर्शन आणि विक्री करणाऱ्या स्टॉलला आवर्जून भेट देतात. 'लोकराज्य'च्या स्टॉलला लोकांकडून उत्तम प्रतिसाद मिळला. या स्टॉलवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित अनेक प्रकाशने विक्रीस ठेवण्यात आली होती, तसेच स्टॉलवर तीनही मासिकांचे वर्गणीदार होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती.




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या विकासाच्या अनुषंगाने अनेक महत्त्वाचे निर्णय गेल्या महिन्यात घेतले आहेत. या निर्णयांची माहिती ते तत्काळ ट्विटरद्वारे प्रसृत करतात. गतिमान आणि पारदर्शक विकासासाठी त्यांची आत्यंतिक तळमळ या ट्विटस्‌मधून दिसून येते. गेल्या महिनाभरातील त्यांच्या काही ट्विटस्‌चा हा आढावा.**

विजय दिवसानिमित्त सैनिकांच्या बलिदानाचे संस्मरण करताना..

I salute the brave sons of Bharat Mata who sacrificed their lives for safeguarding our nation. #VijayDiwas Jai Hind!

स्मार्ट सिटी चा उद्देश स्पष्ट करताना..

Whole idea behind the concept of #SmartCities is to give a better life to the last man &not only to privileged ones.

ऊसतोड मजुरांच्या शासन पाठीशी असल्याचे आश्वासित करताना..

For sugarcane labourers we have set up a separate corporation in Gopinathji's name which will ensure social security and pension.

ज्येष्ठ शेतकरी नेते शरद जोशी यांना श्रध्दांजली वाहताना..

Saddened by the demise of an advocate,an activist and a leader of farmers,an economist Shri #SharadJoshi ji. My deepest condolences...

राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधराराजे शिंदे यांनी जलयुक्त शिवार योजनेचे कौतुक केल्यानंतर..

Thank You CM @Vasundharaji for appreciating our initiative of #JalYuktShivar which is now a people's movement.

६ लाख हेक्टर शेती जलयुक्त शिवार योजनेखाली आल्यानंतर..

#JalYuktShivar Abhiyan brought 6lakh hectare of land under irrigation in only ₹1400 crore for which previous govt used to spend ₹14000 crore.

कांद्याचे निर्यातमूल्य सातशे डॉलरवरून चारशे डॉलर केल्यानंतर..

Inter Ministerial Group headed by Union Minister @arunjaitley ji decides to lower onion MEP(Minimum Export Price)from $700/ton to $400/ton.

**दिलीप कुमार सन्मानित**

**ज्येष्ठ अभिनेते दिलीप कुमार यांना पद्मविभूषण प्रदान केल्यानंतर**

**Honoured to honour the veteran actor #DilipKumar ji with #PadmaVibhushan with Hon @RajnathSingh ji & Hon Governor**



मुख्यमंत्री साहाय्यता निधीला आपल्या खाऊचे पैसे दिल्यानंतर मुलांचे कौतुक करताना...

Great gesture as the kids give piggy bank savings of ₹11,000 for CMReliefFund.Thanks AdarshBirla,Samika&VanshikaJhawar

राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना..

Heartiest Birthday Greetings to Hon'ble President Pranab Mukherjeeji from Maharashtra. Wishing him a long life &good health. @RashtrapatiBhvn

मानवाधिकार दिनानिमित्त प्रत्येकाचे हक्क अबाधित राखण्यास शासन कटिबध्द असल्याचे सांगताना..

On #HumanRightsDay I reaffirm that our govt staunchly believes in equality & we are committed to protect the rights of every individual.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावरील विशेष नाणे काढल्यानंतर..

Thank you Hon PM @narendramodi ji for releasing commemorative coins on Mananeeya Dr. Babasaheb Ambedkar.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे निर्मित

# शासन आणि जनता यांच्यात संवाद दृढ करणारे...

सर्वत्र : सर्वोत्तम

## लोकराज्य

४ लाख खप ४० लाख वाचक

ऑनलाईन वर्गणीदार होण्यासाठी :
http://dgipr.maharashtra.gov.in

रोखीने वर्गणीदार होण्यासाठी :
जिल्ह्यातील जिल्हा माहिती कार्यालयाशी संपर्क साधा

ऐकायलाच हवा

## दिलखुलास

संवाद...

@२४७२

राज्यातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून सोमवार ते शनिवार, सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणारा कार्यक्रम

## لوک راجیہ

उर्दु लोकराज्य



लाखो दर्शकांची थेट-भेट घडवून देणारे...

## जय महाराष्ट्र

नाबाद...७९१ भाग

दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरून
मंगळवार व शुक्रवार, रात्रौ ७.१५ ते ८ या वेळेत
प्रसारित होणारा कार्यक्रम

बातमी खात्रीची
माहिती प्रगतीची
वेध भविष्याचा

## महान्यूज

@१ कोटी ७१ लाख

www.mahanews.gov.in

## MAHARASHTRA Ahead

English Magazine

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

http://dgipr.maharashtra.gov.in

# माध्यमे संवादाची : जनतेच्या विश्वासाची

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2015-17
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 18th to 24th January 2016
Date of Publication : 10th of every Month

# लोकमान्य : लोकराज्य




सर्वाधिक खपाचे मासिक

प्रति/ TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक चंद्रशेखर ओक, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : चंद्रशेखर ओक